जपानी परीकथा
येइ ओझाकी
वसंत बागुल

जपानी परिकथा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

जपानी परिकथा

संपादिका: येई थिओदोरा ओझाकी

अनुवादक: वसंत बागुल

जपानी परिकथा

संपादिका: येई थिओदोरा ओझाकी

अनुवादक: वसंत बागुल

३०२, न्यु शिवम अपार्टमेंट

स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे

फोन: 0251-2587832, 8149068977

vasant_pandit2002@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २२ जुलै २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची- लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

जपानी परिकथा

संपादिकाः येई थिओदोरा ओझाकी

अनुवादकः वसंत बागुल

माझ्या अतिशय गोड व सुशील नातीः

लिना,

हर्षिता,

तनिशा,

जान्हवी,

लक्ष्मी,

सिद्धी,

तेजल

आणि एशा

ह्यांना अकृत्रिम आनंद देणाऱ्या सातासमुद्रापलिकडील
अनुपम सुंदर जपानी परिकथांची अनमोल भेट.

- भाऊ

येई थिओदोरा ओझाकी ही विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या जपानी लघुकथा आणि परिकथांची अनुवादिका होती. तिचे अनुवाद प्रामाणिकपणे अभिजात आणि लोकप्रिय असून तिच्या मृत्यूनंतर बऱ्याचदा पुनर्मुद्रित झालेले आहेत. ती बॅरन ओझाकीची कन्या होती जे पाश्चिमात्य देशात जाऊन शिक्षण घेणारे पहिले जपानी गृहस्थ होते आणि विल्यम मॉरिसनची कन्या बाथिया कॅथेराईन मॉरिसन या त्यांच्या शिक्षकांपैकी एक होत्या. तिचे आईवडिल पाच वर्षांनी विभक्त झालेले होते आणि तिच्या आईवर त्या तिन्ही मुलींची, त्या एकोणवीस वर्षांच्या होईपर्यंत, संगोपन करण्याची जबाबदारी पडली होती. त्याच वेळी, येईला तिच्या वडिलांबरोबर जपानला पाठविण्यात आले जेथे तिने मौजेत दिवस घालविले. त्यानंतर तिने नियोजित विवाहाला नकार दिला, वडिलांचे घर सोडले आणि अर्थार्जनासाठी शिक्षिका व सचिव बनली. सारी वर्षे तिने युरोप आणि जपानचा इकडून तिकडे व तिकडून इकडे प्रवास केला तो तिच्या कौटुंबिक कर्तव्यासाठी. इटलीसारख्या विविध देशात प्रवास केला आणि बुद्धिस्ट मंदिरांच्या सर्वात वरच्या माळयावर झोंबणाऱ्या गार वाऱ्यात वास्तव्य केले. ह्या सर्व काळात तिची पत्रे चुकीने वारंवार काहीही संबंध नसलेल्या जपानी राजकारणी युकिओ ओझाकी कडे पोहचवली गेली आणि तिची त्याच्याकडे. १९०४ मध्ये शेवटी ते भेटले आणि लवकरच विवाहबद्ध झाले. तिच्या कलाकृतींमध्येः जपानी परिकथा, प्राचीन जपानचे योद्धे आणि इतर गोष्टी, प्राचीन जपानच्या अद्‌भुतरम्य प्रेमकथा आणि बुद्धाचे स्फटिक आणि इतर परिकथा यांचा समावेश आहे.

मनोगत

लहान बाळ जेव्हा बोलायला शिकते तेव्हा पहिल्यांदा ते काय म्हणते?“मला गोष्ट सांगा.”

लहान मुलांना गोष्टी फार आवडतात. आणि त्याचं कारण म्हणजे त्यात असलेले चमत्कार आणि कल्पनारम्यता.

जंगलात जसे मोठे सर्प, वाघ, सिंह आणि हत्ती ह्या सारखे हिंस्त्र प्राणी असतात; तसेच हरिण, ससे आणि कासव ह्यासारखे निष्पाप, निरूपद्रवी प्राणीही असतात. ह्या सर्वांच्या स्वभावात फारसा फरक नसतो. वरून वाघ, सिंहासारखी भयंकर वाटणारी माणसे आतून अतिशय प्रेमळ व दयाळू अंतःकरणाची असतात.

पशुपक्ष्यांना, किड्या-मकोड्यांना बोलता येत नाही, पण परिकथांमध्ये त्यांना बोलके करून मानवासारखे आचरण करताना दाखविलेले असते. राक्षस, भुते, हडळी आणि चेटकिणी ह्यांना आपण कधीही पाहिलेले नसते; पण ते जसे वाईट तसे चांगलेही असतात, असे परिकथांमध्ये आपण वाचतो. जगप्रसिद्ध नाटककार शेक्सपिअरने म्हटल्याप्रमाणे –

“काही माणसे भुतांची कामे करतात तर काही भुते माणसांची कामे करतात.”

देव आणि दानव, सत् आणि असत् ह्यांचा झगडा फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. आधुनिक मानवाच्या राहण्या-वागण्यात आणि बुद्धीमत्तेत खूपच प्रगती झालेली आहे. पण लक्षावधी वर्षांपासून त्याच्यास्वभावातील षड्रिपु (काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर) जसे होते तसेच आहेत, किंबहुना ते अधिकाधिक वृद्धिंगत होत आहेत.

परोपकार, संकटमोचन, योग्य मार्गदर्शन, त्याग व दुसऱ्याच्या दुःखाबद्दल वाटणारी अनुकंपा आणि त्या मोबदल्यात मिळणारे औदार्य, कृतज्ञता आणि मौल्यवान पारितोषिके हा निसर्गाचा नियमच आहे.

सत्य, शिव आणि सुंदर ह्यांच्या बाजूने लढून असत्य, अमंगल आणि विकृत ह्या विरूद्ध विजय मिळविण्यातच मानवाच्या जीवनाचे कल्याण आहे.

--परिकथा हेच सांगतात.

प्रस्तावना

हा जपानी परिकथांचा संग्रह म्हणजे श्री.अँड्रयू लँग ह्यांच्याकडून माझ्या मित्राद्वारे केलेल्या अप्रत्यक्ष सूचनांचे फलित होय. सादानामी सान् जिन ह्यांनी लिहिलेल्या आधुनिक पाठभेदातून त्या भाषांतरीत केल्या गेलेल्या आहेत. या कथा शब्दशः भाषांतरीत नाहीत, आणि त्या जरी जपानी परिकथा असल्या तरी जुन्या पद्धतीची जपानी अभिव्यक्ती यथातथ्यपणे ठेवली आहे, त्यांचे कथन विद्यार्थ्यांपेक्षा तरूण पाश्चात्त्य वाचकांच्या जिज्ञासापूर्तीचा उद्देश राखून केलेले आहे.

ज्यांनी भाषांतरात मला मदत केली त्या श्री. वाय्. यासुओका, कु. फुसा ओकामोतो, माझे बंधू नोबुमोरी ओझाकी, डॉ.योशिहिरो ताकाकी आणि कु. कामेको यामावो यांच्याकडे कृतज्ञतेच्या ऋणनिर्देशाचे श्रेय जाते. एक गोष्ट जिचे नाव मी "एका माणसाची गोष्ट ज्याला मरायची इच्छा नसते" शिन् सुइ तामेनागाने शंभर वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका छोट्या पुस्तकातून घेतली आहे. तिचे नाव चोसेइ फुरो किंवा "दीर्घायुष्य." "बांबूतोड्या आणि शशांकपुत्र" हे "ताकेतारी मोनोगातारी" ह्या अभिजात ग्रंथातून घेतलेले आहे आणि ते खरोखर अभिजात वाङ्मय असले तरी त्याची गणना जपानी लोकांनी आपल्या परिकथात अभिजात म्हणून केलेली नाही.

चित्रे श्री. काकूझो फुझियामा ह्या टोकियोच्या कलाकाराने काढलेली होती. जे मला आवश्यक वाटले व ज्यामुळे मला संतोष मिळाला अशा स्थानिक सूक्ष्म तपशीलाचा किंवा निवेदनाचा समावेश मी ह्या गोष्टींचे कथाकथन इंग्रजीत करताना केलेला आहे आणि एक किंवा दोन घटनांमधून मी ते प्रसंग दुसऱ्या पाठभेदातून वेचलेले आहेत. जपानच्या सुंदर दंतकथा आणि परिकथा सदासर्वदा ऐकणारे उभयतः तरूण आणि म्हातारे, इंग्लिश किंवा अमेरिकन उत्सुक श्रोते मला आढळून आले आणि त्या कथन करताना मला असेही आढळून आले की अतिशय मोठ्या प्रमाणावर ते त्याविषयी अनभिज्ञ आहेत आणि ह्या गोष्टीनेच मला पाश्चात्त्य मुलांसाठी लिहिण्याचे प्रोत्साहन दिले.

वाय. टी. ओ. (टोकियो, १९०८)

अनुक्रमणिका

१ माझा स्वामी तांदळाच्या थैलीचा

२ जीभ कापलेली चिमणी

३ कोळ्याचा पोरगा, उराशिमा तारोची गोष्ट

४ शेतकरी आणि ऊदमांजर

५ “शिनांशा” किंवा दक्षिणेकडे निर्देश करणारा रथ

६ सुवर्ण बालक, किंतारोची साहसे

७ राजकन्या हासेची कहाणी

८ एका माणसाची गोष्ट ज्याला मृत्यूची इच्छा नव्हती

माझा स्वामी तांदळाच्या थैलीचा

फार फार वर्षांपूर्वी जपानमध्ये खूप शूर असा एक योद्धा राहत होता, ज्याला सर्वजण तावारा तोडा किंवा “माझा स्वामी तांदळाच्या थैलीचा” म्हणून ओळखत होते. त्याचे नाव फुजिवारा हिदेसातो होते, आणि त्याचे हे नाव कसे बदलले ह्याबद्दल एक अद्‌भुत गोष्ट आहे.

त्याचा स्वभावधर्म योध्याचाच होता आणि आळस त्याला आवडत नसे, म्हणून तो एके दिवशी साहसाच्या शोधासाठी जलपर्यटनास निघाला. त्यासाठी त्याने आपल्या दोन्ही तलवारी कमरेस लटकवल्या. त्याच्याहीपेक्षा उंच, अजस्त्र असे धनुष्य त्याने हातात घेतले, पाठीस भाता बांधला आणि तो बाहेर पडला. तो कधीही गेला नव्हता अशा ह्या काठापासून त्या काठापर्यंत पसरलेल्या सेतानो काराशीच्या प्रचंड पुलापाशी आला. ज्याचा शेवट एका सुंदर बिवा सरोवराजवळ होत होता. तो त्या पुलावर पाय ठेवतो न ठेवतो

तोच त्या रस्त्याच्या अगदी बाजूलाच एक भयंकर नाग (ड्रॅगॉन) पडलेला त्याने पाहिला. तो भल्याथोरल्या देवदार वृक्षाच्या खोडासारखा दिसत असून त्याने पुलाची पूर्ण रुंदी व्यापली होती. त्याच्या अजस्त्र पंजांपैकी एकाने पुलाच्या एका बाजूची संरक्षक भिंत व्यापली होती तर दुसरी बाजू त्याच्या शेपटीने व्यापली होती. तो राक्षस झोपी गेल्यासारखा वाटत असून तो श्वासोच्छवास घेई तेव्हा त्याच्या नाकपुड्यातून धूर आणि आगीचे लोळ बाहेर पडत.

सुरुवातीला रस्त्यावर पडलेल्या त्या भयंकर सर्पाच्या भीतीयुक्त दृश्याची जाणीव तो टाळू शकला नाही, कारण त्याला एकतर मागे फिरायला हवे होते किंवा एकतर त्याच्या शरीरावरून सरळ चालत जायचे होते. तो शूर पुरूष होता, तथापि सर्व भीती बाजूला ठेवून तो निर्भयपणे पुढे गेला. का s र, काs र ! तो त्या भयंकर नागाचे शरीर आपल्या पायाखाली चिरडत, आता त्याच्या वेटोळ्यामधून मागे एक दृष्टीक्षेपही न टाकता आपल्या मार्गाने चालत राहिला.

तो काही पावलं पुढे गेला तोच त्याला मागून कुणीतरी हाक मारल्याचा आवाज आला. मागे वळून पाहिल्यावर त्याला खूप आश्चर्य वाटले, कारण त्याने पाहिले की तो अक्राळ विक्राळ सर्प पूर्णपणे नाहीसा झाला होता आणि त्याच्या जागी एक विचित्र दिसणारा माणूस, जो अत्यादराने जमिनीवर नतमस्तक झालेला होता. त्याचे तांबडे केस त्याच्या खांद्यावर रूळत होते, भयंकर नागाच्या आकाराच्या त्याच्या डोक्यावर राजमुकूट घातलेला होता आणि त्याचा सागरी हिरवा पोषाख शिंपल्यांच्या रचनेचा होता. हिदेसातोला कळून चुकले की तो साधासुधा मर्त्य प्राणी नाही आणि ह्या विचित्र घटनेबद्दल तो खूप आश्चर्यचकित झाला. इतक्या थोड्याशा अवधीत कोठे गेला तो भयंकर नाग? किंवा त्याचे रूपांतर ह्या माणसात झाले, आणि ह्या सर्वांचा अर्थ काय? हे विचार त्याच्या मनात घोळत असतानाच तो पुलावर असलेल्या त्या माणसाकडे आला आणि त्याच्याशी संभाषण करू लागला,

“तो तूच होतास का ज्याने मला नुकतीच हाक मारली?”

“होय, मीच होतो तो,” त्या माणसाने उत्तर दिले. “मला तुम्हाला एक कळकळीची विनंती करायची आहे. ती तुम्ही मान्य कराल असे तुम्हाला वाटते का?”

“जर ती माझ्या आवाक्यातली असेल तर करीन,” हिदेसातो उत्तरला. “पण आधी मला सांग की तू कोण आहेस?”

“मी एक तीक्ष्ण नखे असलेला व ज्वाला बाहेर टाकणारा ह्या तळ्याचा नागराज आहे. आणि माझे घर पाण्यामध्ये बरोबर ह्या पुलाच्या खाली आहे.”

“आणि तुला माझ्याकडून काय हवे आहे?” हिदेसातो म्हणाला.

“मला माझ्या जीवघेण्या अक्राळ विक्राळ घोण ह्या शत्रूला मारायचे आहे, जो पलिकडे पर्वतावर राहतो.” आणि त्या नागराजाने तळ्याच्या किनाऱ्याच्या विरूद्ध दिशेकडे असलेल्या पर्वतशिखराकडे अंगुलीनिर्देश केला.

“ह्या तळ्यात मी अनेक वर्षांपासून राहतो आणि मला मुला-नातवांचे मोठे कुटुंब आहे. काही काळापासून आम्ही दहशतीच्या वातावरणात रहात आहोत, कारण त्या अक्राळ विक्राळ घोणने आमचे घर शोधून काढले आणि प्रत्येक रात्री तो आमच्या कुटुंबातील एकाला घेऊन जातो. मी त्यांना वाचविण्यात असमर्थ आहे. हे असंच खूप काळ चाललं तर, मी फक्त माझी मुलंच गमावणार नाही तर मी स्वतः सुद्धा त्या दुष्ट राक्षसाचा बळी ठरेन. म्हणून मी खूप दुःखी आहे, आणि हे सगळं माझ्यासाठी अति झाल्यामुळे मी मानवी प्राण्याची मदत घ्यायचे ठरविले आहे. फार दिवसांपासून ह्याच उद्देशाने मी भयंकर नागराजाच्या आकारात पुलावर वाट पाहत आहे, जे तुम्ही पाहिले—ह्या आशेने की कुणीतरी शूर माणूस पुढे येईल. पण जे कुणी ह्या रस्त्यावर आले ते मला पाहिल्याबरोबर खूप घाबरले आणि त्यांना जेवढं जोरात पळता येईल तेवढ्या जोरात ते जीव घेऊन पळाले. तुम्ही पहिले मानव मला दिसलात ज्याने निर्भयपणे माझ्याकडे पाहिले, म्हणून मला लगेच वाटले की तुम्ही मोठे धाडसी माणूस आहात. तुम्ही माझ्यावर दया करावी अशी मी तुमच्याकडे

याचना करीत आहे. तुम्ही मला मदत करणार नाहीत का आणि माझा शत्रू घोण ह्याला मारून टाकणार नाहीत का?"

हिदेसातोला त्या नागराजाची गोष्ट ऐकून खूप दुःख झाले आणि मोठ्या तत्परतेने त्याने जेवढी शक्य होईल तेवढी मदत करण्याचे त्याला आश्वासन दिले. त्या योद्ध्याने घोण कोठे राहतो असे त्याला विचारले म्हणजे तो त्या प्राण्यावर लगेच हल्ला करेल. त्या नागराजाने उत्तर दिले की त्याचे घर मिकामी पर्वतावर आहे, पण प्रत्येक रात्री तो निश्चित अशावेळी तळ्याच्या राजवाड्यात येतो, तोपर्यंत वाट पाहणं उत्तम. म्हणून पुलाखाली असलेला नागराजाचा राजवाडा हिदेसातोला दाखविण्यात आला. विचित्र म्हणजे तो पाण्यात खाली यजमाना मागोमाग जात होता तेव्हा पुढे जाण्यासाठी पाणी दुभंगले गेले, आणि एवढ्या पाणलोटातून जाताना त्याचे कपडे ओले सुद्धा झाले नाहीत. त्या सरोवराखाली पांढऱ्या शुभ्र संगमरवराने बांधलेल्या इतक्या सुंदर राजवाड्यासारखी कुठलीही गोष्ट हिदेसातोने आजपर्यंत पाहिली नव्हती. सागराच्या तळाशी असलेल्या सागर सम्राटांच्या राजप्रासादाविषयी, तेथील नोकर चाकर आणि सेवकांविषयी व जेथे खाऱ्या पाण्यातले मासे असतात त्याविषयी खूप ऐकले होते, पण येथे बिवा सरोवराच्या हृदयात असलेली इमारत मात्र अतिशय भव्य होती. अतिशय नाजूक सोनेरी तांबूस मासे, मोठे रोही मासे, चंदेरी मोठे मासे नागराज आणि त्यांच्या पाहुण्यांची वाट पाहत होते. टेबलावर मांडलेल्या पदार्थांची मेजवानी पाहून हिदेसातोला आश्चर्य वाटले. स्फटिकासारख्या स्वच्छ कमलपात्राप्रमाणे आणि पुष्पांप्रमाणे ताटे होती आणि दुर्लभ टेंभुर्णीच्या लाकडापासून बनविलेल्या जेवायच्या काड्या होत्या. ते खाली बसल्याबरोबर सरक-दरवाजे उघडले गेले आणि दहा कमनीय सोनेरी नर्तिक मासळ्या बाहेर आल्या, सोनेरी तांबूस संगीतकार मासे पारंपारिक जपानी तंतूवाद्य आणि सतार घेउन त्यांच्या मागे आले. अशा रीतीने मध्यरात्रीपर्यंत वेळ भराभर निघून गेला आणि कर्णमधुर संगीत आणि नृत्य ह्यांनी घोणच्या विचारांना दूर सारले. तो नागराजत्या योद्ध्याला ताज्या मदिरेचा प्याला प्रेमाची भेट म्हणून देऊ

करणार तेवढ्यात पावलांच्या दण, दण आवाजाने तो राजवाडा हादरला. जणूकाही बलाढ्य सैन्यच जवळपास त्याच्या दिशेने कूच करीत होते.

हिदेसातो आणि त्याचे यजमान दोघेही उभे राहिले आणि सज्जाकडे धावत गेले, आणि त्या योद्ध्याने विरूद्ध दिशेला असलेल्या पर्वताकडे बघितले तेव्हा त्याला जवळ आणि खूप जवळ येत असलेले धगधगत्या ज्वालांचे दोन भले मोठे गोळे दिसले. तो नागराज भीतीने थरथर कापत योद्ध्याच्या बाजूला उभा राहिला.

"तो घोण ! तो घोण! ते दोन धगधगते गोळे त्याचे डोळे आहेत. तो त्याच्या भक्ष्यासाठी येत आहे! आता त्याला मारून टाकण्याची वेळ आहे."

हिदेसातोने आपल्या यजमानाने अंगुलीनिर्देश केलेल्या दिशेकडे पाहिले, आणि सायंकाळच्या ताऱ्यांच्या मंद प्रकाशात ज्वालेच्या दोन गोळ्यांच्या मागे दीर्घ लांबीचा प्रचंड शरीराचा घोण पर्वताभोवती वेटोळे घातलेला त्याला दिसला. आणि शेकडो पायांमध्ये दूरच्या अनेक दिव्यांसारख्या चमकणाऱ्या वस्तू किनाऱ्याकडे हळूहळू सरकत होत्या.

हिदेसातोने भीतीच्या चिन्हाचा लवलेशही दाखवला नाही. त्याने नागराजाला शांत करण्याचा प्रयत्न केला. "भिऊ नकोस, मी नक्कीच त्या घोणला मारीन. पटकन माझे धनुष्य आणि बाण आण."

नागराजाने त्याच्या आज्ञेप्रमाणे केले. आणि त्या योद्ध्याच्या लक्षात आले की त्याच्या भात्यात फक्त तीनच बाण उरले आहेत. त्याने धनुष्य उचलले, आणि खाचेत बाण बसवून काळजीपूर्वक नेम धरला आणि सोडला.

तो बाण घोणच्या डोक्याच्या बरोब्बर मध्यभागी जाऊन आपटला, पण तो आरपार भेदून जाण्याऐवजी काहीही इजा न करता आपटून उधळला आणि जमिनीवर पडला.

नाउमेद न होता, हिदेसातोने दुसरा बाण घेतला, खाचेत बसवला आणि सोडला. पुन्हा तो बाण त्याच निशाणीवर आपटला, त्या घोणच्या डोक्याच्या अगदी मध्याभागी धडकला, फक्त आपटून उधळला आणि जमिनीवर पडला. तो घोण

शस्त्राने अभेद्य होता! त्या शूर योद्ध्याचे बाणसुद्धा त्या घोणला मारून टाकण्यास असमर्थ ठरले हे पाहून त्या नागराजाचे धैर्य खचले आणि तो भीतीने थरथर कापू लागला.

त्या योद्ध्याने पाहिले की आता त्याच्या भात्यात फक्त एकच बाण शिल्लक आहे आणि तेवढाही एक वाया गेला तर आपण घोणला मारू शकणार नाही. त्याने पाण्याच्या पलिकडे बघितले त्या अजस्त्र सरपटणाऱ्या प्राण्याच्या भयंकर शरीराने त्या पर्वताभोवती सात वेटोळे घातले होते आणि खाली तळ्याकडे तो लवकरच पोहोचणार होता. त्याच्या डोळ्यांच्या ज्वालेचे गोळे जवळ आणि जवळ येताना चकाकत होते, आणि त्याच्या शेकडो पायांनी प्रकाशाचे प्रतिबिंब तळ्यात शांत पाण्यावर पाडायला सुरुवात केली होती.

मग अचानक त्या योद्ध्याला आठवले की त्याने असे ऐकले होते की मानवी थुंकी ही घोणला प्राणघातक असते. पण हा काही सर्वसाधारण घोण नव्हता. तो इतका अक्राळ विक्राळ होता की त्याला पाहिल्याबरोबर एखाद्याची भीतीने तारांबळ उडावी. हिदेसातोने शेवटची संधी घेण्याचा प्रयत्न करायचे ठरविले. म्हणून शेवटचा बाण घेऊन त्याचे टोक तोंडात ठेवून नंतर धनुष्याच्या खाचेत खोवला आणि काळजीपूर्वक पुन्हा एकदा सोडला.

ह्या वेळेला मात्र घोणच्या कपाळाच्या मध्यभागी तो बाण आदळला पण पूर्वीसारखा काही इजा न करता उधळून जाण्याऐवजी तो सरळ घोणच्या डोक्यातून मेंदूत शिरला. मग आचके देत थरकापत त्या सैतानाच्या शरीराने हालचाल बंद केली, आणि त्याच्या मोठ्या डोळ्यातील आगीचा प्रकाश आणि शेकडो पाय वादळी दिवसाच्या अस्तासारखे अंधारून गेले, आणि मग ते काळवंडून गेले. संपूर्ण गगन अंधःकाराने व्यापून टाकले, विजांचा चमचमाट आणि कडकडाट झाला, वादळाचा प्रकोप होऊन तो गर्जना करीत होता, आणि असं वाटत होतं की आता जगाचा अंत होईल. तो नागराज आणि त्याची मुलं आणि सेवक वर्ग सर्वजण आपला जीव वाचवित राजवाड्याच्या निरनिराळ्या जागेत स्वतःला लपवून घेत होता, मृत्यूची

भीती त्यांना वाटत होती, इमारती पायापासून हादरत होत्या. शेवटी ती भयानक रात्र संपली. सुंदर स्वच्छ पहाट झाली. पर्वतापासून तो घोण निघून गेला होता.

हिदेसातोने सर्पराजाला सज्जातून त्याच्याबरोबर बाहेर यायला सांगितले, कारण तो घोण मेला असून आता भीती वाटण्याचे काहीच कारण नव्हते.

मग त्या राजवाड्यात राहणारे सारे रहिवासी अत्यानंदाने बाहेर आले, आणि हिदेसातोने त्या सरोवराकडे अंगुलीनिर्देश केला. त्याठिकाणी घोणचे शरीर मृत अवस्थेत त्या पाण्यावर तरंगत होते, जे त्याच्याच रक्ताने माखून लाल झाले होते.

नागराजाच्या कृतज्ञतेला पारावार राहिला नाही. त्या योद्ध्याला साऱ्या जपानमध्ये आपला एकमेव अतिशय पराक्रमी व पालनकर्ता म्हणून संबोधले जाऊ लागले आणि सारे कुटुंब त्याच्यापुढे येऊन नतमस्तक झाले. दुसऱ्या मेजवानीची तयारी करण्यात आली, पहिल्यापेक्षाही अतिभव्य. सर्व प्रकारचे मासे कल्पकतेने बनविले गेले, कच्चे, मंदाग्नीवर शिजविलेले, उकडलेले आणि भाजलेले पोवळयाच्या तबकातून आणि स्फटिकाच्या पात्रातून त्याच्यापुढे वाढले गेले. हिदेसातोने आपल्या आयुष्यात कधीही चाखली नव्हती अशी मदिरा त्याला प्यायला दिली गेली. ह्या साऱ्या आनंददायी आणि सुंदर गोष्टीत भर म्हणून ते सरोवर एखाद्या द्रवरूप हिऱ्यामाणकासारखं चकाकू लागलं. राजवाडा त्या दिवशी रात्रीपेक्षाही हजारो पटींनी सुरेख दिसत होता. त्याच्या यजमानाने त्याने काही दिवस रहावं म्हणून त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण हिदेसातो घरी जाण्यावर ठाम होता. त्याचं म्हणणं होतं की ज्यासाठी तो आला होता ते काम संपलं म्हणून परतायलाच हवं. त्यांना सोडून तो खूपच लवकर जात आहे म्हणून त्या नागराजाला आणि त्याच्या कुटुंबियांना खूप वाईट वाटले. पण तो तर जातच आहे तरी त्यांचा भयंकर शत्रू घोण कायमचा मारला गेल्याने कृतज्ञतेचे प्रतिक म्हणून त्याला काही थोड्याशा भेटवस्तू स्विकारण्याची विनंती केली.

जेव्हा तो योद्धा जाण्यासाठी त्याची अनुज्ञा घेताना द्वारमंडपात उभा राहिला तेव्हा त्या मासळींचे रूपांतर अकस्मात माणसांच्या लवाजम्यामध्ये झाले. सर्वजणांनी नागराजाचे सेवक म्हणून प्रदर्शित करण्याचे समारंभाचे पोषाख घातले

होते. नागराजाच्या मुकूटासारखे मुकूट घातले होते. त्यांनी वाहून आणलेल्या भेटवस्तू खालील प्रमाणे होत्याः

पहिली म्हणजे कास्याच्या धातूची भली मोठी घंटा. दुसरी म्हणजे तांदळाची थैली. तिसरी रेशमाची गुंडाळी, चौथी स्वयंपाकाचे भांडे, पाचवी घंटा.

हिदेसातोला त्या सर्व भेटवस्तू स्विकारण्याची इच्छा नव्हती पण त्या नागराजाने इतका आग्रह केला की त्याला त्या नाकारता आल्या नाहीत.

तो नागराज त्या योद्ध्याबरोबर पुलापर्यंत सोबत गेला. आणि नंतर अनेक नमस्कार आणि शुभेच्छांसह त्याला निरोप देऊन भेटवस्तूंसह सेवकांची मिरवणूक हिदेसातोच्या घरापर्यंत पाठविली.

रात्र झाली तरी तो योद्धा घरी न परतल्यामुळे त्याचे कुटुंब आणि नोकर चाकर काळजीत पडले होते. पण नंतर त्यांनी निष्कर्ष काढला की तो झंझावाती वादळात सापडला असेल आणि त्याने कुठेतरी आश्रय घेतला असेल. जेव्हा नोकर त्याच्या परतण्याची वाट बघत होते तेव्हा त्यांच्या नजरेस असे दृष्य पडले की त्याचे आगमन होत आहे. घरची सारी माणसं त्याला भेटण्यासाठी पुढे जमली, भेटवस्तू आणि विजयध्वज घेतलेल्या माणसांची रांग त्याच्या मागून येत असलेली पाहून त्यांना खूप आश्चर्य वाटले की ह्याचा अर्थ काय?

नागराजाच्या नोकरांनी त्या भेटवस्तू खाली ठेवल्याबरोबर ते नाहीसे झाले आणि हिदेसातोने जे काही त्याच्या बाबतीत घडले ते सर्व सांगितले.

त्या कृतज्ञ नागराजाकडून मिळालेल्या भेटवस्तूंमध्ये जादुईशक्ती असल्याचे आढळून आले. फक्त तेवढी घंटाच सर्वसाधारण होती. हिदेसातोला तिचा काही उपयोग नसल्याने भोवतालच्या निकटवर्ती लोकांना दिवसाच्या घटिका दर्शविणारा घंटानाद ऐकू यावा म्हणून त्याच्या घराजवळ असलेल्या मंदिराला त्याने ती भेट म्हणून दिली व घंटा तेथे टांगली गेली.

एक तांदळाची पिशवी, त्या सरदारासाठी आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाच्या जेवणासाठी, दिवसानुदिवस खूप कितीही तांदूळ तिच्यातून काढले गेले तरी ती कधीही कमी झाली नाही.

ती रेशमाची गुंडाळी, दरवेळी नविन वर्षाला राजदरबारात जाताना घालण्यासाठी तो सरदार नविन खास असा पोषाख शिवायचा. त्यासाठी पुन्हा पुन्हा त्या गुंडाळीतून लांब तुकडा कापायचा तरी ती सुद्धा कधीही कमी झाली नाही.

स्वयंपाकाचे भांडेसुद्धा खूप आश्चर्यकारक होते. त्या भांड्यात टाकलेले, मग ते काहीही असो त्याचा स्वादिष्ट पदार्थ तयार व्हायचा तोही आगीशिवाय. खरोखर ते खूप मितव्ययी भांडे होते.

हिदेसातोच्या ऐश्वर्याची किर्ती खूप दूरवर आणि सर्वत्र पसरली. आणि त्याला तांदळावर आणि रेशमावर किंवा अग्नीवर खर्च करायची गरजच पडली नाही. तो खूप धनवान आणि ऐश्वर्यवान झाला आणि इतःपर तो **माझा स्वामी तांदळाच्या थैलीचा** म्हणून नावलौकिकास आला.

*****

जीभ कापलेली चिमणी

फार फार वर्षांपूर्वी जपानमध्ये एक म्हातारा आणि त्याची बायको राहत होती. तो म्हातारा खूप चांगला, दयाळू अंतःकरणाचा कष्टाळू माणूस होता, पण त्याची बायको रागीट-भांडखोर स्वभावाची असून आपल्या कडवट जीभेने घरातला सगळा आनंद बिघडवून टाकीत असे. काही ना काही गोष्टीवरून ती सकाळपासून रात्रीपर्यंत सतत कुरकुर करीत असे. खूप दिवसांपासून तिच्या या उद्धट वागण्याकडे लक्ष देण्याचे त्या म्हाताऱ्याने थांबविले होते. तो जास्तीत जास्त दिवस आपल्या शेतावर काम करण्यात घालवी, त्याला मूलबाळ नसल्याने, जेव्हा तो घरी असायचा तेव्हा त्याच्या करमणूकीचे साधन म्हणून त्याने एक चिमणी पाळली होती. त्या इवल्याशा पक्ष्यावर तो आपल्या मुलाप्रमाणे प्रेम करायचा.

खुल्या हवेत कष्टाचे काम करून जेव्हा तो रात्री परत यायचा तेव्हा त्याच्या मनाला आनंद देणारी एकच गोष्ट होती आणि ती म्हणजे त्याची पाळलेली चिमणी. तिच्याशी बोलणं, तिला छोट्या छोट्या युक्त्या शिकवणं, ह्या गोष्टी तो करायचा आणि ती चिमणी ते पटापट शिकायची. तो म्हातारा पिंजरा उघडायचा आणि त्या चिमणीला घरभर उडू द्यायचा, ते एकत्र खेळायचे. जेव्हा रात्रीच्या जेवणाची वेळ यायची तेव्हा तो आपल्या जेवणातून दोन घास काढून ठेवी आणि त्या इवल्याशा पक्ष्याला भरवी.

आता तो म्हातारा लाकडे तोडण्यासाठी जंगलात गेला आणि म्हातारी कपडे धुण्यासाठी घरीच थांबली. आदल्या दिवशी तिने खळ बनवून ठेवला होता आणि आता ती शोधू लागली तर तो सर्व नाहीसा झालेला होता. काल काठोकाठ भरलेले भांडे आता पूर्णपणे रिकामे झालेले होते.

जेव्हा ती स्वतःशीच विचार करायला लागली की कोणी वापरला असेल किंवा कोणी चोरला असेल तो खळ, तेव्हा ती पाळलेली लहान चिमणी खाली उडत

आली आणि मालकाने शिकविलेल्या युक्तीप्रमाणे ती सुरेख पक्षीण आपले पिसांचे छोटेसे डोके नम्रतेने खाली वाकवून चिवचिवत म्हणाली,

"मीच ती जिने खळ घेतलेला. मी विचार केला त्या कढईत तो माझ्यासाठीच ठेवलेला होता आणि मी तो सर्व खाल्ला. जर माझ्याकडून चूक झाली असेल तर मी विनंती करते की मला क्षमा करावी!चिव,चिव,चिव!"

ह्यावरून तुम्ही बघा की ती चिमणी खरे बोलणारी होती आणि अतिशय चांगुलपणे क्षमा मागणाऱ्याला, त्या म्हातारीने स्वेच्छेने क्षमा करायला हवी होती. पण तसं झालं नाही.

त्या म्हातारीने त्या चिमणीवर कधीच प्रेम केले नव्हते, आणि ती तिला घाणेरडी पक्षीण म्हणायची आणि घरभर उडणाऱ्या पक्षिणीला पाळल्यामुळे अतिरिक्त काम वाढल्याकारणाने ती त्या म्हाताऱ्याशी अनेकदा भांडली होती. त्याच्या ह्या लाडलीविरूद्ध तक्रार करायचे निमित्त सापडल्याने तिला खूप आनंद झाला होता. तिच्या ह्या वाईट वर्तणुकीबद्दल त्या गरीब बिचाऱ्या इवल्याशा पक्ष्यावर ती खूप रागावली, एवढेच नव्हे तर तिला खूप शिव्याशाप दिले आणि इतके कठोर आणि निष्ठुर शब्द वापरूनही तिचे समाधान झाले नाही तर संतापाच्या भरात तिने त्या चिमणीला पकडले, ती चिमणी झालेल्या चुकीबद्दल किती वाईट वाटले हे दाखवित प्रत्येक वेळी आपले पंख पसरवून तिच्या पाया पडत होती—पण त्या दुष्ट म्हातारीला तिची दया आली नाही- तिने कात्री घेतली आणि त्या गरीब बिचाऱ्या इवल्याशा पक्ष्याची जीभ कापून टाकली.

"मला समजलं माझा खळ तू ह्या जीभेने घेतला! आता तू बघशील जिभेविना काय होईल तुझे ते!" आणि अशा भयंकर शब्दांनी दुखवून तिने त्या पक्ष्याला हाकलून दिले. त्यामुळे काय होईल याची यत्किंचितही तमा न बाळगता, तिच्या वेदनांवर तिने अल्पशीही दया दाखवली नाही, किती निष्ठुर होती ती!

त्या म्हातारीने पक्ष्याला हाकलून दिल्यानंतर अविरत कटकट कुरकुर करीत अजून थोडा अधिक भाताचा खळ बनविला, तो कपड्यांना लावला आणि इंग्लंडमध्ये त्यांच्यात करतात तशी कपड्यांना इस्तरी करण्याऐवजी सुकण्यासाठी फळयांवर उन्हात वाळत टाकले.

सायंकाळी तो म्हातारा घरी आला. नेहमीप्रमाणे परतताना, रस्त्यावरच तो अशा वेळेची वाट बघत होता की केव्हा तो प्रवेशद्वाराजवळ पोहचेल आणि केव्हा त्याला त्याची लाडकी, उडत आणि चिवचिव करीत त्याला भेटेल, पिसे पिंजारून आपला आनंद दाखवेल आणि शेवटी त्याच्या खांद्यावर येऊन बसेल. पण आज रात्री त्या म्हाताऱ्याची खूप निराशा झाली कारण त्याच्या लाडक्या चिमणीची त्याला सावलीही दिसली नाही.

त्याने चटकन पावले उचलली, घाईघाईने गवती बूट काढले आणि पावले टाकीत तो ओसरीवर आला. तरीही त्याला चिमणी दिसली नाही. त्याची आता अशी खात्री झाली की तापट स्वभावाच्या त्याच्या बायकोने संतापाच्या भरात त्या चिमणीला पिंजऱ्यात कोंडून ठेवले. म्हणून त्याने तिला हाक मारली आणि चिंतातुरतेने म्हणाला:

"सुझुमी सान (चिऊताई) कोठे आहेस तू आज?"

त्या म्हातारीने सुरूवातीला आपल्याला काहीच ठाऊक नाही असा आव आणला आणि ती उत्तरली, "तुमची चिमणी? मला नक्कीच माहित नाही, मला वाटतं संपूर्ण दुपारभर मी तिला पाहिलंच नाही. तुमची ती नमकहराम चिमणी तुमच्या लाडाकोडाला लाथाळून तुम्हाला सोडून उडून गेली असेल तर मला त्याचं काहीच आश्चर्य वाटणार नाही!"

पण शेवटी म्हाताऱ्याने तिला स्वस्थ बसू दिले नाही, आपल्या लाडकी बाबत काय घडले हे तो हट्टाला पेटून पुन्हा पुन्हा तिला विचारू लागला, तिने सारी कबुली दिली. तिने त्याला संतापून सांगितले की तिने खास तिच्या कपड्यांना लावण्यासाठी बनविलेला खळ त्या चिमणीने कसा फस्त केला आणि चिमणीने तिने स्वतः केलेल्या कृत्याबद्दल कशी कबुली दिली आणि मोठ्या संतापाच्या भरात तिने कातर घेऊन कशी त्या चिमणीची जीभ कापली आणि शेवटी तिला हाकलून लावून पुन्हा घरी परतण्यास कसा मज्जाव घातला. नंतर ती म्हातारी चिमणीची जीभ दाखवित म्हणाली, "ही ती जीभ, मी कापलेली! खत्रुड क्षुद्र पक्षीण, का तिने माझा सारा खळ खाल्ला?"

"इतकी क्रूर होऊ शकतेस तू? अरे देवा! किती कठोर होऊ शकतेस तू?" एवढेच सर्व उत्तर तो म्हातारा देऊ शकत होता. तो इतका दयाळू अंतःकरणाचा होता की तो आपल्या कजाग बायकोला शिक्षा करू शकला नाही, पण आपल्या इवल्याशा चिमणीच्या बाबतीत जे काही घडले त्याबद्दल त्याला भयंकर दुःख झाले होते.

"आपली जीभ तिने गमवावी हे किती भयंकर दुर्भाग्य माझ्या गरीब बिचाऱ्या सुझुमि बाळाचे!" तो स्वतःशीच म्हणाला. "ती आता ह्यापुढे कधीच चिवचिव करू

शकणार नाही इतक्या निर्दयपणे तिची जीभ कापल्यावर तिला खचितच किती यातना झाल्या असतील, नक्कीच ती आजारी पडली असणार! काहीच करता येणार नाही का?"

त्याची कजाग बायको झोपी गेल्यावर त्या म्हाताऱ्याने खूप अश्रू ढाळले. जेव्हा त्याने आपल्या सुती अंगरख्याच्या बाहीने अश्रू पुसले तेव्हा एका आनंदी विचाराने त्याला दिलासा दिला, उद्या चिमणीचा शोध घ्यायला जायचे असे निश्चित ठरविल्यावर शेवटी तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो लवकर उठला, तांबडं फुटत नाही तोच त्याने पटापट घाईघाईने न्याहरी केली. टेकड्यांमधून, जंगलांमधून चालत बांबूच्या प्रत्येक बेटाजवळ थांबत तो आक्रोश करू लागला, "कोठे, अरे देवा कोठे राहते माझी जीभ कापलेली चिमणी? कोठे, अरे देवा कोठे राहते माझी जीभ कापलेली चिमणी?"

दुपारच्या जेवणापर्यंत तो कोठेच थांबला नाही आणि दुपारनंतर दूरवर असलेल्या भल्या मोठ्या बांबूच्या जंगलात आपण आल्याचे त्याला आढळले. बांबूंचे वन ही चिमण्यांची येण्याजाण्याची आवडती जागा असते आणि त्याच्या विश्वासाप्रमाणे त्या जंगलाच्या कडेला स्वागतासाठी आपली वाट पाहत असलेली त्याची लाडकी चिमणी त्याला दिसली. अत्यानंदाने त्याच्या डोळ्यांवर त्याचा विश्वासच बसत नव्हता, तो पटकन पुढे धावत तिला भेटायला सरसावला. तिने आपले इवलेसे डोके आदराने वाकविले आणि आपला जुना मित्र भेटल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी आपल्या मालकाने शिकविलेल्या असंख्य क्लृप्त्या तिने करून दाखविल्या आणि पूर्वीसारखी ती बोलूपण शकत होती. त्या म्हाताऱ्याने जे काही घडलं त्याबद्दल खूप दुःख व्यक्त केले आणि तिच्या जीभेविषयी चौकशी करून आश्चर्य व्यक्त केले की, जीभेशिवाय ती इतकं छान कसं बोलू शकते? त्या चिमणीने आपली चोच उघडली आणि जुन्या जीभेच्या जागी नवीन आलेली जीभ दाखवली

आणि त्याला विनंती केली की पूर्वी काय घडले ते विसरून जा, कारण आता सर्व काही कुशल-मंगल आहे. नंतर त्या म्हाताऱ्याला कळले की ती परी आहे, सर्वसाधारण पक्षीण नाही. त्याला झालेला आनंद व्यक्त करून सांगणे कठीण होते. तो त्याचं सगळं दुःख विसरला. आपण किती थकलो आहोत हेही तो विसरला कारण त्याला त्याची हरवलेली चिमणी सापडली होती. त्याच्या अपेक्षेप्रमाणे त्याला जी भीती वाटत होती तशी ती आजारी नव्हती आणि विनाजीभेचीही ती त्याला दिसली नाही, नव्या जीभेसह ती छान व आनंदात होती, त्याच्या बायकोने दिलेल्या वाईट वागणुकीच्या चिन्हाशिवाय. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ती परी होती.

त्या चिमणीने त्याला तिच्या मागे यायला सांगितले आणि त्याच्या पुढे उडत तिने त्याला बांबूवनाच्या मध्यभागी असलेल्या एका सुंदर घराकडे नेले. घरात शिरल्याबरोबर ते किती सुंदर ठिकाण आहे हे पाहून तो म्हातारा सर्वथा विस्मयचकित झाला. ते शुभ्रकाष्टांनी बांधलेले होते. अतिशय सुरेख, मऊ दुधी चटयांनी गालिच्यांची जागा घेतली होती जे त्याने कधीही पाहिले नव्हते. चिमणीने त्याला बसायला आणलेली गिरदी उत्कृष्ट झिरझिरीत रेशमापासून बनविलेली होती. काचेच्या सुंदर फुलदाण्या आणि चकचकीत पेटिका प्रत्येक खोलीतील तोकोनोमात सजविली होती (देवळी, जेथे मौल्यवान वस्तू मांडलेल्या असतात.)

त्या चिमणीने म्हाताऱ्याला गौरवपदाकडे नेले आणि मग विनम्रपणे थोडे दूर उभे राहून त्याने अनेक वर्षे दाखविलेल्या प्रीतीबद्दल अनेकदा विनम्र अभिवादन केले.

नंतर त्या राणी चिमणी सरकारने, आपण आता तिला असे म्हणू, तिच्या सर्व कुटुंबियांची म्हाताऱ्याशी ओळख करून दिली. तिच्या मुली सुंदर, नाजूक रेशमाचे झगे घालून जुन्या पद्धतीच्या तबकांमध्ये सर्व प्रकारची स्वादिष्ट पक्वान्ने घेऊन आल्या हे पाहून म्हाताऱ्याला वाटले आपण स्वप्नच बघत आहोत. जेवणाच्या वेळी

चिमणीच्या मुलींनी पाहुण्याच्या मनोरंजनासाठी छान असे नृत्य सादर केले. त्याला "सुझुमे-ओदोरी"किंवा "चिमणीचे नृत्य" असे म्हणतात.

म्हाताऱ्याने इतकी मजा कधीच लुटली नव्हती. त्याच्या समोर होणारे चिमण्या पऱ्यांचे नृत्य, त्याच्यासाठी केलेला मेजवान्यांचा पाहुणचार, त्या रमणीय स्थळावर वेळ कसा भराभर उडून गेला.

पण रात्र झाली आणि अंधःकाराने त्याला आठवण करून दिली की त्याला खूप लांब जायचे आहे. घरी परतण्यासाठी त्याला त्यांचा निरोप घेण्याचा विचार करणे भाग होते. त्याने अतिशय प्रशंसनीय आदरातिथ्याबद्दल त्या प्रेमळ यजमानिणीचे आभार मानले, आणि त्याच्या कजाग बायकोच्या हातून घडलेला अत्याचार सहन केल्याबद्दल क्षमा करण्याची विनंती केली. त्याने चिमण्याराणीला म्हटले की तिला सुंदर अशा घरामध्ये निरपेक्ष पाहून त्याच्या मनाला अतिशय संतोष व आनंद झाला. त्याला ही घोर चिंता लागून राहिली होती की ती कुठे भटकत असेल, तिचं काय झालं असेल आणि ह्यामुळेच तो तिचा शोध घेत आला होता. आता सारं काही ठीक आहे असं त्याला कळलं होतं. तो आनंदाने घरी परतू शकत होता. तिला जर काही त्याच्याकडून अपेक्षित होते ते हे की त्याला आपण बोलावणं पाठवावं आणि त्याने तात्काळ तेथे यावं.

चिमणीराणीने त्याला अजून खूप दिवस राहून झालेल्या परिवर्तनाची मजा घेण्याची विनंती केली, पण तो म्हातारा म्हणाला, त्याला त्याच्या म्हातारीकडे जाणे भाग आहे. नेहमीच्या वेळेप्रमाणे तो घरी गेला नाही आणि कामावर गेला नाही की ती बहुधा या कारणाने कटकट करेल आणि म्हणून त्याची इच्छा असूनही तो तिचे आमंत्रण स्विकारु शकत नव्हता. पण आता चिमणीराणी कोठे राहते हे त्याला ठाऊक झाल्यामुळे त्याला वेळ मिळेल तेव्हा केव्हाही तो तिला भेटायला येऊ शकत होता.

जेव्हा तिला कळले की येथे अधिक काळ राहण्यासाठी आपण म्हाताऱ्याचे मन वळवू शकत नाही तेव्हा तिने आपल्या काही नोकरांना हुकूम सोडले आणि त्यांनी दोन संदूका आणून ठेवल्या, एक मोठी आणि दुसरी लहान. त्या म्हाताऱ्यापुढे त्या ठेवण्यात आल्या आणि चिमण्या राणीने विचारले की भेटवस्तू म्हणून त्याला आवडेल तिची निवड कर. तो म्हातारा तिचा प्रस्ताव नाकारू शकत नव्हता आणि लहान संदूक निवडत तो म्हणाला, "मी आता खूप म्हातारा आणि कमजोर झालो असून मला मोठी आणि वजनदार संदूक पेलवली जाणार नाही, तू इतक्या प्रेमाने कोणतीही संदूक निवडण्याचे सांगितल्यामुळे मी ही लहान संदूकच निवडतो जी मला उचलून नेताना सोपं जाईल."

नंतर सर्व चिमण्यांनी ती त्याला पाठीवर ठेवण्यासाठी मदत केली आणि द्वारापर्यंत त्याला पोहचविले. अनेकदा नमस्कार करून त्याला निरोप देताना जेव्हा वेळ मिळेल तेव्हा परत येण्याची कळकळीची विनंती केली. अशा रितीने तो म्हातारा आणि ती प्रिय चिमणी मोठ्या आनंदाने विभक्त झाले. म्हातारीच्या हातून निर्दयपणे झालेल्या क्लेशाबद्दल तिने यत्किंचितही दुष्ट भाव दाखविला नाही. तथापि म्हाताऱ्याला हे आयुष्यभर सहन करावं लागेल याचंच खरं म्हणजे तिला दुःख झालं.

म्हातारा घरी आला तेव्हा म्हातारी नेहमीपेक्षा जास्तच चिडखोर बनली होती. कारण तो खूप उशीरा परत आला होता आणि ती त्याची खूप वेळेपासून वाट पाहत होती.

"इतक्या वेळेपर्यंत तुम्ही होतात कोठे?" तिने मोठ्या आवाजात विचारले. "का एवढ्या उशीराने परतलात?" आपल्याबरोबर आणलेल्या भेटवस्तू दाखवित म्हाताऱ्याने तिला शांत करण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या बाबतीत जे काही

घडलं ते त्याने सारं तिला सांगितलं आणि चिमणीच्या घरी किती आश्चर्यकारकरित्या त्याचा पाहुणचार झाला हे सांगितले.

“आता आपण ती संदूक उघडून पाहूया.” तिला पुन्हा कुरकुर करायला वेळ न देता तो म्हातारा म्हणाला. “ती उघडायला तू मला मदत करायलाच हवी.” आणि ते दोघेही त्या संदूकीसमोर बसले आणि त्यांनी ती उघडली.

सोन्याचांदीच्या नाण्यांनी आणि इतर अनेक मौल्यवान वस्तूंनी काठोकाठ भरलेली ती पेटी पाहून त्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. जशा त्यांनी त्या वस्तू एकेक करून बाहेर काढल्या आणि खाली ठेवल्या तेव्हा त्यांच्या छोट्याशा झोपडीतील चटई लखलख चमकू लागली आणि त्यांनी त्या वस्तूंना पुन्हा पुन्हा गोंजारले. धनदौलतीचे ते दृश्य पाहून हे सर्व आपलं झालं आहे ह्या जाणिवेने त्या म्हाताऱ्याचा आनंद गगनात मावेना. त्याच्या खूप मोठ्या अपेक्षेपेक्षाही त्या चिमणीने दिलेली भेटवस्तू मोठी होती. कामधंदा सोडून देऊन त्याचं उर्वरित आयुष्य सुखसमाधानात घालविण्याचं सामर्थ्य त्यामुळे त्याला प्राप्त झालं होतं.

तो अनेकदा म्हणाला, “तुझे आभार मानतो माझ्या इवल्याशा गुणी चिमणे! तुझे आभार मानतो माझ्या इवल्याशा गुणी चिमणे!” पण ती म्हातारी सोनेचांदी पाहिल्यानंतरचा आनंद आणि आश्चर्याचा पहिला भर ओसरल्यावर तिच्या दुष्ट स्वभावातील हावरटपणाला ती आवर घालू शकली नाही. भेटवस्तूंची मोठी संदूक घरी आणली नाही म्हणून आता ती म्हातारी त्याला दोष देऊ लागली होती, कारण त्या चिमणीने देऊ केलेल्या मोठ्या संदूकीऐवजी भोळेभाबडेपणे त्याने हलकी आणि उचलून आणायला सोपी असलेली छोटी संदूक घरी आणणे पसंत केले होते.

“अरे मूर्ख म्हाताऱ्या,” ती म्हणाली; “तू ती मोठी संदूक का आणली नाहीस? फक्त विचार कर आपलं काय नुकसान झालं ते. आपल्याला ह्यापेक्षा दुप्पट सोनं आणि चांदी मिळाली असती, तू खचितच मूर्ख म्हातारा आहेस!” ती किंचाळली

आणि नंतर जेवढा संताप व्यक्त करता येईल तेवढा व्यक्त करून ती अंथरूणावर पडली. त्या म्हाताऱ्याला आता तिला त्या संदुकीबद्दल सांगायची इच्छा नव्हती, पण त्याला फार उशीर झाला होता. ती लोभी म्हातारी ज्याला थोडीशीही पात्र नव्हती अशा अनपेक्षितपणे लाभलेल्या चांगल्या नशिबावर समाधानी नव्हती, तिने शक्य असेल तर अधिकाधिक मिळविण्याचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ती लवकर उठली आणि तिने त्या म्हाताऱ्याला चिमणीच्या घराच्या रस्त्याबदद्ल वर्णन करायला सांगितले. तिच्या मनात काय आहे हे जेव्हा त्याने पाहिले तेव्हा तिला तिकडे जाण्यास त्याने मज्जाव घातला, पण त्याचा काही उपयोग नव्हता. त्याने सांगितलेला एक शब्दही तिला ऐकायचा नव्हता. रागाच्या भरात तिने त्या चिमणीची जीभ कापून तिला यातना दिल्याची त्या म्हातारीला काहीच शरम वाटत नव्हती आणि ती तिच्या घरी जात होती हे किती विचित्र होते. पण मोठी संदूक मिळविण्याच्या तिच्या हावरटपणाने तिला सारं काही विसरायला लावलं. तिच्या ह्या कृत्याबद्दल ती चिमणी तिला रागवेल— आणि खरोखर तिला ती शिक्षाही करू शकेल ह्याचा विचारही तिच्या डोक्यात शिरला नाही.

जेव्हा ती चिमणीराणी दुःखद मनोवस्थेत घरी परतली होती, तिला रडताना आणि तोंडातून रक्त पडणाऱ्या अवस्थेत तिच्या सर्व कुटुंबियांनी आणि नातेवाईकांनी तिला पहिल्यांदाच पाहिले होते तेव्हा ते त्या म्हातारीच्या क्रूरतेबद्दल बोलत होते. “असं कसं करू शकली ती?” ते एकमेकांना विचारत होते. “इतकी मोठी शिक्षा चुकीने तांदळाचा खळ खाल्ल्याच्या क्षुल्लक गुन्ह्याबद्दल?” सर्व त्रास सहन करूनही चांगलं आणि प्रेमळ वागणाऱ्या त्या म्हाताऱ्याबद्दल त्यांना प्रेम वाटलं, पण त्या म्हातारीचा त्यांना द्वेष वाटला, आणि त्यांनी ठरविले की जर त्यांना संधी मिळाली तर जिला ती पात्र आहे अशी शिक्षा तिला करायची. त्यांना फार काळ वाट पहावी लागली नाही.

काही वेळ चालल्यावर, तिच्या नवऱ्याला तिने काळजीपूर्वक वर्णन करायला सांगितल्याप्रमाणे तिला बांबूचे वन सापडले आणि आता ती त्यासमोर उभी राहून ओरडू लागलीः

"कोठे आहे त्या जीभ कापलेल्या चिमणीचे घर? कोठे आहे त्या जीभ कापलेल्या चिमणीचे घर?"

शेवटी बांबूच्या पालवीतून बाहेर डोकावणाऱ्या घराच्या पागोळ्या तिला दिसल्या. ती घाईघाईने दरवाजाकडे गेली आणि जोरजोराने दरवाजा ठोठावला.

जेव्हा नोकरांनी तिच्या राणीला सांगितले की तिची म्हातारी मालकीण दारात उभी राहून तुला भेटण्यासाठी पृच्छा करीत आहे, तेव्हा ह्या अनपेक्षित भेटीचे तिला काहीसे आश्चर्य वाटले, अखेरीस ते घडलेच, घरापर्यंत येण्याचे साहस करण्याच्या तिच्या धीटपणाचे तिला जराही आश्चर्य वाटले नाही. तथापि चिमणी राणी एक सुशील पक्षीण होती, म्हणून एके काळी ती आपली मालकीण होती ह्याची आठवण ठेवून ती त्या म्हातारीचे स्वागत करण्यासाठी बाहेर आली.

म्हातारीचा हेतू होता, की काही झाले तरी शब्दांत वेळ घालवायचा नाही, ती बरोबर मुद्द्यावर आली, अगदी जराही लाज वाटू न देता, आणि म्हणाली, "माझ्या म्हाताऱ्याचा केलास तसा माझा पाहुणचार करण्याची तसदी घेण्याची तुला आवश्यकता नाही. मी स्वतः येथे आले तो बिनडोक मागे सोडून आला त्या संदुकीसाठी. तू जर ती मोठी संदूक मला दिलीस तर मी लवकरात लवकर निघून जाईन—हेच फक्त मला हवं आहे!"

चिमण्या राणीने लगेच रूकार दिला आणि आपल्या नोकरांना ती मोठी संदूक बाहेर आणायला सांगितली. म्हातारीने उतावीळपणे ती पकडली आणि उचलून तिच्या पाठीवर ठेवली आणि न थांबता, चिमण्या राणीचे साधे आभारही न मानता घाईघाईने घराकडे निघाली.

ती संदूक इतकी वजनदार होती की ती पटापट चालू शकत नव्हती, तिला वाटेल तसं पण थोडीशीच धावत होती. संदुकीत काय आहे हे घरी जाऊन केव्हा पाहीन ह्या तिच्या इच्छेला ती आवर घालू शकत नव्हती. कितीतरी वेळा रस्त्यावर विश्रांतीसाठी थांबून तिला खाली बसावं लागत होतं.

जेव्हा त्या जड ओझ्याखाली ती लटपटत होती तेव्हा ती संदूक उघडून बघायची तिची तीव्र इच्छा इतकी बळावली होती की तिला तो मोह आवरला गेला नाही. ती फार काळ वाट पाहू शकत नव्हती, कारण की तिला असं वाटत होतं की म्हाताऱ्याला मिळालेली छोटी संदूक जशी सोने चांदी आणि मौल्यवान हिऱ्यामाणकांनी भरलेली होती तशीच ही मोठी संदूकही भरलेली असेल.

शेवटी त्या हावरट आणि स्वार्थी म्हातारीने ती संदूक रस्त्याच्या कडेला खाली ठेवली आणि काळजीपूर्वक उघडून लोभी दृष्टीने तेथे संपत्तीची खाण असण्याची अपेक्षा करू लागली. तिने पाहिलं तर काय, ती इतकी घाबरली की जवळ जवळ तिची शुद्धच हरपली. जसे तिने झाकण उघडले तसे भयंकर आणि भीतीदायक दिसणारे अनेक राक्षस त्या संदुकीतून धडाधड उड्या मारत बाहेर आले आणि त्यांनी तिला चोहो बाजूंनी घेरले. जणू काही तिला मारून टाकायचा त्यांचा उद्देश असावा. एवढ्याशा संदुकीत खच्चून भरलेले इतके भयंकर प्राणी तिने आपल्या भयानक स्वप्नातही कधी पाहिले नव्हते. एका पिशाच्चाच्या कपाळावर बरोब्बर मध्यभागी भला मोठा डोळा होता, तो तिच्या जवळ येऊन तिच्याकडे गुरकावून बघत होता. दुसरा राक्षस आपला जबडा वासून जणूकाही तिला गिळू पाहत होता, एक प्रचंड सर्प तिच्यावर फुत्कार घालत होता, आणि एक मोठ्ठा बेडूक डराव डराव करीत तिच्याकडे उड्या मारत येत होता.

ती म्हातारी आयुष्यात इतकी कधीही घाबरली नव्हती, तिचे थरथरते पाय तिला जितक्या जलदपणे नेतील तितके जलद जीव वाचला ह्या समाधानाने ती पळाली. जेव्हा ती घरी पोहोचली तेव्हा ती जमिनीवर कोसळली आणि तिच्या

बाबतीत काय घडलं ते आणि त्या संदुकीतल्या राक्षसाकडून मरता मरता कशी वाचली ते भरल्या अश्रूंनी तिने आपल्या नवऱ्याला सांगितले.

नंतर तिने चिमणीला दोष द्यायला सुरूवात केली. पण म्हाताऱ्याने तिला थांबवीत म्हटले, "त्या चिमणीला दोष देऊ नकोस, हे तुझ्याच दुष्टपणाचे फळ तुला अखेर मिळालेच. मला फक्त अशी आशा आहे की भविष्यकाळात तुला हा धडा मिळाला असावा!"

ती म्हातारी अधिक काहीच बोलली नाही आणि त्या दिवसापासून तिला आपल्या चिडखोरपणाचा, निर्दयीपणाचा पश्चात्ताप वाटू लागला आणि हळहळू ती सद्वर्तनी म्हातारी बनली. इतकी, की त्या म्हाताऱ्याला वाटू लागले की हीच ती व्यक्ती आहे का, आणि त्यांनी आपले शेवटचे दिवस एकमेकांच्या सहवासात-आनंदात घालविले. त्यांनी कसलीही काळजी किंवा इच्छा केली नाही आणि त्या म्हाताऱ्याला त्या जीभ कापलेल्या चिमणीपासून मिळालेली धनसंपत्ती त्याने अतिशय काळजीपूर्वक खर्च केली.

*****

कोळयाचा पोरगा उराशिमा तारोची गोष्ट

फार फार वर्षांपूर्वी जपानच्या किनाऱ्यावरील टँगोच्या प्रांतात मिझु-नो-ये च्या छोट्याशा मच्छीमारांच्या खेड्यात एक तरूण कोळी राहत होता. त्याचे नाव होते उराशिमा तारो. त्याच्या पूर्वी त्याचे वडिल कोळी होते, आणि त्यांचे कौशल्य त्याच्या मुलात दुपटीने उतरले होते कारण उराशिमा त्या ग्रामीण भागात सर्वात कुशल कोळी होता. त्याचे साथीदार एका आठवड्यात पकडू शकणार नाहीत त्यापेक्षा अधिक बोनितो आणि ताई सारखे सागरी आणि गोड्या पाण्यातले मोठे मासे तो एका दिवसात पकडायचा पण कोळयांच्या त्या छोट्याशा खेड्यात, चलाख सागरी कोळयांबरोबरच तो दयाळू अंतःकरणाचा म्हणून अधिक प्रसिद्ध होता.

त्याच्या संपूर्ण आयुष्यात त्याने कुणालाही दुखावले नव्हते, ना लहानांना ना मोठ्यांना. जेव्हा तो मुलगा होता तेव्हा त्याचे सोबती त्याला नेहमी हसायचे, कारण तो प्राण्यांची क्रूर थट्टा करण्यात त्यांच्यात सहभागी होत नसे. पण तो नेहमी त्यांना ह्या निर्दयी खेळापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करीत असे.

जेव्हा उन्हाळ्याच्या एका अंधूक तिन्हीसांजेच्या वेळी दिवसा अखेरीचे मासेमारीचे काम आटोपून तो येत होता तेव्हा त्याला अचानक मुलांचा कंपू दिसला. ते सर्वजण किंचाळत होते आणि उंच आवाजात बोलत होते आणि कशाविषयी तरी त्यांच्या मनात खळबळ माजली होती. ही काय भानगड आहे हे पाहण्यासाठी तो तेथे गेल्यावर त्याला दिसले की ते एका कासवाला छळत आहेत. पहिला एक मुलगा त्याला ह्या बाजूने ओढत होता, नंतर दुसरा मुलगा त्या बाजूने ओढत होता. तिसरा मुलगा त्याचवेळी त्याला काठीने मारीत होता आणि चवथा मुलगा त्याच्या कवचाला दगडाने ठेचत होता.

आता उराशिमाला त्या गरीब बिचाऱ्या कासवाबद्दल खूप वाईट वाटले आणि त्याने त्याला वाचविण्याचे ठरविले. तो मुलांना म्हणाला,

"हे पहा मुलांनो, तुम्ही त्या गरीब बिचाऱ्या कासवाला इतकी वाईट वागणूक देत आहात की अशाने तो लवकरच मरेल!"

प्राण्यांच्या बाबतीत क्रूर होऊन त्यांना छळण्यात आनंद मानणाऱ्या वयातल्या त्या मुलांनी उराशिमाच्या कोमल नापसंतीच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. त्यातील एक मोठा मुलगा उत्तरलाः

"ते जगो की मरो कुणाला त्याची फिकीर? हे मुलांनो चालू द्या तुम्ही!"

आणि त्यांनी न थांबता त्या कासवाला अधिकाधिक क्रूरपणे छळायला सुरुवात केली. उराशिमा क्षणभर थांबला आणि त्या मुलांना कसे उत्तमरित्या हाताळायचे म्हणून दुसरा पर्याय शोधू लागला. जेणे करून कासवाला त्यांनी

त्याच्याकडे सोडून द्यावे म्हणून त्याने त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला, म्हणून त्यांच्याकडे पाहून गालात हसत तो म्हणालाः

“मला खात्री आहे तुम्ही खूप चांगली दयाळू मुलं आहात! आता तुम्ही मला ते कासव देणार नाहीत का? मला ते फार आवडेल!”

“नाही, आम्ही ते कासव तुला मुळीच देणार नाही.” त्यांच्यापैकी एक मुलगा म्हणाला. “का द्यावे ते आम्ही? आम्ही ते आमच्यासाठी पकडले आहे.”

“तुम्ही जे काही म्हणता ते खरे आहे,” उराशिमा म्हणाला. “पण तुम्हाला काहीही न देता मी ते मागत नाही. त्या बदल्यात मी तुम्हाला काही पैसे देतो—दुसऱ्या शब्दात ओजिसान (काका) तुमच्याकडून ते विकत घेतील. हे नको आहे का तुम्हाला माझ्या मुलांनो?” प्रत्येक नाण्याच्या मध्यभागी—असलेल्या छिद्रातून धागाच्या तुकड्याने ओवलेले पैसे त्याने त्यांच्या पुढ्यात ठेवले. “बघा मुलांनो ह्या पैशांनी तुम्हाला हवं ते काहीही तुम्ही विकत घेऊ शकता. ह्या गरीब बिचाऱ्या कासवाबरोबर तुम्ही जे काही करू शकता त्यापेक्षा अधिक काहीतरी ह्या पैशांनी तुम्ही करू शकाल. बघा तुम्ही किती चांगली मुलं आहात. माझं ऐकाल तुम्ही.”

ती मुलं मुळीच वाईट नव्हती, ती फक्त खोडकर होती. आणि जेव्हा उराशिमा बोलला तेव्हा त्याच्या दयाळू स्मित हास्यानेआणि मृदू शब्दांनी ते

आकर्षिले गेले आणि “त्यांच्या आनंदात ते सहभागी झाले.”जसे ते जपानमध्ये म्हणतात. हळूहळू ते त्याच्याकडे पोहोचले, त्या छोट्याशा टाळीच्या म्होरक्याने ते कासव त्याच्या पुढ्यात धरून म्हटलेः

“ठिक आहे, ओजिसान, जर तुम्ही पैसे दिले तर आम्ही हे कासव तुम्हाला देऊ!” आणि उराशिमाने कासव घेतले आणि त्या मुलांना पैसे दिले जे आरडाओरडा करीत झटकन नाहीसे झाले.

मग उराशिमाने त्या कासवाच्या पाठीवर थोपटले आणि तो म्हणाला, “अरे, तू गरीब बिचाऱ्या जीवा! गरीब बिचाऱ्या जीवा! –बघ, बघ! आता तू सुरक्षित आहेस!”

असं म्हणतात थोपटण्याला हजार वर्षांचं आयुष्य लाभतं, पण कासवाला दहा हजार वर्षे लाभेल. ह्या जगात तुला कुठल्याही प्राण्यापेक्षा जास्त आयुष्य आहे, आणि तुझ्या मौल्यवान जीवनाला त्या क्रूर मुलांकडून मध्येच तोडलं गेलं असतं अशा मोठ्या धोक्यात तू होतास. सुदैवाने मी इकडून जात होतो आणि तुला वाचवलं आणि म्हणून अद्याप तुझं जीवन आहे. आता मी तुला माघारी तुझ्या घरी, समुद्रात लगेच घेऊन जातो. आता पुन्हा पकडला जाऊ नकोस, कारण मग नंतर पुढच्या वेळी तुला वाचवायला कुणीच नसेल.

तो दयाळू अंतःकरणाचा मच्छीमार चालता चालता बोलतच किनाऱ्यावरील खडकांवर आला, नंतर त्याने कासवाला पाण्यात सोडले आणि तो प्राणी नजरेआड होईपर्यंत पाहत राहिला. आणि तो घराकडे जायला वळला कारण तो थकला होता आणि सूर्यही बुडून गेला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी उराशिमा नेहमीप्रमाणे आपल्या नावेत बाहेर पडला. वातावरण खूपच छान होते. समुद्र आणि आकाश दोघेही निळे होते आणि विरळ

धुके असलेल्या उन्हाळ्याच्या रम्य सकाळी शांत होते. उराशिमा आपल्या नावेत बसला आणि स्वप्नाळूपणे पूर्वीसारखा दोर फेकून तो समुद्रात निघाला. त्याने दुसऱ्या मासेमारी नावांना लवकरच मागे टाकले, इतक्या अंतरावर की त्या दिसेनाशा झाल्या आणि त्याची नाव निळ्या जलाशयावरून सारखी पुढे पुढे जातच राहिली. तथापि त्याला स्वतःलाच कळत नव्हते की त्या सकाळी तो विलक्षण आनंदात होता, मानवी जीवनाच्या थोड्याशा कालावधी ऐवजी त्याने त्या कासवाला हजारो वर्षांचे आयुष्य प्रदान करण्याची इच्छा केली होती.

त्याच्या ह्या विचार समाधीतून अचानक धक्का बसून तो जागा झाला. त्याच्या स्वतःच्या नावाच्या हाका त्याला ऐकू येत होत्या.

"उराशिमा,उराशिमा!"

घंटानादासारखा स्पष्ट आणि ग्रीष्म ऋतूतील मंद मंद वायूसारखे त्याचे नाव समुद्रावर तरंगत होते. तो उभा राहिला आणि त्याने सर्व दिशांकडे नजर फिरविली. त्याला वाटले की दुसरी नाव त्याला ओलांडून पुढे गेली असणार, त्याने त्याला शक्य होईल तेवढ्या लांबवर पसरलेल्या पाण्यावर एकटक नजरेने पाहिले, जवळ किंवा दूर त्याला कुठल्याही नावेचा मागमूस दिसला नाही, म्हणजेच तो आवाज कोणत्याही मनुष्य प्राण्याचा असू शकत नव्हता.

त्याला धक्काच बसला. इतक्या स्पष्टपणे त्याला कुणी हाक मारली असावी या आश्चर्याने त्याने स्वतःभोवती फिरून सर्व दिशांना पाहिले आणि त्याला दिसले की त्याला ठाऊक नसताना ते कासव नावेच्या बाजूला आलेले होते. उराशिमाने विस्मयाने पाहिले. आदल्या दिवशी त्याने ज्याला वाचविले तेच ते कासव होते. "ठीक, श्रीयुत कासव महाराज," उराशिमा म्हणाला, "तो तूच होतास का ज्याने माझ्या नावाने आत्ताच हाक मारली?"

कासवाने अनेकदा मान डोलावली आणि म्हणालाः

“होय, मीच तो. आपल्या उदात्त छायेखाली माझ्या जीवनाचं रक्षण झालं. (ओ कागे समा दे) मी छान असून तुमचा आभारी आहे आणि मी येथे आलो ते तुमचे आभार मानण्यासाठी आणि तुमच्या दयाळुपणाबद्दल मी किती कृतज्ञ आहे हे सांगण्यासाठी.”

“खरोखर,” उराशिमा म्हणाला, “ही तुझी अतीव नम्रता आहे. वर नावेत ये. मी तुला धुम्रपान देऊ करेन पण तू कासव असल्यामुळे निःसंशय तू धूम्रपान करीत नसावा.”आणि तो धीवर ह्या विनोदावर हसला. “ही- ही- ही- ही!” कासवही हसला. “साके (तांदळाची दारू)हेच माझे प्रिय रसपान आहे, पण मला तंबाखू आवडत नाही.”

“खरंय,” उराशिमा म्हणाला. “मी खूप दिलगीर आहे की तुला देऊ करण्यासाठी माझ्या नावेत साके नाही, पण वर ये, उन्हात तुझी पाठ वाळव—कासवाला असं करणं नेहमीच आवडतं.”

मग कासव नावेत चढलं. धीवराने त्याला मदत केली आणि एकमेकांच्या आवडी निवडीच्या गप्पा-टप्पा केल्यानंतर कासव म्हणालेः

“तू कधी सागर सम्राट नागराज याचा रिन गिन राजवाडा पाहिला आहेस का उराशिमा?”

मच्छिमाराने मान हलवली आणि तो उत्तरला, “नाही, वर्षानुवर्षांनंतर समुद्र माझं घर झालं आहे पण जरी मी सागराखाली असलेल्या नागराजाच्या पाताळलोकाविषयी अनेकदा ऐकलं आहे तरी तो अद्‌भुत राजवाडा माझ्या दृष्टीस कधी पडला नाही. जरी तो अस्तित्वात असलाच तरी तो खूप दूर असला पाहिजे!”

“हे खरं आहे का? तू त्या सागर सम्राटाचा राजवाडा कधीही पाहिला नाहीस? मग ह्या संपूर्ण विश्वातील अद्‌भुत व नयनरम्य स्थळ तुझ्या नजरेतून सुटले. तो खूप लांब समुद्राच्या तळाशी आहे, पण मी तुला तेथे नेईन. आपण लवकरच तेथे पोहोचू. जर तुला त्या सागर सम्राटाचे साम्राज्य बघायचे असेल तर मी तुझा मार्गदर्शक होईन.”

“मला निश्चितच तेथे जायला आवडेल आणि मला तेथे नेण्याचा विचार करणारा तू खूप दयाळू आहेस. पण तुला हे लक्षात ठेवायला हवे की मी फक्त एक गरीब मर्त्य मानव असून मला तुझ्यासारख्या समुद्रातील प्राण्यांइतके पोहण्याचे सामर्थ्य नाही-”

मच्छिमाराने अजून काही बोलण्याच्या आत कासवाने त्याला थांबवीत म्हटले, “काय? तुला स्वतःला पोहण्याची आवश्यकता नाही. जर तू माझ्या पाठीवर स्वार झालास तर कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ न देता मी तुला नेईन.”

“पण,” उराशिमा म्हणाला, “तुझ्या ह्या इवल्याशा पाठीवर स्वार होणं मला कसं शक्य आहे?”

“तुला ते कदाचित हास्यास्पद वाटेल, पण मी तुला खात्रीपूर्वक सांगतो की मी ते करू शकतो, तू लगेच प्रयत्न करून बघ! आत्ताच माझ्या पाठीवर बस आणि बघ तू विचार केल्याप्रमाणे अशक्य आहे का?”

कासवाने आपलं बोलणं संपवलं. उराशिमाने त्याच्या कवचाकडे बघितले आणि काय आश्चर्य तो प्राणी अकस्मात इतका मोठा झाला की एखादा माणूस त्याच्या पाठीवर सहज बसू शकेल.

“हे खरोखर विलक्षण आहे!” उराशिमा म्हणाला, “मग श्रीयुत कासव महाशय, तुमच्या दयाळू परवानगीने तुमच्या पाठीवर बसतो. दोकोइशो!” (टीपः “ठीक”. हा शब्द फक्त खालच्या दर्जाच्या लोकांकडून वापरला जातो.) जशी त्याने वर उडी मारली तसा तो उद्गारला.

जणूकाही ही विचित्र कृती म्हणजे सर्वसामान्य घटना आहे ह्या भावनेने कासव आपला चेहरा अविचल ठेवून म्हणाला, “आता आपण आपल्या सवडीनुसार सावकाश निघूया.” आणि हे शब्द उच्चारून त्यानेआपल्या पाठीवरील उराशिमासह समुद्रात उडी घेतली. पाण्यामधून खाली कासवाने झेप घेतली. बऱ्याच वेळापर्यंत हे दोघेही विक्षिप्त सोबती पाण्यामधून प्रवास करीत होते. उराशिमा ना कदापि थकला, ना त्याचे कपडे पाण्याने ओले झाले. शेवटी खूप दूर अंतरावर आल्यावर नंतर एक दैदिप्यमान द्वार, आणि त्या द्वाराच्या मागे क्षितिजावर राजवाड्याची लांब छपरे दृष्टोत्पत्तीस आली.

“होय.” उराशिमा उद्गारला. “एखाद्या भव्य राजवाड्याचे द्वार वाटावे तसे हे दिसते! कासव महाशय मला सांगाल का की कोणतं ठिकाण आपण आता पाहू शकणार आहोत?”

“ते प्रचंड द्वार रिन गिन राजवाड्याचे आहे, द्वारामागे तुम्ही जे विशाल छप्पर बघता आहात ते त्या सागर सम्राटाच्या राजवाड्याचे आहे.”

“मग अखेरीस आपण सागर सम्राटाच्या प्रदेशात आणि राजवाड्याच्या परिसरात आलो.” उराशिमा म्हणाला.

“होय, खरोखर” कासवाने उत्तर दिले. “आणि तुम्हाला वाटत नाही का आपण किती जलद आलो ते?” आणि हे बोलत असतानाच कासव द्वाराच्या बाजूला पोहोचले. “आलो आपण एकदाचे येथे, तुम्हाला कृपया येथूनच चालावे लागेल.”

कासव पुढे गेले आणि द्वारपालाशी बोलू लागले. ते म्हणाले, “जपान देशातील हे उरोशिमा तारो आहेत. त्यांना मी सन्मानाने निमंत्रित करून पाहुणा म्हणून या राज्यात आणले आहे. कृपया त्यांना मार्ग दाखवा.”

नंतर द्वारपालाने, जो मासा होता, तात्काळ त्यांच्या समोरील द्वारातून पुढे होऊन त्यांना मार्ग दाखविला. सागर सम्राट नागराजाचे तांबडा बांगडा, फ्लंडर, लेफ, करल आणि सर्व नोकर चाकरांचे प्रमुख ह्यांनी मोठ्या आदराने वाकून पाहुण्याचे स्वागत केले.

“उराशिमा (समा) महाशय, सागर राजवाड्यात सागर सम्राट नागराजाच्या दरबारी तुमचे स्वागत असो. इतक्या दूरवरच्या देशातून आल्याबद्दल तुमचे त्रिवार स्वागत. आणि तुम्ही कासव महाशय, उराशिमांना येथपर्यंत आणण्यात इतका सर्व त्रास घेतल्याबद्दल आम्ही तुमचे खूप खूप आभारी आहोत.” नंतर उराशिमाकडे वळून ते म्हणाले, “कृपया यावे असे मागे मागे.” आणि येथून माशांचा सबंध समूह त्याचा मार्गदर्शक बनला.

उराशिमाला, एका गरीब मच्छिमाऱ्याला राजवाड्यात कसे वागावे हे कळेना, पण जरी त्याच्यासाठी हे सगळे अपरिचित होते तरी तो लाजला नाही किंवा संभ्रमातही पडला नाही, तो अत्यंत शांतपणे त्याच्या दयाळू मार्गदर्शकामागून चालत होता जो त्याला राजवाड्याच्या आतील भागात नेत होता. जेव्हा तो प्रवेशद्वाराजवळ पोहोचला तेव्हा ती सुंदर राजकुमारी तिच्या दास्यांबरोबर त्याचे स्वागत करण्यासाठी बाहेर आली. इतर कुठल्याही मानवी प्राण्यापेक्षा ती सुंदर

होती. तिने लाल आणि फिकट हिरव्या रंगाची वस्त्रे परिधान केलेली होती जशी काही ती लाटांखाली झुळझुळत होती, आणि तिच्या झग्याच्या चुण्यांमधून सोनेरी धागे लखलखत होते. शतकांपूर्वीच्या राजकन्येच्या वेषभूषेच्या पद्धतीप्रमाणे तिचे काळे भोर केस तिच्या खांद्यावर रूळत होते, आणि जेव्हा ती संभाषण करायची तेव्हा तिच्या कंठध्वनीचा निनाद पाण्यावरून येणाऱ्या संगीतासारखा यायचा. तिच्याकडे पाहिल्याबरोबर विस्मयात तो इतका हरवून गेला की तो बोलूच शकत नव्हता. नंतर त्याला आठवले की त्याला आदराने वाकायला हवे, पण अभिवादन करण्यासाठी तो खाली वाकणार तेवढ्यात राजकन्येने त्याचा हात आपल्या हातात घेतला आणि त्याला एका सुंदरदिवाणखान्यात नेले आणि सर्वोच्च सन्मानाच्या आसनावर बसण्यासाठी पाचारण केले.

"उराशिमा तारो, माझ्या वडिलांच्या राज्यात तुझे स्वागत करताना मला परम-आनंद होत आहे." राजकन्या म्हणाली. "काल तुम्ही एका कासवाची सुटका केली आणि माझा प्राण वाचविल्याबद्दल आभार मानण्यासाठी मी तुम्हाला येथे बोलविले, कारण ते कासव मीच होते. तुम्हाला आवडेल तर तुम्ही ह्या अक्षय यौवनाच्या देशात राहू शकता, जेथे ग्रीष्म कधीही संपत नाही, दुःखाचे कदापि आगमन होत नाही. आणि जर तुमची इच्छा असेल तर मी तुमची पत्नी बनेन आणि मग ह्यापुढे आपण निरंतर एकमेकांच्या सहवासात राहू!"

तिचे हे मधुर शब्द ऐकल्यावर त्याने तिच्या चेहऱ्याकडे अनिमिष नेत्रांनी बघितले. त्याचे अंतःकरण विस्मय आणि आनंदाने भरून आले. आणि हे सारे स्वप्न तर नाही ना ह्या आश्चर्याने तो उत्तरला,

"तुमच्या या दयाळू वचनांबद्दल सहस्त्र धन्यवाद, ज्याबद्दल मी सदोदित ऐकले आहे पण पाहिले कदापि नव्हते अशा तुमच्या सुंदर देशात मला रहायला दिलेली

अनुज्ञा मानण्यापलिकडे मला सारं तुच्छ वाटते. शब्दांच्या पलिकडे, हे सुंदर अतिशय अद्‌भूत ठिकाण मी कधीही पाहिले नाही."

जेव्हा तो बोलत होता तेव्हा माशांची रांग प्रगट झाली. सर्वांनी समारंभाचे पोषाख आणि पदवी चिन्हे असलेली वस्त्रे परिधान केलेली होती. एकापाठोपाठ शांतपणे दिमाखदार पावले टाकीत त्यांनी दिवाणखान्यात प्रवेश केला. त्यांच्याजवळ स्वादिष्ट माशांच्या पदार्थांचे आणि शेवाळयांची तबके होती आणि ती सारी वधुवरांच्या समोर मांडण्यात आली. अशी अद्‌भूत मेजवानी स्वप्नातही कुणी पाहिली नसेल. लग्नाचा सोहळा नेत्रदिपक व अद्‌भूत होता आणि त्या राजाच्या राज्यात मोठा आनंदोत्सव झाला. जेव्हा ते युगुल लग्न-बंधनात बांधले गेले तेव्हा त्यांना एकमेकांना विवाहाप्रीत्यर्थ प्रेमाची भेट म्हणून मद्याचे प्याले दिले गेले. तीन वेळा तीन प्रकारचे संगीत वाजविले गेले, गीते गायली गेली, चंदेरी खवले आणि सोनेरी शेपटी असलेल्या माशांनी लाटांमधून खाली उतरून नृत्य केले. उराशिमाने अगदी मनसोक्तपणे आनंद लुटला. त्याच्या सबंध आयुष्यात अशा विस्मयपूर्ण मेजवानी पुढे तो कधीही बसला नव्हता.

जेव्हा मेजवानी संपली तेव्हा राजकन्येने नवरदेवाला राजवाड्यात फिरून येण्यासाठी विनंती केली. नंतर तो आनंदी धीवर त्याच्या वधूच्या, सागरसम्राटाच्या कन्येच्या मागे गेला आणि त्याला भुरळ पाडणाऱ्या राज्यातील अद्‌भूतरम्य गोष्टी दाखविण्यात आल्या, जेथे यौवन आणि आनंद हातात हात घालून वास्तव्य करीत होते. ज्याठिकाणी काळ आणि वार्धक्य स्पर्श करू शकत नव्हते. तो राजवाडा मोत्या-पोवळयांनी अलंकृत केलेला होता, आणि त्या स्थळाचे सौंदर्य आणि चमत्कार इतके उत्कृष्ट होते की त्याचे वर्णन करायला जिव्हा अपुरी पडावी.

पण उराशिमाला सर्वात अधिक विस्मयकारक वाटले ते राजवाड्याभोवती असलेले उद्यान. येथे त्याला चार भिन्न ऋतूंचे सृष्टिसौंदर्य एकाच वेळी बघायला

मिळाले. ग्रीष्म आणि हेमंत, वसंत आणि शरद ह्या ऋतूंची रमणीयता ही सारी दृश्ये एकाच वेळी त्या विस्मयचकित झालेल्या पाहुण्याला बघायला मिळाली.

पहिल्यांदा त्याने पूर्वेला पाहिले, कर्कंधू (plum)आणि चेरीची वृक्षे पूर्ण बहरात होती. बुलबुल गुलाबी झाडांमध्ये गात होते आणि फुलपाखरू ह्या फुलावरून त्या फुलावर भुर भुर उडत होते.

दक्षिणेकडे पाहिल्यास वृक्षे ग्रीष्माच्या पूर्णतेने हिरवीगार होती. दिवाकिडे आणि रातकिड्यांची किर्र किर्र मोठ्याने ऐकू येत होती.

पश्चिमेला पाहिल्यास शरदातील मॅपलवृक्ष आकाशातील सूर्यास्तासारखे तळपत होते आणि झेंडूची फुलझाडे परिपक्व झालेली होती.

उत्तरेला उराशिमाला परिवर्तन दिसायला लागले. कारण हिम तुषारांनी जमीन चंदेरीशुभ्र दिसत होती आणि वृक्ष वेणू बर्फाच्छादित झाली होती आणि जलाशये बर्फाने गच्च भरली होती.

प्रत्येक दिवशी उराशिमासाठी एक नवा चमत्कार, नवा आनंद तेथे होता. त्याचे हे सौख्य इतके मोठे होते की तो सारे काही विसरला. अगदी आपलं घर, माता-पिता आणि त्याचा देश सुद्धा. आपण मागे काय सोडून आलो ह्याचा विचारही न येता तीन दिवस निघून गेले. नंतर त्याचे मन ताळ्यावर आले आणि त्याला आठवले की आपण कोण आहोत आणि आपण ह्या अद्‌भूत जगातले नाही किंवा सागरसम्राटाच्या राजवाड्याचेही नाही. तो स्वतःशीच म्हणाला,

“अरेरे! मला येथे थांबायला नको, कारण माझे माता पिता घरी आहेत. एवढ्या काळात काय घडले असेल त्यांच्याबाबतीत? नेहमीप्रमाणे मी परत न आल्यामुळे ह्या दिवसात ते खूप चिंता करीत असतील. आता एकही दिवस येथे न

राहता मला लगेच परत जायला हवे." आणि मोठ्या घाईघाईने त्याने परतीच्या प्रवासाची तयारी सुरू केली.

नंतर तो त्याच्या सुंदर पत्नीकडे, राजकन्येकडे गेला. खाली वाकून नमस्कार करीत तो म्हणाला, "खरोखर खूप काळापर्यंत तुमच्यासोबत मी आनंदात होतो, ओतोहिमे सामा (हे तिचं नाव होतं) आणि किती दयाळू अंतःकरणाने तुम्ही माझ्याशी वागलात, हे कुठलेही शब्द सांगू शकणार नाहीत. पण आता मला तुमचा निरोप घ्यायला हवा. मला माझ्या वृद्ध माता-पित्यांकडे जायलाच हवे."

मग ओतोहिमे सामा रडायला लागली आणि ती खिन्न अंतःकरणाने आणि मृदू स्वरात म्हणाली, "आपण येथे कुशल नाही का? उराशिमा, की तुम्ही मला इतक्या लवकर सोडून जात आहात? कसली घाई आहे? अजून एक दिवस माझ्यासोबत थांबा!"

पण उराशिमाला आपल्या वृद्ध माता-पित्यांची आठवण आली होती आणि जपानमध्ये माता-पित्याच्या कर्तव्यापेक्षा कुठलीही गोष्ट महत्त्वाची नसते, सुखापेक्षा किंवा प्रेमापेक्षाही, म्हणून तो आपल्या दृढनिश्चयापासून ढळला नाही, पण उत्तरला,

"खरंच, मला जायलाच हवं. असा विचार करू नका की मी तुम्हाला सोडून जात आहे. हे तसं नाही. मला जाऊन माझ्या आईवडिलांना भेटायलाच हवं. मला फक्त एक दिवस जाऊ दे आणि मी परत येईन."

"मग,"राजकन्या दुःखाने म्हणाली, "आता काही करता येणे शक्य नाही. मी तुम्हाला माझ्याकडे एकही दिवस ठेवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी तुमच्या आईवडिलांकडे आजच पाठविते, माझ्या प्रेमाचे प्रतिक म्हणून मी तुम्हाला हे देते

आहे—कृपया तुम्ही ते घेऊन जा," आणि तिने एक लकाकणारी लाल रेशमी गोंडे असलेल्या दोरखंडानी बांधलेली सुंदर पेटी आणली.

उराशिमाला आधीच त्या राजकन्येपासून इतके काही मिळालेले होते की त्याला भेटवस्तू स्वीकारताना अपराध्यासारखे वाटत होते, तो म्हणाला, "आपले आत्तापर्यंत माझ्यावर खूप उपकार झालेले आहेत म्हणून तुमच्याकडून ही भेटवस्तू स्वीकारणं योग्य वाटत नाही, तरीपण तुमची इच्छाच आहे तर घेतो," आणि तो पुढे म्हणाला,

"सांगा मला ह्या सुंदर पेटीत काय आहे ते?"

"ही," राजकन्या उत्तरली. "ही तामाते-बॅको (हि़ऱ्याच्या पंजाची पेटी) आहे आणि ह्यात काहीतरी खूप मौल्यवान आहे. तुम्ही ही पेटी उघडता कामा नये, काहीही झालं तरी! जर तुम्ही ती उघडली तर भयंकर घडेल तुमच्यासाठी! आता मला वचन द्या की तुम्ही ही पेटी कदापि उघडणार नाही!" आणि उराशिमाने वचन दिले की ती पेटी तो कदापि उघडणार नाही—काहीही झाले तरीही.

नंतर ओतोहिमे सामाचा निरोप घेऊन तो समुद्र किना़ऱ्याकडे खाली गेला, राजकन्या आणि तिच्या नेकर चाकरांचा लवाजमा त्याच्या मागोमाग गेला आणि तेथे त्याला एक प्रचंड कासव त्याची वाट बघत असलेले दिसले.

तो पटकन त्या प्राण्यावर स्वार झाला आणि त्याने त्याला चमकणा़ऱ्या समुद्रावरून पूर्वेत नेले. त्याने मागे वळून पाहिले आणि ओतोहिमे सामाला ती कायमची नाहीशी होईपर्यंत हात केला, आणि त्या सागर सम्राटाच्या अद्‌भूत राजवाड्याची भूमी दूर दूर अंतरावर नाहीशी झाली. मग आपल्या देशाकडे मोठ्या उत्साहाने त्याने नजर वळविली, त्याने त्याच्यापुढे क्षितिजावर उगवत्या निळ्या टेकड्या बघितल्या. शेवटी त्या कासवाने त्याला एका उपसागरात नेले, तो जेथून

आला होता तो किनारा त्याला चांगलाच ठाऊक होता. तो किनाऱ्यावर उतरला आणि त्याने त्या कासवाला सागर सम्राटाच्या साम्राज्यात परत जाताना पाहिले.

पण उराशिमा तेथे उभा राहिला आणि पाहतो तो एका विचित्र भीतीने का त्रस्त झाला? त्याच्या जवळून जाणाऱ्या लोकांकडे त्याची नजर का खिळली, आणि ते त्याच्याकडे वळून का बघत होते? किनारा तोच, टेकड्याही त्याच पण त्याच्या बाजूने जाणाऱ्या लोकांचे चेहरे त्याला जरी चांगले परिचित होते तरी पूर्वीपेक्षा ते वेगळेच दिसत होते. ह्याचा अर्थ काय म्हणून आश्चर्यचकित होत तो चटकन आपल्या जुन्या घराकडे चालू लागला. जरी ते वेगळे दिसत होते, पण ते त्याच ठिकाणी उभे होते. त्याने हाक मारली, "बाबा, मी आत्ताच परतलोय!" आणि तो आत प्रवेश करणार तोच त्याने पाहिले की एक अनोळखी माणूस बाहेर पडत आहे.

"कदाचित मी बाहेर गेलो असताना माझे आईवडिल दुसरीकडे रहायला गेले असणार." असा तो कोळी विचार करीत होता. त्याला काहीसे विचित्र चिंताक्रांत झाल्यासारखे वाटत होते, पण का हे तो सांगू शकत नव्हता.

"माफ करा,"त्याच्याकडे टक लावून बघत असणाऱ्या माणसाला तो म्हणाला, "पण अजूनही काही दिवसांपूर्वी मी ह्या घरात राहत होतो. माझं नाव उराशिमा तारो. मी माझ्या आईवडिलांना येथे सोडून गेलो होतो, कोठे गेले ते?"

त्या माणसाचा चेहरा गोंधळलेला दिसू लागला. तो अजूनही एकटक उराशिमाच्या चेहऱ्याकडे बघत होता, तो म्हणाला, "काय? तू उराशिमा तारो आहेस?"

"होय," तो कोळी म्हणाला, "मी उराशिमा तारो!"

“हा, हा!” तो माणूस हसला, “तू अशी थट्टा करायला नको. हे खरं आहे की उराशिमा तारो नावाचा माणूस तीनशे वर्षांपूर्वी होऊन गेला जो ह्या खेड्यात रहात होता. पण ही गोष्ट तीनशे वर्षांपूर्वीची जुनी आहे. तो आता जिवंत असण्याची शक्यताच नाही!”

जेव्हा उराशिमाने हे विचित्र शब्द ऐकले तेव्हा तो घाबरला आणि म्हणाला, “कृपा करा, कृपा करा, माझी अशी थट्टा करू नका; मी खूप गोंधळून गेलो आहे. मी खरोखर उराशिमा तारो आहे, आणि मी निश्चितच तीनशे वर्षे जगलो नाही. चार किंवा पाच दिवसांपूर्वी मी ह्याच जागेवर राहत होतो. सांगा मला, मला हे सारं अधिक चेष्टेविना कळायला हवं.”

पण त्या माणसाचा चेहरा अधिकाधिक गंभीर होत गेला, आणि तो उत्तरला, “तू उराशिमा असशील किंवा नसशीलही, मला ठाऊक नाही. पण उराशिमा तारो नावाच्या माणसाबद्दल मी ऐकले आहे जो तीनशे वर्षांपूर्वी जिवंत होता. कदाचित तू त्याचा आत्मा असणार आणि तुझ्या जुन्या घराला पुनर्भेट द्यायला आला असणार?”

“का माझी खिल्ली उडविता तुम्ही?” उराशिमा म्हणला. “मी आत्मा नाही! मी जिवंत माणूस आहे. तू माझे पाय बघितले नाहीस काय?” आणि त्या माणसाला दाखविण्यासाठी त्याने ‘दाण दाण’ जमिनीवर पाय आपटले, आधी पहिला नंतर दुसरा. (जपानी भुतांना पाय नसतात.)

“पण उराशिमा तारो तीनशे वर्षांपूर्वी होऊन गेला. हे सारं मला ठाऊक आहे, कारण ते खेड्याच्या बखरीत लिहिलेलं आहे.” त्या माणसाने हट्ट सोडला नाही, तो त्या कोळ्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवू शकत नव्हता.

उराशिमा गोंधळ आणि चिंतेत हरवून गेला. तो उभा राहून त्याच्याभोवती बघू लागला, भयंकर गोंधळलेला, आणि खरोखर, तो जाण्यापूर्वी त्याच्या लक्षात असलेल्या सा़ऱ्या गोष्टी वेगळ्या स्वरूपात दिसत होत्या, आणि त्याला भयानक जाणीव झाली ती ही की तो माणूस जे काही बोलत होता ते कदाचित खरे आहे. त्याला वाटलं की आपण काहीतरी विलक्षण स्वप्नच बघत आहोत. समुद्राच्या पलिकडे सागर सम्राटाच्या राजवाड्यात आपण जे दिवस घालविले ते सारे दिवसच नव्हे तर, ती शेकडो वर्षे होती, आणि त्या कालावधीत त्याचे आईवडिल कालवश झाले होते. ज्या खेड्याला तो नेहमी ओळखत होता ते आणि तेथील लोक ह्यांनी त्याची कथा लिहून ठेवली होती. आता येथे फार काळ राहण्यात अर्थ नाही. त्याला समुद्रापलिकडे त्याच्या सुंदर पत्नीकडे जायलाच हवे होते.

राजकन्येने दिलेल्या पेटीला हातात धरून तो समुद्रकिना़ऱ्याकडे चालू लागला. पण कोणता रस्ता होता?

तो एकटा शोधू शकत नव्हता. अचानक त्याला त्या पेटीची आठवण झाली—तामाते-बॅको.

“राजकन्येने ही पेटी देताना मला सांगितले होते की ही सुंदर पेटी तू कदापि उघडू नकोस-तिच्यात मौल्यवान वस्तू ठेवलेल्या आहेत. पण आता मला घर नाही,

येथे मला जे काही प्रिय होते ते सारे मी गमावले, आणि माझं हृदय दुःखाने कमकुवत झाले आहे. अशा वेळी जर मी ती पेटी उघडली तर ज्याने मला मदत होईल असे काहीतरी मला सापडेल, काहीतरी जे मला समुद्रावरून माझ्या सुंदर राजकुमारीकडे घेऊन जायला मार्ग दाखवेल. आता ह्याशिवाय माझ्याकडे काहीही पर्याय उरला नाही. होय, होय मी ती पेटी उघडीन आणि आत पाहीन!"

आणि त्याच्या मनाने आज्ञाभंग करण्याच्या कृतीला अनुमती दिली, तरी त्याने स्वतःच्या मनाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला आणि त्याला वाटले वचनभंग करणे हेच योग्य आहे.

हळूहळू, खूप हळू त्याने त्या लाल रेशमी दोरखंडाची गाठ सोडली, हळुवारपणे आणि नवलाईने त्याने त्या मौल्यवान पेटीचे झाकण उघडले. आणि काय दिसले त्याला आत? काय चमत्कार फक्त एक छोटासा सुंदर जांभळा ढग त्या पेटीतून तीन धुसर पुंजक्यांनी बाहेर पडला. निमिषार्धात त्याने त्याचा चेहरा

व्यापला आणि त्याच्यावरून झुळझुळला जणूकाही तो जायला नाखूष होता, आणि मग तो फेसासारखा समुद्रावरून तरंगत निघून गेला.

उराशिमा जो अजूनही त्या क्षणापर्यंत चोविशीतील देखणा तरणा बांड पुरूष होता, अकस्मात खूप, खूप म्हातारा झाला. वयोमानानुसार त्याची पाठ वाकली, आणि केस बर्फासारखे पांढरेशुभ्र झाले, त्याच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडल्या आणि तो त्या समुद्रकिनाऱ्यावर पडला आणि मरण पावला.

बिचारा उराशिमा! आज्ञाभंग केल्यामुळे समुद्राच्या पलिकडे असलेला सागर सम्राटाच्या साम्राज्याकडे किंवा त्या सुंदर राजकन्येकडे कधीच परत जाऊ शकला नाही.

लहान मुलांनो, तुमच्या पेक्षा सूज्ञ, शहाण्या असलेल्यांचा कदापि आज्ञाभंग करू नका, कारण आज्ञाभंगामुळे दुर्दशा आणि दुःखमय जीवनाला आरंभ होतो.

*****

शेतकरी आणि ऊदमांजर

फार फार वर्षांपूर्वी एक शेतकरी आणि त्याची बायको शहरापासून दूर पर्वतांमध्ये आपले घर बनवून रहात होते. त्यांचा फक्त एक दुष्ट आणि विद्वेषी शेजारी होता तो म्हणजे ऊदमांजर. दररोज रात्री तो ऊदमांजर बाहेर यायचा आणि शेतात सैरावैरा धावून, त्या शेतकऱ्याने खूप वेळ खर्च करून काळजीपूर्वक मशागत करून पिकविलेला भाजीपाला आणि भात ह्याची नासाडी करायचा. शेवटी आपल्या खट्याळपणात तो इतका क्रूर झाला आणि शेतामध्ये सर्वत्र इतके नुकसान करू लागला की तो चांगल्या स्वभावाचा शेतकरी फार काळ सहन करू शकला नाही, आणि त्याने हे थांबविण्याचे ठरविले. म्हणून त्याने त्या ऊदमांजराला पकडायच्या आशेने रात्रंदिवस एक दंडुका घेऊन त्यावर हल्ला करायचे ठरविले पण सर्व व्यर्थ गेले. नंतर त्याने त्या दुष्ट प्राण्यासाठी सापळा लावला.

शेतामध्ये सर्वत्र नुकसान करणारे दुष्ट उदमांजर.

शेतकऱ्याच्या दुःखाला आणि सहनशीलतेला फळ मिळाले कारण एका छानशा दिवशी तो फेरी मारत असताना

तो ऊदमांजर ज्या हेतुने त्याने बीळ खोदलेले होते त्या बीळात अडकलेला दिसला. शेतक़ऱ्याला आपला शत्रू पकडला गेल्याचे पाहून खूप आनंद झाला, आणि त्याने त्याला दोरखंडाने बांधून सुरक्षितपणे आपल्या घरी नेले. जेव्हा तो घरी पोहोचला तेव्हा तो शेतकरी आपल्या बायकोला म्हणाला;

“अखेरीस त्या वाईट ऊदमांजराला मी पकडले. मी ज्या वेळेला कामासाठी बाहेर गेलेलो असेन तेव्हा त्याच्यावर नजर ठेव आणि त्याला पळून जाऊ देऊ नकोस, कारण आज रात्री मला त्याचा रस्सा बनवायचा आहे.”

असे म्हणत त्याने ऊदमांजराला कोठीच्या छपराच्या खांबाला टांगून दिले आणि तो शेतात त्याच्या कामासाठी निघून गेला. ऊदमांजर मोठ्या संकटात सापडला होता, कारण रात्री आपला रस्सा बनविला जाणार ही कल्पनाच त्याला आवडली नव्हती. तो विचार करू लागला, खूप वेळ विचार करू लागला आणि अशी योजना करण्याचा प्रयत्न करू लागला जेणेकरून त्याची सुटका होईल. अशा भांबावलेल्या अवस्थेत स्पष्टपणे विचार करणे अवघड होते, कारण त्याला उलटे टांगलेले होते. त्याच्या अगदी जवळ कोठीच्या प्रवेशद्वाराकडून बाहेर हिरवी शेते आणि स्वच्छ ऊन पडलेले दिसत होते आणि तेथे ऊभे राहून म्हाताऱ्या शेतक़ऱ्याची बायको सातू कुटत होती. ती म्हातारी खूप थकलेली दिसत होती. तिचा चेहरा अनेक सुरकुत्यांच्या थरांनी भरला होता, आणि तो तपकिरी चामड्यासारखा दिसत होता. प्रत्येक वेळी तिच्या चेहऱ्यावरून ओघळणाऱ्या घमाला ती पुसत होती. “प्रिय बाईसाहेब” तो कावेबाज ऊदमांजर म्हणाला, “ह्या म्हातारपणात तुम्ही हे कठीण काम करताना खूप थकला असाल, तुमच्यासाठी मला ते करू देणार नाही का? कारण माझे बाहू फार मजबूत आहेत, तुम्हाला थोडा वेळ आराम मिळेल!”

“तुझ्या दयाळुपणाबद्दल मी तुझी आभारी आहे,” ती म्हातारी म्हणाली. “पण माझ्यासाठी तुला मी हे काम करू देणार नाही. मी तुला मोकळं सोडू शकत नाही कारण मी तसं केल्यास तू पळून जाशील, आणि माझा नवरा घरी आल्याबरोबर तू पळून गेल्याचे पाहून माझ्यावर रागवेल.”

आता ऊदमांजर हा अतिशय धूर्त प्राण्यांमधला एक असतो, तो मृदू आणि दुःखी आवाजात म्हणाला, “तू अतिशय निर्दयी आहेस, तू मला सोडायला हवे कारण मी तुला वचन देतो की मी पळून जायचा प्रयत्न करणार नाही. तू जर तुझ्या नवऱ्याला घाबरत असशील तर सातू कुटण्याचे संपल्यावर, तुझा नवरा परतण्याच्या आत मी स्वतःला तुझ्याकडून बांधून घेईन. अशा बांधलेल्या अवस्थेत मी खूप थकलो आणि उबगलो आहे. जर तू मला थोड्या मिनिटांसाठी खाली येऊ दिले तर मी खरोखर तुझा आभारी राहीन!”

ती म्हातारी खूप चांगली आणि साध्या स्वभावाची होती आणि कोणाविषयीसुद्धा वाईट विचार करणारी नव्हती. पळून जाण्यासाठीच फक्त तो त्या म्हातारीला फसवित होता ह्याचा तिने यत्किंचितही विचार केला नव्हता. तिने त्या प्राण्याकडे वळून पाहिले तेव्हा तिलासुद्धा खूप वाईट वाटले. पाय छताला बांधून त्याला उलटे टांगलेले होते, तो खूपच वाईट अवस्थेत होता, त्याचे पाय इतके करकचून बांधलेले होते की दोरीच्या गाठींनी त्याची कातडी कापली गेली होती. ती

अंतःकरणाने खूप दयाळू असल्यामुळे आणि त्या प्राण्याने दिलेल्या पळून न जाण्याच्या वचनावर तिने विश्वास ठेवल्यामुळे तिने बांधलेली दोरी सोडली आणि त्याला खाली येऊ दिले.

नंतर त्या म्हातारीने त्याला लाकडी मुसळ दिले आणि त्याला सांगितले की मी थोडावेळ विश्रांती घेईपर्यंत तू काम कर. त्याने मुसळ घेतले, पण त्याला सांगितलेले काम करण्याऐवजी, त्या ऊदमांजराने त्या म्हातारीवर उसळी मारून मोठ्या लाकडाच्या तुकड्याने तिला ठोसा मारून खाली पाडले. नंतर त्याने तिला मारून टाकले आणि कापून टाकले आणि तिचा रस्सा बनविला आणि त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याची वाट पाहू लागला, त्या म्हाताऱ्याने दिवसभर शेतात कष्टाचे काम केले आणि आता तो नुकसानकारक ऊदमांजर त्याच्या शेताची नासाडी करणार नाही ह्या विचाराने तो आनंदित झाला होता.

सूर्यास्ताच्या वेळी त्याने काम सोडले आणि तो घरी जायला वळला. तो खूप थकला होता, पण ऊदमांजराच्या गरम गरम रश्श्याच्या जेवणाबद्दलच्या विचाराने परतीच्या वेळी त्याला उत्साह आला होता. त्या ऊदमांजराने त्याची सुटका करून घेऊन त्या गरीब बिचाऱ्या म्हातारीवर सूड उगवला असेल ह्याचा विचार कधीच त्याच्या मनाला शिवला नाही.

त्याचवेळी ऊदमांजराने म्हातारीचे सोंग घेतले आणि जसे त्याने म्हाताऱ्याला जवळ येताना पाहिले तसे तो त्या छोट्याशा घराच्या पडवीत म्हाताऱ्याच्या स्वागतासाठी बाहेर येत म्हणाला,

“अखेरीस तुम्ही परत आलात, मी त्या ऊदमांजराचे सूप बनवून तुमची बऱ्याच वेळापासून वाट बघत आहे.”

त्या म्हाताऱ्याने पटापट आपले काड्यांचे सँडल काढले आणि जेवणाच्या छोट्याशा लाकडी तबकासमोर तो बसला. त्या निष्पाप शेतकऱ्याला स्वप्नातही

वाटत नव्हते की तो त्याची बायको नाही जी त्याची रश्श्यासाठी वाट बघत होती. नंतर त्या ऊदमांजराने अकस्मात त्याचे रूप बदलले आणि तो परत आपल्या मूळ रूपात आला, आणि ओरडला,

"अरे बायकोला खाणाऱ्या म्हाताऱ्या, जा, स्वयंपाकघरातली हाडं बघ!"

उपहासाने आणि मोठ्याने हसत तो घराच्या बाहेर सटकला आणि टेकडीतील त्याच्या गुहेकडे परतला. म्हातारा एकटा मागे राहिला. त्याने काय ऐकले आणि काय पाहिले ह्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. नंतर तो संपूर्ण सत्य कळल्यावर इतका घाबरला आणि भेदरला की तो तात्काळ बेशुद्ध पडला. थोड्या वेळाने तो भोवताली फिरून आला आणि त्याच्या डोळयात अश्रू आले. मोठ्या दुःखाने आणि जोरजोरात तो रडू लागला. तो नैराश्याने आणि दुःखाने इकडे तिकडे झोकांड्या देऊ लागला. वास्तवात हे किती भयंकर होते की त्याची एकनिष्ठ म्हातारी बायको मारली गेली होती आणि ऊदमांजराकडून ती शिजविली गेली होती. त्याचवेळी ज्याने त्याच्या शेताची नासाडी केली होती त्या दुष्ट प्राण्यापासून त्याची सुटका झाली होती ह्याबद्दल तो स्वतःलाच धन्य समजत होता आणि शेतात शांतपणे काम करीत होता त्यावेळी त्याच्या घरी काय चालले आहे ह्याची त्याला कल्पनाही नव्हती. अरे देवा! किती भयानक विचार, जो रस्सा तो पिण्याच्या बेतात होता तो त्या प्राण्याने त्याच्या गरीब बिचाऱ्या बायकोला मारून बनविलेला होता. "ओ प्रिये, ओ प्रिये, ओ प्रिये!" त्याने मोठ्याने आक्रोश केला. आता त्याच पर्वतामध्ये –फार दूर नव्हे एक दयाळू आणि चांगल्या स्वभावाचा म्हातारा ससा राहत होता. त्याने त्या म्हाताऱ्याचे आक्रंदन आणि हुंदके ऐकले आणि तात्काळ काय घडले हे बघण्यासाठी व आपण आपल्या शेजाऱ्याला काही मदत करू शकतो का हे पाहण्यासाठी तो आला. म्हाताऱ्याने जे घडले ते सर्व काही त्याला सांगितले. जेव्हा त्या सशाने ही गोष्ट ऐकली तेव्हा त्याला त्या दुष्ट आणि लबाड ऊदमांजराचा खूप राग आला आणि त्याने त्याला सांगितले की सर्व गोष्टी त्याच्यावर सोपवून दे. आणि

तो त्या म्हाताऱ्याच्या बायकोच्या मृत्यूचा सूड घेईल. शेवटी शेतकऱ्याला दिलासा मिळाला, त्या शेतकऱ्याने अश्रू पुसले आणि त्याच्या दुःखाच्या प्रसंगी आल्याबद्दल त्याचे आभार मानले.

शेतकरी शांत होत असल्याचे पाहून तो ससा त्याच्या घरी गेला आणि त्या ऊदमांजराला शिक्षा करायची योजना आखू लागला.

दुसऱ्या दिवशी वातावरण खूप छान होते. आणि ससा त्या ऊदमांजराला शोधायला निघाला. जंगलामध्ये टेकडीच्या बाजूला किंवा शेतामध्ये तो कोठेही दृष्टोत्पत्तीस पडला नाही, म्हणून तो ससा त्याच्या गुहेकडे गेला आणि त्याने त्याला लपलेले बघितले, कारण प्राणी नेहमीच घाबरून स्वतःला लपवून घेतात. आणि शेतकऱ्याच्या घरातून पळून आल्यापासून तर तो म्हाताऱ्याच्या क्रोधाला अधिकच घाबरत होता.

सशाने त्याला हाक मारली,

“इतक्या सुंदर दिवसात तू बाहेर का पडला नाहीस? चल बाहेर ये माझ्याबरोबर आणि आपण टेकडीवर गवत कापायला जाऊ.”

ऊदमांजराला त्याचा कधीही संशय आला नाही कारण ससा त्याचा मित्र होता, त्याने राजीखुशीने बाहेर पडण्याची त्याची अनुज्ञा मानली. फक्त शेतकऱ्याच्या शेजारापासून आणि शेतकऱ्याच्या भेटीपासून वाटणारी भीती लांब गेल्याने त्याला आनंद झाला होता. सशाने त्याला घरापासून मैलोमैल बाहेर टेकडीवर दूर नेले जेथे गवत खूप उंच दाट आणि गोड वाढलेले होते. त्यांना घरी जेवढे गवत वाहून नेता येईल तेवढे त्यांनी कापायला सुरूवात केली जेणेकरून हिवाळ्यात त्याचा खाण्यासाठी ते साठा करू शकतील. जेव्हा प्रत्येकाने त्यांना जेवढे हवे तेवढे गवत कापले तेव्हा ते त्याचा भारा बांधून प्रत्येक जण त्याच्या पाठीवर

ठेवून घराकडे जाणार होते. ह्यावेळी सशाने त्या ऊदमांजराला पुढे जायला सांगितले.

जेव्हा ते थोडेसे पुढे गेले तेव्हा सशाने ठिणगी पाडण्याचा दगड आणि पोलाद ऊदमांजराच्या पाठीवर असलेल्या गवताच्या भाऱ्यावर घासून गवताचा भारा पेटवून दिला. ऊदमांजराने चकमकीचा दगड घासल्याचा आवाज ऐकला आणि त्याने विचारले,

"कसला आवाज आहे तड् तड्?"

"ओ काही नाही," ससा उत्तरला, "मी फक्त म्हटले 'तड् तड्.' कारण ह्याला तडतड्या पर्वत म्हणतात."

ऊदमांजराच्या पाठीवरील वाळलेल्या गवताच्या पूर्ण भाऱ्यावर आग पसरली. ऊदमांजराला जळणाऱ्या गवताचा तड् तड् आवाज ऐकू आला. त्याने विचारले, "काय आहे ते?"

"आता आपण जळत्या पर्वतावर आलो आहोत." ससा उत्तरला.

यावेळेला गवताचा भारा पूर्ण पेटून गेला आणि त्याबरोबर ऊदमांजराच्या पाठीवरील सर्व केस जळून गेले. आता पेटणाऱ्या गवताच्या धुराच्या वासाने त्याला कळले की काय झाले ते.

वेदनेने किंचाळत ऊदमांजर जेवढ्या जोरात पळता येईल तेवढ्या जोरात पळत त्याच्या गुहेकडे गेले. ससा त्याचा पाठलाग करीत गेला तेव्हा त्याला तो अंथरूणावर दुःखाने विव्हळत पडलेला दिसला.

“किती दुर्दैवी प्राणी आहेस तू!” ससा म्हणाला. “हे कसं घडलं ह्याची मला कल्पनाही करवत नाही! ज्याने तुझी पाठ लवकर बरी होईल असे औषध मी घेऊन येईन!”

ऊदमांजराच्या शिक्षेला आधीच सुरूवात झाली असा विचार करीत आनंदाने हसत ससा निघून गेला. त्याने अशी आशा केली की होरपळून गेल्यामुळे तो ऊदमांजर मरून जाईल. कारण ज्या गरीब बिचाऱ्या म्हातारीने त्याच्यावर विश्वास ठेवला तिचाच खून करून तो अपराधी झाला होता. म्हणून त्याच्या बाबतीत जे घडलं ते काही फारसं वाईट नव्हतं. तो घरी गेला आणि त्याने तिखट मीठ आणि लाल मिरचीची पूड एकत्र मिसळून मलम तयार केले.

तो ते ऊदमांजराकडे घेऊन गेला आणि ते लावण्यापूर्वी त्याला सांगितले की त्यामुळे त्याला खूप वेदना होतील पण त्याने त्या सोशिकतेने सहन करायला हव्यात. कारण ते जळल्याभाजल्याने झालेल्या किंवा तशाच प्रकारच्या जखमांवर खूपच आश्चर्यकारक औषध आहे. ऊदमांजराने त्याचे आभार मानले आणि लगेच त्याला ते लावायला सांगितले. त्याच्या जखमी पाठीवर तिखट मीठ आणि लाल मिरचीचा लेप लावल्याबरोबर त्याला जे क्लेश झाले त्याचे वर्णन कुठल्याही भाषेत करता येणे शक्य नव्हते. तो पुन्हा पुन्हा गडबडा लोळू लागला आणि मोठमोठ्याने आकांत करू लागला. सशाला त्याच्याकडे पाहून वाटले की शेतकऱ्याच्या बायकोच्या सूडाला सुरूवात झाली आहे.

तो ऊदमांजर जवळ जवळ एक महिनाभर अंथरूणावर होता, पण शेवटी लाल मिरची पूड लावल्याने उलट त्याच्या होरपळणाऱ्या जखमा बऱ्या झाल्या आणि तो चांगला झाला. जेव्हा सशाने बघितले की तो सुधारत आहे तेव्हा त्याने त्या प्राण्याला मारण्यासाठी दुसरी योजना आखण्याचा बेत केला. म्हणून तो त्या ऊदमांजराला भेटण्यासाठी गेला आणि त्याची तब्येत सुधारल्याबद्दल त्याचे अभिनंदन केले.

त्यांच्या संभाषणामध्ये सशाने उल्लेख केला की तो मच्छीमारीसाठी जाणार आहे आणि त्याने वर्णन केले की जेव्हा वातावरण छान आणि समुद्र शांत असतो तेव्हा मासे मारी किती आनंददायी असते.

ऊदमांजराने मोठ्या आनंदाने त्याचे विवरण ऐकले. आता त्याने वेळ घालविला होता आणि महिनाभराचे आजारपण आणि यातना तो विसरला होता. तो मासे पकडायला जाण्यात किती गंमत आहे याचा विचार करू लागला. म्हणून त्याने सशाला सांगितले की पुढच्या वेळी तू मला मासे पकडण्यासाठी घेऊन चल आणि हेच त्या सशाला हवे होते म्हणून तो राजी झाला.

नंतर ससा घरी गेला आणि त्याने दोन होड्या बनविल्या, एक लाकडाची आणि दुसरी मातीची. शेवटी त्या तयार झाल्या आणि जेव्हा सशाने उभे राहून पाहिले तेव्हा त्याला कळले की जर त्याची योजना यशस्वी झाली तर त्याच्या त्रासांना फळ मिळेल. आणि आता तो दुष्ट ऊदमांजराला मारण्यात यशस्वी होऊ शकेल.

तो दिवस आला आणि सशाने त्या ऊदमांजराला मासे पकडण्यासाठी नेण्याची व्यवस्था केली. त्याने स्वतःसाठी लाकडाची होडी ठेवली आणि ऊदमांजराला मातीची होडी दिली. ऊदमांजराला होड्यांबाबत काहीच माहिती नव्हती. त्याला फक्त नवी होडी मिळाली ह्याचाच खूप आनंद झाला होता आणि त्याने विचार केला की तो ससा किती दयाळू आहे की ज्याने त्याला होडी दिली. ते दोघेही आपापल्या होड्यांमध्ये बसले आणि निघाले. किनाऱ्यापासून काही अंतरावर गेल्यावर सशाने असा प्रस्ताव मांडला की कोणती होडी अधिक जलद आहे याची आपण परीक्षा बघूया. ऊदमांजराने प्रस्तावाला मान्यता दिली आणि ते दोघेही काही वेळ जितके भराभर वल्हविता येईल तेवढे भराभर वल्हविण्याच्या कामाला लागले. शर्यतीच्या मध्यभागी आल्यावर ऊदमांजराला दिसून आले की त्याच्या होडीचे तुकडे होणार आहेत. कारण पाण्याने आता माती मऊ करायला सुरूवात केली होती. भीतीने ओरडत त्याने सशाला मदतीसाठी हाक मारली. पण सशाने उत्तर दिले की

तो म्हातारीच्या खुनाचा सूड घेतो आहे. बऱ्याच दिवसापासून त्याचा हाच हेतू होता आणि सशाला ह्या विचाराने आनंद झाला होता की त्याला त्याच्या दुष्ट अपराधाचे माप मिळाले आणि आता बुडताना त्याला मदतीसाठी कुणीही नाही. नंतर त्याने वल्हे उचलले आणि सर्व शक्तीनिशी ऊदमांजराला ठोकले. तोपर्यंत की जोपर्यंत तो बुडणाऱ्या मातीच्या होडीबरोबर खाली पडत नाही. आणि नंतर तो पुन्हा कधी दिसला नाही.

अशा रितीने त्याने म्हाताऱ्या शेतकऱ्याला दिलेले वचन पाळले. ससा आता वळला आणि तो किनाऱ्याकडे नाव वल्हवू लागला. जमिनीला लागल्याबरोबर त्याने समुद्रकिनाऱ्याला आपली बोट लावली आणि त्या ऊदमांजराला, त्याच्या शत्रूला त्याने कसे मारून टाकले हे सारे सांगण्यासाठी तो घाईघाईने परतला.

म्हाताऱ्याने डोळ्यात अश्रू आणून त्याचे आभार मानले. तो म्हणाला, की बायकोच्या मृत्यूचा सूड घेतल्याविना आत्तापर्यंत ना रात्री कधी तो झोपला ना दिवसा कधी त्याला शांतता मिळाली, पण आता तो शांतपणे झोपू शकत होता. त्याने सशाला त्याच्या घरात राहण्यासाठी विनंती केली. म्हणून तेव्हापासून ससा त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याबरोबर रहायला गेला आणि त्यांच्या अखेरच्या दिवसापर्यंत ते दोघेही चांगले मित्र म्हणून राहिले.

“शिनांशा,” किंवा दक्षिणेकडे निर्देश करणारा रथ

होकायंत्र, कायम उत्तरेकडे टोक राहणाऱ्या सुईचे, पूर्णतया सर्वसामान्य वस्तू आहे. जरी पहिल्यांदा त्याचा शोध लागला तेव्हा ते एक आश्चर्य होते तरी आता ती एक विलक्षण वस्तू आहे असे कुणालाही वाटत नाही.

फार वर्षांपूर्वी चीनमध्ये अजूनही एक आश्चर्यकारक शोध लागला होता त्याचे नाव शिनांशा होते. हा नेहमी दक्षिणेकडे निर्देश करणाऱ्या माणसाच्या आकृतीसह असलेला एक रथ होता. तो रथ कोठेही ठेवलेला असो त्याची चाके फिरून तो बरोबर दक्षिणेकडेच निर्देश केलेला दिसायचा.

ह्या चमत्कारिक उपकरणाचा शोध पौराणिक युगातील तीन चिनी सम्राटांपैकी कोतेई नावाच्या एका सम्राटाने लावला. कोतेई हा सम्राट युही चा पुत्र होता. त्याचा जन्म होण्यापूर्वीच त्याच्या दूरदृष्टी असलेल्या आईने भविष्य वर्तवले की तिचा मुलगा मोठा माणूस होईल.

एका उन्हाळ्याच्या सायंकाळी दिवस संपायच्या वेळेला वाहणारी थंड झुळूक आणि ताऱ्यांनी प्रकाशित केलेल्या वरील नभाकडे एक टक लावून पाहण्यासाठी ती गेली. जेव्हा तिने उत्तरेकडच्या ताऱ्याकडे पाहिले तेव्हा तिला एक चमत्कार दिसला, प्रत्येक दिशेला विजेचा लखलखाट दिसला. लगेचच तिचा मुलगा कोतेई ह्या जगात आला.

यथाकाळ तो पुरूष म्हणून मोठा झाला आणि त्याच्या पित्याच्या, सम्राट युहीच्या गादीवर बसला. त्याच्या प्रारंभीच्या राजवटीवर शियू ह्या बंडखोराचे संकट आले. त्या बंडखोराला स्वतःला राजा व्हायचे होते आणि त्यासाठी त्याने शेवटपर्यंत अनेक लढाया लढल्या. शियु हा अतिशय दुष्ट जादूगार होता, त्याचे डोके लोखंडाचे बनवलेले होते, आणि कुणीही त्याला जिंकू शकत नव्हता.

शेवटी कोतेईने त्या बंडखोराविरूद्ध युद्ध जाहीर केले आणि आपल्या सैन्याला लढाईसाठी नेले आणि दोन्ही सैन्ये ताकूरोकूच्या मैदानावर समोरासमोर आली. सम्राटाने धाडसाने हल्ला केला, पण जादुगाराने युद्धभूमीवर दाट धुके खाली आणले, आणि जेव्हा राजाचे लष्कर गोंधळात पडून मार्ग शोधण्याच्या प्रयत्नात भटकू लागले तेव्हा शियुने आपण राजाच्या सैन्याला किती मूर्ख बनविले असे म्हणून हसत आपल्या सैन्यदलासह त्याने माघार घेतली.

तथापि सम्राटाचे सैनिक कितीही शूर असले तरी बंडखोर जादूगार शेवटी आपल्या जादूने निसटून जायचा. कोतेई आपल्या राजवाड्याकडे परतला आणि विचार करू लागला, चिंतन करू लागला की त्या जादूगाराला कसे जिंकावे कारण आशा न सोडण्याचा त्याने निर्धार केला होता. बऱ्याच कालावधीनंतर त्याने, नेहमी दक्षिणेकडे निर्देश करीत असलेल्या मानवाच्या प्रतिकृतीसह असलेल्या शिनांशाचा शोध लावला कारण त्याकाळात कोठेही होकायंत्रे नव्हती. ह्या उपकरणाबरोबर त्याला जादूगाराने उत्पन्न केलेल्या दाट धुक्यात त्याचे सैन्य गोंधळात पडणार नसल्याने त्याला भीती वाटण्याची गरजच नव्हती.

कोतेईने पुन्हा शियुच्या विरूद्ध युद्ध पुकारले. त्याने त्याच्या लक्षरासमोर शिनांशा ठेवला आणि युद्धभूमीकडे कूच केले.

निश्चयपूर्वक युद्ध सुरू झाले. राजाच्या सैन्यदलाने बंडखोरांना मागे हाकलले तेव्हा त्याने पुन्हा जादूचा आश्रय घेतला, आणि काही विचित्र शब्द त्याने मोठ्या आवाजात उच्चारल्या बरोबर ताबडतोब दाट धुके खाली युद्धभूमीवर पसरले.

पण कोणत्याही सैनिकाने धुक्याची पर्वा केली नाही, आणि कोणीही गोंधळले गेले नाही. कोतेईने शिनांशी कडे निर्देश करून मार्ग शोधायला सांगून आणि एकही चूक न करता सैन्याला मार्गदर्शन केले. त्याने जवळून बंडखोरांचा पाठलाग केला आणि मोठी नदी येईपर्यंत त्यांना मागे हाकलले. कोतेई आणि त्याच्या माणसांना

दिसलेली नदी पुराच्या पाण्याने ओसंडून वाहत आहे त्यामुळे त्यांना ती ओलांडून जाणे अशक्य आहे.

शियूने झटकन जादूचा प्रयोग करून त्याच्या सैन्याची पर्वा न करता पलिकडच्या तीरावर असलेल्या मोठ्या किल्ल्यात स्वतःला कोंडून घेतले.

जेव्हा कोतेईला कळले की आपल्या सैन्याची आगेकूच रोखली गेली आहे तेव्हा तो भयंकर निराश झाला कारण तो बंडखोराला ओलांडून पुढे जाणार इतक्यात नदीने त्याला रोखले होते.

तो काहीच करू शकला नाही, कारम त्या काळात होड्या नव्हत्या म्हणून सम्राटाने प्रसन्न जागेवर तंबू उभारण्याची आज्ञा केली.

एके दिवशी तो तंबूच्या बाहेर आला आणि थोडा वेळ चालत राहिल्यावर तो एका डबक्याजवळ येऊन थांबला. तेथे तो काठावर बसला आणि विचारात हरवला.

तो शरदऋतू होता. काठावर वाढलेली उंच झाडी त्यांची पाने खाली गळत होती. ती पाने त्या डबक्याच्या पृष्ठभागावर इकडे तिकडे तरंगत होती. कोतेईचे लक्ष पाण्याच्या काठावर असलेल्या कोळयाने वेधून घेतले. जवळच असलेल्या तरंगणाऱ्या एका पानावर चढण्याचा तो लहानसा कीटक प्रयत्न करीत होता. शेवटी तो त्यात यशस्वी झाला आणि तो लवकरच पाण्यावर तरंगत डबक्याच्या दुसऱ्या किनाऱ्यावर आला.

ह्या छोट्याशा प्रसंगाने बुद्धिमान सम्राटाला विचार करायला लावले की जसे त्या पानाने त्या कोळयाला तरंगत नेले तसे मला आणि माझ्या माणसांनाही काहीतरी वस्तू तरंगत पलिकडे नेऊ शकेल. जोपर्यंत तो पहिल्या होडीचा शोध लावत नाही तोपर्यंत तो चिकाटीने कामाला लागला. जेव्हा त्याला त्या कामात यश आले तेव्हा त्याने त्याच्या माणसांना आणखी जास्त होड्या बनवायला सांगितले आणि वेळेतच सर्व सैन्याला पुरतील इतक्या होड्या तयार झाल्या.

कोतेईने आता त्याचे सैन्य नदीपलिकडे नेले, आणि शियूच्या मुख्य कार्यालयावर हल्ला केला. त्याने पूर्ण विजय मिळविला आणि ज्यामुळे देशाला बऱ्याच कालावधीपर्यंत त्रास झाला होता त्या युद्धाला संपविले.

त्या सूज्ञ आणि पुण्यशील सम्राटाने जोपर्यंत संपूर्ण देशाला सर्वत्र चिंतामुक्ती, संघर्षहीनता आणि सुबत्ता मिळत नाही तोपर्यंत विश्राम घेतला नाही. ज्या प्रजेने त्याच्या अधिपत्याखाली खूप काळापर्यंत सुखशांती उपभोगली त्या प्रजेला तो अतिशय प्रिय झाला. ज्यांचा लोकांना खूप उपयोग होईल अशा होडी आणि दक्षिणेकडे निर्देश करणाऱ्या शिनांशा सारख्या अनेक उपकरणांचा शोध लावण्यात त्याने आपला खूप वेळ खर्च केला आणि त्यात तो यशस्वी झालाही.

त्याने जवळ जवळ शंभर वर्षे राज्य केले. एके दिवशी कोतेई वर बघत होता, तेव्हा आकाश- अचानक लाल रंगाचे झाले, सोन्यासारखी झळाळी असणारे काहीतरी पृथ्वीकडे आले. जेव्हा ते जवळ आले तेव्हा कोतेईने पाहिले की तो आग ओकणारा, पंख आणि नखे असणारा मोठा प्राणी (ड्रॅगन) आहे. तो प्राण खाली पोहोचला आणि त्याने सम्राटापुढे नम्रतेने आपले शिर खाली झुकविले. सम्राज्ञी आणि दरबारी लोक इतके घाबरले की ते किंचाळतच पळाले.

पण सम्राटाने फक्त स्मितहास्य केले आणि त्यांना थांबण्यासाठी हाक मारली, आणि म्हणाला, “भिऊ नका, हा स्वर्गातून आलेला दूत आहे. येथील माझा काळ संपला!” नंतर तो ड्रॅगनवर स्वार झाला ज्याने त्याला घेऊन आकाशाकडे झेप घ्यायला सुरूवात केली.

जेव्हा ती सम्राज्ञी आणि दरबारी लोकांनी हे पाहिलं तेव्हा ते एकत्रित विलाप करू लागले.

“थांबा क्षणभर! आम्हाला सुद्धा यायची इच्छा आहे.” आणि ते सगळे धावून आले. त्यांनी ड्रॅगनची दाढी पकडण्याचा आणि त्यावर स्वार होण्याचा प्रयत्न केला.

पण ते अशक्य होते कारण खूप लोकांना ड्रॅगनवर स्वार व्हायचे होते. बरेच जण त्या प्राण्याच्या दाढीला टांगले गेले जेणे करून केसांना पकडून त्यांना त्यावर स्वार होता यावे पण ते जमिनीवर पडले.

दरम्यान सम्राज्ञी आणि थोडेसे दरबारी सुरक्षितरित्या ड्रॅगनच्या पाठीवर बसले. तो ड्रॅगन आकाशात इतका उंच उडाला की राजवाड्यातील सहवासी निराश होऊन मागे राहिले आणि त्यांना नंतर कुणीही पाहिलं नाही.

काही वेळानंतर राजवाड्याच्या आवारात धनुष्य आणि बाण जमिनीवर पडला. सम्राट कोतेईचेच ते आहेत हे त्यांनी ओळखले. दरबारी लोकांनी ते काळजीपूर्वक घेतले आणि पवित्र वस्तू म्हणून राजवाड्यात सांभाळून ठेवले.

*****

“शिनांशा,” किंवा दक्षिणेकडे निर्देश करणारा रथ



होकायंत्र, कायम उत्तरेकडे टोक राहणाऱ्या सुईचे, पूर्णतया सर्वसामान्य वस्तू आहे. जरी पहिल्यांदा त्याचा शोध लागला तेव्हा ते एक आश्चर्य होते तरी आता ती एक विलक्षण वस्तू आहे असे कुणालाही वाटत नाही.

फार वर्षांपूर्वी चीनमध्ये अजूनही एक आश्चर्यकारक शोध लागला होता त्याचे नाव शिनांशा होते. हा नेहमी दक्षिणेकडे निर्देश करणाऱ्या माणसाच्या आकृतीसह असलेला एक रथ होता. तो रथ कोठेही ठेवलेला असो त्याची चाके फिरून तो बरोबर दक्षिणेकडेच निर्देश केलेला दिसायचा.

ह्या चमत्कारिक उपकरणाचा शोध पौराणिक युगातील तीन चिनी सम्राटांपैकी कोतेई नावाच्या एका सम्राटाने लावला. कोतेई हा सम्राट युही चा पुत्र होता. त्याचा जन्म होण्यापूर्वीच त्याच्या दूरदृष्टी असलेल्या आईने भविष्य वर्तवले की तिचा मुलगा मोठा माणूस होईल.

एका उन्हाळ्याच्या सायंकाळी दिवस संपायच्या वेळेला वाहणारी थंड झुळूक आणि ताऱ्यांनी प्रकाशित केलेल्या वरील नभाकडे एक टक लावून पाहण्यासाठी ती गेली. जेव्हा तिने उत्तरेकडच्या ताऱ्याकडे पाहिले तेव्हा तिला एक चमत्कार दिसला, प्रत्येक दिशेला विजेचा लखलखाट दिसला. लगेचच तिचा मुलगा कोतेई ह्या जगात आला.

यथाकाळ तो पुरूष म्हणून मोठा झाला आणि त्याच्या पित्याच्या, सम्राट युहीच्या गादीवर बसला. त्याच्या प्रारंभीच्या राजवटीवर शियू ह्या बंडखोराचे संकट आले. त्या बंडखोराला स्वतःला राजा व्हायचे होते आणि त्यासाठी त्याने शेवटपर्यंत अनेक लढाया लढल्या. शियु हा अतिशय दुष्ट जादूगार होता, त्याचे डोके लोखंडाचे बनवलेले होते, आणि कुणीही त्याला जिंकू शकत नव्हता.

शेवटी कोतेईने त्या बंडखोराविरूद्ध युद्ध जाहीर केले आणि आपल्या सैन्याला लढाईसाठी नेले आणि दोन्ही सैन्ये ताकूरोकूच्या मैदानावर समोरासमोर आली. सम्राटाने धाडसाने हल्ला केला, पण जादुगाराने युद्धभूमीवर दाट धुके खाली आणले,

आणि जेव्हा राजाचे लष्कर गोंधळात पडून मार्ग शोधण्याच्या प्रयत्नात भटकू लागले तेव्हा शियुने आपण राजाच्या सैन्याला किती मूर्ख बनविले असे म्हणून हसत आपल्या सैन्यदलासह त्याने माघार घेतली.

तथापि सम्राटाचे सैनिक कितीही शूर असले तरी बंडखोर जादूगार शेवटी आपल्या जादूने निसटून जायचा. कोतेई आपल्या राजवाड्याकडे परतला आणि विचार करू लागला, चिंतन करू लागला की त्या जादूगाराला कसे जिंकावे कारण आशा न सोडण्याचा त्याने निर्धार केला होता. बऱ्याच कालावधीनंतर त्याने, नेहमी दक्षिणेकडे निर्देश करीत असलेल्या मानवाच्या प्रतिकृतीसह असलेल्या शिनांशाचा शोध लावला कारण त्याकाळात कोठेही होकायंत्रे नव्हती. ह्या उपकरणाबरोबर त्याला जादूगाराने उत्पन्न केलेल्या दाट धुक्यात त्याचे सैन्य गोंधळात पडणार नसल्याने त्याला भीती वाटण्याची गरजच नव्हती.

कोतेईने पुन्हा शियुच्या विरूद्ध युद्ध पुकारले. त्याने त्याच्या लक्षरासमोर शिनांशा ठेवला आणि युद्धभूमीकडे कूच केले.

निश्चयपूर्वक युद्ध सुरू झाले. राजाच्या सैन्यदलाने बंडखोरांना मागे हाकलले तेव्हा त्याने पुन्हा जादूचा आश्रय घेतला, आणि काही विचित्र शब्द त्याने मोठ्या आवाजात उच्चारल्या बरोबर ताबडतोब दाट धुके खाली युद्धभूमीवर पसरले.

पण कोणत्याही सैनिकाने धुक्याची पर्वा केली नाही, आणि कोणीही गोंधळले गेले नाही. कोतेईने शिनांशी कडे निर्देश करून मार्ग शोधायला सांगून आणि एकही चूक न करता सैन्याला मार्गदर्शन केले. त्याने जवळून बंडखोरांचा पाठलाग केला आणि मोठी नदी येईपर्यंत त्यांना मागे हाकलले. कोतेई आणि त्याच्या माणसांना दिसलेली नदी पुराच्या पाण्याने ओसंडून वाहत आहे त्यामुळे त्यांना ती ओलांडून जाणे अशक्य आहे.

शियूने झटकन जादूचा प्रयोग करून त्याच्या सैन्याची पर्वा न करता पलिकडच्या तीरावर असलेल्या मोठ्या किल्ल्यात स्वतःला कोंडून घेतले.

जेव्हा कोतेईला कळले की आपल्या सैन्याची आगेकूच रोखली गेली आहे तेव्हा तो भयंकर निराश झाला कारण तो बंडखोराला ओलांडून पुढे जाणार इतक्यात नदीने त्याला रोखले होते.

तो काहीच करू शकला नाही, कारम त्या काळात होड्या नव्हत्या म्हणून सम्राटाने प्रसन्न जागेवर तंबू उभारण्याची आज्ञा केली.

एके दिवशी तो तंबूच्या बाहेर आला आणि थोडा वेळ चालत राहिल्यावर तो एका डबक्याजवळ येऊन थांबला. तेथे तो काठावर बसला आणि विचारात हरवला.

तो शरदऋतू होता. काठावर वाढलेली उंच झाडी त्यांची पाने खाली गळत होती. ती पाने त्या डबक्याच्या पृष्ठभागावर इकडे तिकडे तरंगत होती. कोतेईचे लक्ष पाण्याच्या काठावर असलेल्या कोळयाने वेधून घेतले. जवळच असलेल्या तरंगणाऱ्या एका पानावर चढण्याचा तो लहानसा कीटक प्रयत्न करीत होता. शेवटी तो त्यात यशस्वी झाला आणि तो लवकरच पाण्यावर तरंगत डबक्याच्या दुसऱ्या किनाऱ्यावर आला.

ह्या छोट्याशा प्रसंगाने बुद्धिमान सम्राटाला विचार करायला लावले की जसे त्या पानाने त्या कोळयाला तरंगत नेले तसे मला आणि माझ्या माणसांनाही काहीतरी वस्तू तरंगत पलिकडे नेऊ शकेल. जोपर्यंत तो पहिल्या होडीचा शोध लावत नाही तोपर्यंत तो चिकाटीने कामाला लागला. जेव्हा त्याला त्या कामात यश आले तेव्हा त्याने त्याच्या माणसांना आणखी जास्त होड्या बनवायला सांगितले आणि वेळेतच सर्व सैन्याला पुरतील इतक्या होड्या तयार झाल्या.

कोतेईने आता त्याचे सैन्य नदीपलिकडे नेले, आणि शियूच्या मुख्य कार्यालयावर हल्ला केला. त्याने पूर्ण विजय मिळविला आणि ज्यामुळे देशाला बऱ्याच कालावधीपर्यंत त्रास झाला होता त्या युद्धाला संपविले.

त्या सूज्ञ आणि पुण्यशील सम्राटाने जोपर्यंत संपूर्ण देशाला सर्वत्र चिंतामुक्ती, संघर्षहीनता आणि सुबत्ता मिळत नाही तोपर्यंत विश्राम घेतला नाही. ज्या प्रजेने त्याच्या अधिपत्याखाली खूप काळापर्यंत सुखशांती उपभोगली त्या प्रजेला तो अतिशय प्रिय झाला. ज्यांचा लोकांना खूप उपयोग होईल अशा होडी आणि दक्षिणेकडे निर्देश करणाऱ्या शिनांशा सारख्या अनेक उपकरणांचा शोध लावण्यात त्याने आपला खूप वेळ खर्च केला आणि त्यात तो यशस्वी झालाही.

त्याने जवळ जवळ शंभर वर्षे राज्य केले. एके दिवशी कोतेई वर बघत होता, तेव्हा आकाश- अचानक लाल रंगाचे झाले, सोन्यासारखी झळाळी असणारे काहीतरी पृथ्वीकडे आले. जेव्हा ते जवळ आले तेव्हा कोतेईने पाहिले की तो आग ओकणारा, पंख आणि नखे असणारा मोठा प्राणी (ड्रॅगन) आहे. तो प्राण खाली पोहोचला आणि त्याने सम्राटापुढे नम्रतेने आपले शिर खाली झुकविले. सम्राज्ञी आणि दरबारी लोक इतके घाबरले की ते किंचाळतच पळाले.

पण सम्राटाने फक्त स्मितहास्य केले आणि त्यांना थांबण्यासाठी हाक मारली, आणि म्हणाला, “भिऊ नका, हा स्वर्गातून आलेला दूत आहे. येथील माझा काळ संपला!” नंतर तो ड्रॅगनवर स्वार झाला ज्याने त्याला घेऊन आकाशाकडे झेप घ्यायला सुरूवात केली.

जेव्हा ती सम्राज्ञी आणि दरबारी लोकांनी हे पाहिलं तेव्हा ते एकत्रित विलाप करू लागले.

“थांबा क्षणभर! आम्हाला सुद्धा यायची इच्छा आहे.” आणि ते सगळे धावून आले. त्यांनी ड्रॅगनची दाढी पकडण्याचा आणि त्यावर स्वार होण्याचा प्रयत्न केला.

पण ते अशक्य होते कारण खूप लोकांना ड्रॅगनवर स्वार व्हायचे होते. बरेच जण त्या प्राण्याच्या दाढीला टांगले गेले जेणे करून केसांना पकडून त्यांना त्यावर स्वार होता यावे पण ते जमिनीवर पडले.

दरम्यान सम्राज्ञी आणि थोडेसे दरबारी सुरक्षितरित्या ड्रॅगनच्या पाठीवर बसले. तो ड्रॅगन आकाशात इतका उंच उडाला की राजवाड्यातील सहवासी निराश होऊन मागे राहिले आणि त्यांना नंतर कुणीही पाहिलं नाही.

काही वेळानंतर राजवाड्याच्या आवारात धनुष्य आणि बाण जमिनीवर पडला. सम्राट कोतेईचेच ते आहेत हे त्यांनी ओळखले. दरबारी लोकांनी ते काळजीपूर्वक घेतले आणि पवित्र वस्तू म्हणून राजवाड्यात सांभाळून ठेवले.

सुवर्ण बालक, किंतारोची साहसे

तो फार फार वर्षांपूर्वी किंतोकी नावाचा शूर सैनिक क्योतो मध्ये रहायचा. एका सुंदर स्त्रीच्या प्रेमात पडला आणि त्याने तिच्याशी लग्न केले. त्यानंतर फार काळ झाला नाही तोच त्याच्या काही विद्वेषी मित्रांमुळे न्यायालयात त्याची बदनामी झाली आणि त्याला कामावरून बडतर्फ करण्यात आले. ह्या दैवदुर्विलासाचा त्याच्या मनाला एवढा त्रास झाला की ह्या बडतर्फीनंतर तो जिवंत राहू शकला नाही—तो मेला, जगाला तोंड देण्यासाठी त्याच्या एकट्या सुंदर तरूण पत्नीला तो सोडून गेला. नवऱ्याचा मृत्यू झाल्याबरोबर नवऱ्याच्या शत्रूंना घाबरून जेथे फक्त लाकूडतोड्याशिवाय कुणीही येत नव्हते अशा अशिगारा पर्वताच्या निर्जन अरण्यात ती निघून गेली. तिला एक लहान मुलगा झाला. ती त्याला किंतारो किंवा सोन्या बाळा म्हणायची. आता त्या मुलाविषयीची अद्‌भुत गोष्ट म्हणजे जसा जसा तो वयाने वाढू लागला तसा तसा तो अधिक बलवान होत गेला, इतका की तो आठ वर्षांचा झाला तेव्हा तो एखाद्या लाकूडतोड्यासारखा जलद गतीने झाडे तोडायचा. नंतर त्याच्या आईने त्याला एक मोठी कुऱ्हाड दिली, तो ती घेऊन जंगलात जायचा आणि लाकूडतोड्यांना मदत करायचा. त्याला ते अद्‌भुत बालक म्हणायचे आणि त्याच्या आईला पर्वतांची वृद्ध दाई म्हणायचे. कारण

तिची उच्च श्रेणी त्यांना माहित नव्हती. दुसरा किंतारोचा आवडता विरंगुळा म्हणजे खडक आणि दगड फोडणे. तुम्ही कल्पना करू शकता की तो किती बलवान होता!

इतर मुलांपेक्षा पूर्णतया वेगळा, किंतारो वन्य पर्वतांमध्ये वाढला आणि प्राण्यांशी मैत्री करून तो त्यांना आणि त्यांच्या भाषेला समजून घ्यायला शिकला. हळूहळू ते पूर्णपणे माणसाळले आणि किंतारोला ते त्यांचा मालक समजू लागले, आणि तो त्यांना त्याचा नोकर आणि दूत समजू लागला. पण त्याचे खास नोकर होते अस्वल, हरिण, माकड आणि ससा.

अस्वल नेहमी आपल्या पिल्लाला किंतारो बरोबर दंगामस्ती करण्यासाठी घेऊन येई आणि जेव्हा ती त्याला घरी घेऊन जाण्यासाठी येई तेव्हा तो तिच्या पाठीवर स्वार होऊन तिच्या गुहेपर्यंत जाई. त्याला हरिणही खूप आवडायचे आणि त्या प्राण्याच्या गळ्याभोवती तो हात टाकून दाखवित असे की त्याला त्याच्या शिंगांची भीती वाटत नाही. ते एकत्र खूप मौज मस्ती करीत.

एके दिवशी, नेहमीप्रमाणे किंतारो पर्वतांवर गेला. त्यामागोमाग हरिण, अस्वल, माकड आणि ससा गेले. टेकडीवर काही वेळ चढल्यावर दरीतून आणि कच्च्या रस्त्याने जात ते वर आले. तेथून ते विस्तृत आणि गवताळ मैदानावर आले जे रानटी फुलांमुळे अतिशय सुरेख दिसत होते.

येथे, खरोखर खूप सुंदर जागा होती जेथे ते एकत्रितपणे दंगामस्ती आणि मौजमजा करतील. हरिणाने झाडावर आपले शिंग मजेखातर घासले, माकडाने त्याची पाठ खाजवली, सशाने त्याचे लांब कान खाजवले आणि अस्वलाने समाधानाने ची s s ची आवाज काढला.

किंतारो म्हणाला, “येथे खेळ खेळण्यासाठी चांगली जागा आहे. झोंबा झोंबीची स्पर्धा खेळूया. तुम्हा सर्वांचे काय मत आहे?”

अस्वल सर्वात मोठे आणि वयोवृद्ध असल्याने, सर्वांच्या वतीने उत्तरलेः

“ती खूप मजा येईल.” तो म्हणाला. मी सर्वात शक्तीमान प्राणी आहे म्हणून मी पहिलवानांसाठी मंच तयार करीन.” आणि त्याने जमिन खोदण्यास प्रारंभ केला आणि आकार देण्यासाठी थोपटले.

“ठीक आहे,” किंतारो म्हणाला, “जेव्हा तुम्ही एकमेकांशी कुस्ती कराल तेव्हा मी बघत राहीन. प्रत्येक फेरीत जो जिंकेल त्याला मी बक्षिस देईन.”

“किती मज्जा! आम्ही प्रत्येक जण बक्षिस मिळविण्याचा प्रयत्न करू,” अस्वल म्हणाले. जेथे त्यांना कुस्ती करायची होती तेथे हरिण, माकड आणि ससा अस्वलाला मंच उभारण्यासाठी मदत करू लागले. जेव्हा ते संपले तेव्हा किंतारो ओरडला,

“आता सुरू करा! माकड आणि ससा खेळाचे उद्घाटन करतील, हरिण पंचाचे काम करेल. आता हरिण महाशय तुम्ही पंच रहाल!”

“ही, ही!” हरिण उत्तरले, “मी पंच राहीन, आता माकड महाशय आणि ससा महाशय, जर तुम्ही तयार असाल तर मंचावर आपापली जागा घ्या.”

नंतर माकड आणि ससा उड्या मारीत बाहेर आले, झटकन् आणि चपळाईने ते कुस्तीच्या मंचावर आले. हरिण पंच म्हणून त्यांच्या मध्ये उभे राहिले आणि म्हणाले,

“लाल पाठ! लाल पाठ!” (हे माकडासाठी, जपानमध्ये ज्याची पाठ लाल असते.) “तू तयार आहेस का?”

नंतर तो सशाकडे वळला,

“लांब कान! लांब कान! तू तयार आहेस का?”

जेव्हा हरिणाने संकेत म्हणून झाडाचे पान वर उंचावले तेव्हा हे छोटे मल्ल एकमेकांकडे पाहू लागले. जेव्हा त्याने पान खाली टाकले तेव्हा माकड आणि ससा“योईश्यो, योईश्यो!” म्हणत एकमेकांवर तुटून पडले आणि मंचाच्या कडेजवळ एकमेकांना ढकलू लागले. जेव्हा माकड आणि ससा झोंबी करू लागले तेव्हा ते पडण्याच्या धोक्यात आले तेव्हा हरिण त्यांना उत्तेजनपर किंवा सावधानतेचा इशारा देत ओरडू लागले.

“लाल पाठ्या!लाल पाठ्या!तुझ्या पायावर उभा रहा!” हरिणाने ओरडून सांगितले.

“लांब कान्या! लांब कान्या! जोर कर, जोर कर, माकडाकडून पराजित होऊ नकोस.!” अस्वलाने ची ची केले म्हणून माकड आणि ससा त्यांच्या मित्रांकडून प्रोत्साहित झाल्याने एकमेकांवर विजय मिळविण्यासाठी कठोर परिश्रम घेऊ लागले. अखेर सशाने माकडावर विजय मिळविला. माकड अडखळल्यासारखे झाले तेव्हा सशाने त्याला वर्तुळाबाहेर एका उडीसरशी उडविले.

बिचारे माकड पाठ चोळीत वर बसले, जेव्हा तो रागाने किंचाळला तेव्हा त्याचा चेहरा खूप लांब झाला. “ओ, ओ! माझी पाठ दुखावली- माझ्या पाठीला इजा झाली!”

माकडाला जमिनीवर वाईट अवस्थेत पडलेले पाहून हरिणाने पान उंच धरून म्हटले, “ही फेरी संपली—ससा जिंकला.”

किंतारोने मग त्याच्या जेवणाचा डबा उघडला आणि भाताचा गोळा काढून सशाला देत तो म्हणाला, “हे तुझे बक्षिस, आणि तू तुझ्या कर्तृत्वावर चांगले मिळवलेस!”

आता माकड उठले, ते खूप चिडलेले होते. आणि जपानमध्ये म्हणतात, “त्याचे पोट दुखू लागले,” कारण त्याला वाटत होते की न्यायाने पाहता तो हरला नव्हता, म्हणून तो किंतारो आणि त्याच्या बाजूला उभ्या असलेल्यांना म्हणाला,

“मी न्याय्य रितीने हरलो नव्हतो. माझा पाय घसरला आणि मी पडलो. कृपया मला पुन्हा दुसरी संधी द्या आणि दुसऱ्या फेरीत मला सशाशी झोंबी खेळू द्या.”

नंतर किंतारोने अनुमती दिल्यावर ससा आणि माकड पुन्हा झोंबी खेळू लागले. आता प्रत्येकाला ठाऊक आहे की माकड हा स्वभावाने धूर्त प्राणी असतो, आणि त्याने निश्चय केला की सशापेक्षा चांगले करू जर शक्य असेल तर. हे करण्यासाठी त्याने विचार केला की सर्वात चांगला आणि खात्रीशीर मार्ग म्हणजे सशाचे लांब कान धरणे. लगेचच त्याने तसे करण्याची तयारी केली. सशाचा लांब कान ओढल्यामुळे त्याला वेदना झाल्या आणि तो सुरक्षित क्षेत्राच्या बाहेर फेकला

गेला. ही संधी साधून माकडाने सशाचा एक पाय पकडला आणि मंचाच्या मध्यभागी त्याला फेकून दिले. आता माकडाचा विजय झाला होता आणि विजयी म्हणून त्याला किंतारोकडून भाताचा गोळा मिळाला होता, त्यामुळे तो खूप खूष झाला आणि तो आपली दुखरी पाठ विसरून गेला. हरिण वर आले आणि त्याने सशाला विचारले की तो दुसऱ्या फेरीसाठी तयार आहे का, जर असेल तर तो पुन्हा त्याच्याबरोबर झोंबी करण्याचा प्रयत्न करणार का, आणि सशाने संमती दिली, ते दोघेही झोंबीसाठी तयार झाले. अस्वल पंच म्हणून पुढे आले.

हरिणाचे शिंग लांब होते आणि सशाचे कानही लांब होते. जे ही स्पर्धा बघत होते त्यांना ही खरोखर गमतीशीर आणि विचित्र स्पर्धा वाटत होती. हरिणाने आपली गुडघा टेकला आणि अस्वलाने पान उंच करून त्याचा पराभव जाहीर केला. काही वेळा एक काही वेळा दुसरा, छोट्या गटाने विजय मिळवीत थकेपर्यंत एकमेकांचे मनोरंजन केले. शेवटी किंतारो उठला आणि म्हणाला,

“आज एवढं पुरे. झोंबी खेळण्यासाठी किती छान जागा सापडली आपल्याला. उद्यासुद्धा परत येऊ आपण. आता आपण सर्व घरी जाऊ चला!” असे म्हणून किंतारो पुढे चालू लागला व सर्व प्राणी त्याच्या मागून चालू लागले.

थोडे अंतर चालल्यावर ते दरीतून वाहणाऱ्या एका नदीच्या किनारी येऊन ठेपले. किंतारो आणि त्याचे चार केसाळ मित्र उभे राहिले आणि पलिकडे जायचे साधन शोधू लागले. तेथे एकही पूल नव्हता. नदी तिच्या मार्गाने “दाण, दाण” करीत वाहत होती. सर्व प्राणी गंभीर झाले, तो निर्झर कसा ओलांडावा आणि ह्या सायंकाळचे वेळी घरी कसे जावे ह्या विचारात ते पडले. तथापि, किंतारो म्हणाला,

“क्षणभर थांबा, थोड्या वेळातच मी पूल तयार करतो.”

अस्वल, हरिण, माकड आणि ससा तो काय करतो याकडे बघत राहिले.

किंतारो नदीच्या एका किनाऱ्यापासून दुसऱ्या किनाऱ्यापर्यंत वाढलेल्या झाडांकडे गेला. शेवटी तो किनाऱ्यावर वाढलेल्या खूप मोठ्या झाडासमोर जाऊन थांबला. त्याने झाडाचा बुंधा पकडला आणि सर्व शक्ती लावून एकदा, दोनदा, तीनदा ओढला! तिसरा जोर इतका प्रचंड होता की मुळांनी आपली जागा सोडली आणि "मेरी, मेरी" (कड्, कड्) आवाज करीत उत्कृष्ट पूल बनवित निर्झरावर पडला.

"वा!" किंतारो म्हणाला. "काय वाटतं तुम्हाला माझ्या पुलाबद्दल? हा पूर्ण सुरक्षित आहे, म्हणून या माझ्या मागे." आणि त्याने ओलांडण्यासाठी पहिलं पाऊल टाकलं. चारही प्राणी मागे गेले. ह्यापूर्वी त्यांनी इतका कोणी शक्तिमान कधीही बघितला नव्हता. ते उद्गारले,

"किती शक्तिमान आहे हा! किती शक्तिमान!"

नदीवर हे सर्व काही घडत असताना एक लाकूडतोड्या खडकावर उभे राहून निर्झराकडे बघत होता. खाली काय घडत आहे हे त्याने पाहिलेले असते. किंतारो आणि त्याच्या प्राणीमित्रांकडे तो मोठ्या आश्चर्याने बघत होता. त्या मुलाने मुळासकट झाड उपटून नदीवर पूल तयार केला ह्यावर त्याचा विश्वासच बसत नव्हता. आपण स्वप्न तर बघत नाही ना म्हणून तो डोळे चोळू लागला.

लाकूडतोड्याला त्याचे कपडे बघून आणि हे सर्व पाहून नवल वाटले आणि तो स्वतःशी म्हणाला,

"हा काही सर्वसामान्य मुलगा नाही. हा कोणाचा मुलगा असू शकतो? आजच मी त्याचा तपास करतो."

तो घाईघाईने त्या विचित्र लोकांच्या मागे गेला आणि त्यांच्या मागचा पूल त्याने ओलांडला. किंतारोला ह्या सर्व गोष्टींची काहीच कल्पना नव्हती आणि आपला पाठलाग केला जात आहे ह्याची त्याला थोडी शंका आली. नदीच्या दुसऱ्या काठावर पोहोचल्यावर तो आणि ते प्राणी विभक्त झाले, ते जंगलातील त्यांच्या गुहेत गेले आणि तो त्याच्या आईकडे गेला जी त्याची वाट बघत होती.

सूचिपर्णी वृक्षांच्या जंगलातील ते छोटेसे घर जे एखाद्या उभ्या केलेल्या काडेपेटीसारखे दिसत होते. त्यात शिरल्याबरोबर तो आपल्या आईला अभिवादन करायला गेला आणि म्हणाला,

“ओक्कासान (आई), मी येथे आहे बघ!”

“अरे, किम्बो!” मोठ्या आनंदाने स्मित करीत ती म्हणाली. दिवसभरानंतर आपल्या मुलाला सुरक्षितरित्या घरी आलेले पाहून तिला आनंद झाला होता. “किती उशीर झाला तुला आज! मला भीती वाटली होती की काही तरी घडलं तुझ्या बाबतीत. इतका वेळ कोठे होतास तू?”

“मी माझे मित्र अस्वल, हरिण, माकड आणि सशाला घेऊन वर टेकड्यांमध्ये गेलो होतो आणि तेथे झोंबीच्या खेळाची स्पर्धा लावून कोण शक्तिमान आहे हे आजमावीत होतो. आम्ही साऱ्यांनी खेळात आनंद घेतला. आणि उद्या सुद्धा त्याच जागी जाऊन दुसरी स्पर्धा घेऊ.”

“आता सांग मग सर्वात शक्तिशाली कोण आहे?” आपल्याला माहित नाही असा बहाणा करून त्याच्या आईने विचारले.

“अगं आई,” किंतारो म्हणाला. “तुला ठाऊक नाही का मी सर्वात शक्तिमान आहे हे? मला त्यांच्यापैकी कुणाबरोबर झोंबी खेळायची गरजच नव्हती.”

“पण तुझ्यानंतर मग कोण सर्वात शक्तिमान आहे?”

“शक्तीमध्ये माझ्यानंतर अस्वल आहे,” किंतारो म्हणाला.

“आणि अस्वलानंतर?” त्याच्या आईने पुन्हा विचारले.

“अस्वलानंतर कोण शक्तिमान आहे हे सांगणं तेवढं सोपं नाही. कारण हरिण, माकड आणि ससा हे सारे एकमेकांसारखे शक्तिमान आहेत. ” किंतारो म्हणाला.

अचानक बाहेरून आलेल्या आवाजाने किंतारो आणि त्याची आई दचकली.

“माझं ऐक, लहान पोरा! पुढच्या वेळी जेव्हा तू जाशील तेव्हा झोंबीच्या स्पर्धेकडे ह्या म्हाताऱ्याला तुझ्याबरोबर ने. त्याला पण तुमच्याबरोबर सहभाग घ्यायला आवडेल!”

हा तोच लाकूडतोड्या होता जो नदीपासून किंतारोच्या मागे मागे येत होता. त्याने आपले लाकडी बूट काढले आणि तो घरात शिरला. यामा-उबा आणि तिचा मुलगा आश्चर्याने थक्कच झाले. त्यांनी विस्मयचकित होऊन आगंतुकाकडे बघितले. कारण की त्याला ह्यापूर्वी त्यांनी कधीही पाहिले नव्हते.

“कोण तुम्ही?” ते दोघे उद्गारले.

नंतर तो लाकूडतोड्या हसला आणि म्हणाला, “मी कोण आहे हे तूर्त काही महत्त्वाचे नाही, पण आपण बघूया कोणाचे बाहू जास्त ताकदवान आहेत, या मुलाचे की माझे?”

मग किंतारो, ज्याने आपले सर्व जीवन जंगलात घालविले तो शिष्टाचार न बाळगता त्या माणसाला उत्तर देत म्हणाला, “तुमची इच्छा असेल तर आपण ह्याची परीक्षा पाहू, पण जो कुणी पराभूत होईल त्याबद्दल तुम्हाला राग यायला नको.” मग किंतारो आणि लाकूडतोड्या या दोघांनी आपले उजवे बाहू बाहेर काढले आणि एकमेकांचे पंजे घट्ट पकडले. खूप वेळेपर्यंत किंतारो आणि तो म्हातारा प्रत्येकजण एकमेकांचे बाहू कसे वाकतील अशा प्रकारची झोंबी करून प्रयत्न करीत होते. पण तो म्हातारा फारच बलवान होता आणि ही चमत्कारिक जोडी सारखीच एकमेकांच्या तोडीची होती. शेवटी म्हाताऱ्याने थांबून खेळ अनिर्णित असल्याचे जाहीर केले.

“तू खरोखरच बलवान मुलगा आहेस. तेथे अशी काही माणसे आहेत जी माझ्या उजव्या बाहूबद्दल स्तुती करतात!” लाकूडतोड्या म्हणाला. “काही तासांपूर्वी मी तुला पहिल्यांदाच खडकावरून बघितले जेव्हा तू ते झाड उपटून त्या ओढ्यावर पूल तयार केला. विश्वास बसत नव्हता म्हणून मी तुझ्या मागे मागे तुझ्या घरी आलो. मी आता ह्या दुपारी परीक्षा पाहिली आणि तुझे बाहू किती बळकट आहेत हे सिद्ध झाले. जेव्हा तू पूर्णपणे मोठा होशील तेव्हा खात्रीने जपानमध्ये सर्वात जास्त शक्तीमान म्हणून तू गणला जाशील. तू ह्या जंगली पर्वतांमध्ये स्वतःला लपवून ठेवले आहेस ही वाईट गोष्ट आहे.”

नंतर तो किंतारोच्या आईकडे वळला,

“आणि तू, आई आपल्या मुलाला कधी राजधानीकडे नेण्याचा विचार केला नाहीस का आणि सामुराई (जपानी शिलेदार) सारखे आपल्या कमरेला दोन तलवारी लावण्याचे शिकवले नाही का?”

“तुम्ही माझ्या मुलाबद्दल ममत्व दाखविले. किती दयाळू आहात तुम्ही!” आईने उत्तर दिले, “पण तुम्ही पाहिले आहे की तो कसा रानटी आणि अशिक्षित आहे आणि मला भीती वाटते की तुम्ही सांगितल्याप्रमाणे तसं करायला त्याला किती कठीण वाटेल. तो खूप बलवान असल्यामुळे मी त्याला लहानपणापासून ह्या देशाच्या अज्ञात भागात लपवून ठेवले आहे. कारण त्याच्याजवळ येणाऱ्या कोणालाही तो इजा करतो. मी नेहमी अशी इच्छा करायची की एके दिवशी माझ्या मुलाला दोन तलवारी धारण करणाऱ्या शिलेदाराच्या रूपात बघावे, पण मला कुणीही प्रतिष्ठित स्नेही नाही की जो राजधानीत आमची ओळख करू शकेल, मला भीती वाटते की माझी इच्छा कधीच पूर्ण होणार नाही.”

“तुम्हाला याबाबतीत त्रास करून घेण्याची गरज नाही. तुम्हाला खरं सांगायचं म्हणजे मी लाकूडतोड्या नाहीच! मी जपानच्या मोठ्या सैन्याधिकाऱ्यांपैकी एक आहे. माझं नाव आहे सादामित्सू, आणि मी शक्तीशाली उमराव मिनामोतो-नो-राइकोचा जहागिरदार आहे. देशाच्या सभोवार फिरून जे विलक्षण ताकदीचे अभिवचन देतील अशा मुलांना शोधून आणण्याची मला त्याने आज्ञा केली आहे. जेणेकरून त्यांना आपल्या लष्करासाठी सैनिकाचे शिक्षण दिले जावे. मी विचार केला की वेष पालटून लाकूडतोड्याचे रूप घेऊनच मला हे उत्तम जमू शकेल. सुदैवाने अनपेक्षितपणे योगायोगाने तुमचा मुलगा भेटला. आपला मुलगा सामुराई (शिलेदार) व्हावा अशी तुमची खरोखर इच्छा असेल तर उमराव

राइको कडे त्याला घेऊन जाऊन उमेदवार म्हणून त्याच्या सेवेत ह्याला हजर करीन. ह्यावर तुम्हाला काही म्हणायचे आहे?"

जसा जसा त्या अधिकाऱ्याने हळूहळू त्याच्या योजनेचा उलगडा केला तसे तसे त्या आईचे हृदय आनंदाने भरून गेले. तिने पाहिले की आयुष्यातली एक इच्छा पूर्ण करायची ही संधी चालून आलेली आहे. जी मृत्यूपूर्वी तिला, किंतारोला सामुराईच्या रूपात पहायचे होते. जमिनीवर नतमस्तक होऊन ती उत्तरली,

"तुमच्या म्हणण्याचा अर्थ खरोखर तसा असेल तर मग मी माझ्या मुलाला तुमच्या स्वाधीन करते." एवढा सर्व वेळपर्यंत किंतारो आपल्या आईच्या बाजूला बसून ते काय म्हणतात हे ऐकत होता. जेव्हा त्याच्या आईने बोलणे संपविले तेव्हा तो उद्गारला,

"ओहो, काय आनंदी आनंद! मी ह्या सैन्याधिकाऱ्याच्याबरोबर जाईन आणि एक दिवस सामुराई बनेन!"

किंतारोचे भवितव्य निश्चित झाले आणि सैन्याधिकाऱ्याने किंतारोला त्याच्याबरोबर घेऊन लगेचच राजधानीकडे निघायला सुरुवात करायचे ठरविले. यामा-उबाचा मुलगा तिला सोडून जातो आहे ह्याचे तिला किती दुःख झाले हे सांगणं कठीण, कारण तिचा मुलगा तिचं सर्वस्व होता. पण जपानमध्ये म्हणतात तसे तिने आपले दुःख अविचल चेहऱ्यामागे लपविले. तिला ठाऊक होते की त्याने तिला सोडून जाणे हे तिच्या मुलाच्या हिताचे होते. आणि तो दूर जात असताना त्याला नाउमेद करायला नको. किंतारोने तिला अभिवचन दिले की तो तिला कधीच विसरणार नाही, आणि म्हणाला की जेव्हा दोन तलवारी धारण केलेला सरदार तो बनेल तेव्हा तो तिच्यासाठी घर बांधेल आणि तिची सेवा करेल.

तो दूर जात आहे असे जेव्हा अस्वल, हरिण, माकड आणि ससा हे सारे प्राणी, ज्यांना त्याने त्याच्या सेवेसाठी पाळले होते, त्यांना कळले तेव्हा नेहमीप्रमाणे ते त्याच्याजवळ हजर होण्यासाठी विचारू लागले. जेव्हा त्यांना कळले की तो चांगल्या कामासाठी दूर जात आहे तेव्हा ते पर्वताच्या पायथ्याशी त्याला निरोप देण्यासाठी त्याच्या मागे गेले.

"किम्बो," आई म्हणाली, "काळजी घे आणि चांगला मुलगा हो."

"किंतारो महाशय, एकनिष्ठ प्राणी म्हणाले, "शुभास्ते पंथानः सन्तु" काळजी घ्या.

नंतर ते सर्व त्याला शेवटचे पाहण्यासाठी झाडावर चढले आणि त्या उंचीवरून त्यांनी त्याला पाहिले आणि त्याची सावली हळूहळू लहान होत गेल्याचे व शेवटी तो दृष्टीआड झाल्याचे त्यांना दिसले.

सैन्याधिकारी सादामित्सू अनपेक्षितपणे किंतारोसारखा अद्‌भूत मुलगा गवसल्यामुळे आनंदाने मार्ग क्रमित होता.

इष्ट स्थळी पोहोचल्याबरोबर किंतारोने लगेचच उमराव मिनामोतो-नो-राइको कडे त्याला नेले आणि किंतारोबद्दल त्यांना सांगून हा मुलगा त्याला कसा सापडला हे सांगितले. उमराव राइकोला ही गोष्ट ऐकून खूप आनंद झाला आणि त्याने किंतारोला आपल्यापुढे आणण्याची आज्ञा दिली आणि जहागिरदारांपैकी एक त्याला बनविले.

उमराव राइकोचे लष्कर "चार शूर योद्धे" म्हणून प्रसिद्ध दल होते. ह्या योद्ध्यांची त्याने सैन्यांमधल्या सर्वात अधिक शक्तिमान वीरांमधून स्वतः निवड केली होती. ह्या छोट्या आणि योग्य निवडीचे दल संपूर्ण जपान मध्ये त्या माणसांच्या निर्भय शौर्याविषयी ख्यातनाम होते.

जेव्हा किंतारो प्रौढ झाला तेव्हा त्याच्या मालकाने त्याला चार शूरांचा प्रमुख केले. तो सर्वांपेक्षा खूप शक्तिमान होता. त्या प्रसंगानंतर शहरात लवकरच अशी बातमी गेली की नरभक्षक राक्षस जवळच निवास करून आहे. आणि लोक भीतीने हादरून गेले आहेत. उमराव राइकोने संकटीतून सोडविण्यासाठी किंतारोला आज्ञा केली. त्याला आपल्या तलवारीच्या यशाच्या परीक्षेबद्दल आनंद झाला आणि तो लगेच निघाला.

गुहेतल्या राक्षसाला आश्चर्य वाटले. किंतारोने त्याचे अजस्त्र मुंडके झटक्यात उडविले. व ते त्याने आपल्या विजयाचे द्योतक म्हणून मालकाकडे नेले.

किंतारो आता देशाचा सुप्रसिद्ध महावीर म्हणून गाजू लागला. शक्ती, किर्ती आणि संपत्ती ही त्याच्याकडे आली. आता त्याने आईला दिलेले अभिवचन पाळले आणि आपल्या वृद्ध आईसाठी आरामदायी घर बांधले. ती त्याच्यासोबत अखेरपर्यंत राजधानीत राहिली.

एका श्रेष्ठ नायकाची ही गोष्ट नाही का?

*****

राजकन्या हासेची कहाणी

फार फार वर्षांपूर्वी जपानच्या प्राचीन राजधानी नारा मध्ये राजकुमार तोयोनारी फुजिवारा नावाचा विद्वान राज्यमंत्री राहत होता. राजकन्या मुरासाकी (नीललोहित) नावाची त्याची पत्नी कुलीन, सद्वर्तनी आणि सुंदर होती. जेव्हा ते खूप तरूण होते तेव्हा कुलीन कुटुंबियांकडून जपानी रितीरिवाजाप्रमाणे त्यांचा विवाह झाला होता आणि तेव्हापासून ते आत्तापावेतो ते आनंदाने एकत्र नांदत होते. तथापि त्यांच्या मोठ्या दुःखाचे एक कारण होते, ते म्हणजे वर्षांमागून वर्षे गेली पण त्यांना मूलबाळ झाले नव्हते. ह्या गोष्टीने त्यांना फार दुःखी केले. त्यांचं स्वतःचं मूल असावं, ज्याने मोठं होऊन त्यांच्या वृद्धापकाळात त्यांना आनंद द्यावा, कुटुंबाचं नाव पुढे चालवावं आणि त्यांचा मृत्यू झाल्यावर त्यांच्या पूर्वजांची परंपरा पुढे चालू ठेवावी अशी त्या दोघांची फार इच्छा होती. त्या राजपुत्राने आणि त्याच्या सुंदर पत्नीने खूप विचार विनिमय आणि चिंतन केल्यानंतर त्यांनी असे ठरविले की हासे-नो-क्वान्नोन (हासे येथील दयेची देवता) च्या मंदिराकडे तीर्थयात्रेला जावं, कारण त्यांच्या सुंदर धार्मिक रूढीप्रमाणे त्यांचा विश्वास होता की दयेची माता क्वान्नोन, येऊन त्यांच्या गंभीर प्रार्थनेला पावून त्या रूपात त्यांची इच्छा पूर्ण करेल ज्याची त्यांना खूप गरज होती. ह्या समस्त वर्षांच्या प्रार्थनेनंतर खरोखर त्यांच्या विशेष तीर्थयात्रेला ती त्यांना इष्टपुत्राच्या रूपात प्रसन्न होईल, कारण त्या दोन जीवांच्या जीवनाची ही सर्वात मोठी निकड होती. आयुष्याने जेवढं काही त्यांना देता येईल तेवढं सर्व दिलेलं होतं पण ते सर्व त्यांच्यासाठी व्यर्थ होतं कारण ह्या असमाधानाने त्यांची हृदये आक्रंदत होती.

म्हणून राजकुमार तोयोनारी आणि त्याची पत्नी हासे येथील क्वान्नोनच्या मंदिराकडे गेले व तेथे त्यांनी खूप काळ घालविला, ते दररोज सुगंधी धूप जाळत आणि क्वान्नोन ह्या स्वर्गीय आईला प्रार्थना करीत की त्यांच्या संपूर्ण जीवनाची अभिलाषा मान्य करावी. आणि त्यांच्या प्रार्थनेला ती भरून पावली.

अखेर राजकुमारी मुरासाकीला मुलगी झाली आणि तिचं हृदय आनंदाने भरून आलं. तिच्या पतीस ते मूल सादर करताना त्या दोघांनी ठरविले की त्याचं नाव हासे-हिमे किंवा हासेची राजकुमारी ठेवावे, कारण त्या ठिकाणी क्वान्नोनकडून त्यांना ती ईश्वरी देणगी मिळाली होती. त्यांनी मोठ्या काळजीपूर्वक आणि नाजूकतेने तिला लहानाचे मोठे केले आणि ते मूल ओजस्वी आणि सुंदरपणे विकसित झाले.

जेव्हा ती मुलगी पाच वर्षांची झाली तेव्हा तिची आई भयंकर आजारी पडली आणि सर्व वैद्य आणि त्यांची औषधेही तिला वाचवू शकले नाहीत. शेवटचा श्वास घेण्याच्या थोड्या वेळापूर्वी तिने तिच्या मुलीला तिच्याकडे बोलविले, आणि हळुवारपणे तिच्या डोक्यावर थोपटीत म्हणालीः

“हासे-हिमे, तुला ठाऊक आहे का की तुझी आई आता फार काळ जिवंत राहू शकणार नाही? जरी माझा मृत्यू झाला तरी तू सदाचारी मुलगी म्हणून मोठी हो. तुझ्या परिचारिकेला किंवा कुटुंबातील इतर कुणालाही तुझ्याकडून त्रास होणार नाही याची दक्षता घे. कदाचित तुझे वडील दुसरे लग्न करतील आणि कुणीतरी तुझी आई म्हणून माझी जागा घेईल. जरी असे घडले तरी माझ्यासाठी तू उद्विग्न होऊ नकोस, पण तुझ्या वडिलांच्या दुसऱ्या

पत्नीचा आपल्या खऱ्या आईसारखा आदर कर. ती आणि तुझे वडील यांच्याशी आज्ञाधारकपणे आणि निष्ठेने वाग. लक्षात ठेव आपल्या आईपेक्षा श्रेष्ठ असलेल्यांची आज्ञा पाळ आणि तुझ्या पदरी असलेल्यांशी दयेने, प्रेमाने वाग. हे विसरू नकोस. जेव्हा तू मोठी होशील, मी ही आशा घेऊन मरण पावते आहे की तू एक आदर्श स्त्री म्हणून मोठी व्हावीस."

हासे-हिमे आदरपूर्वक दृष्टीकोन ठेवून तिच्या आईचे बोलणे ऐकत होती आणि तिने तिला अभिवचन दिले की, तिने सांगितल्याप्रमाणेच ती वागेल. अशी एक म्हण आहे की आत्मा तीन असेल तर तो शंभर असतो. जरी ती आई गमावण्याचं दुःख सहन करण्याइतपत मोठी नसली तरी हासे-हिमे एक छोटीशी राजकन्या आईच्या इच्छेप्रमाणे सदाचारी आणि आज्ञाधारक म्हणून वाढली.

पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर फार काळ झाला नाही तोच राजकुमार तोयोनारीने कुलीन कुटुंबात जन्म झालेल्या राजकुमारी तेरूते ह्या घरंदाज स्त्रीशी लग्न केले. अरेरे, सुशील आणि सूज्ञ राजकुमारी मुरासाकीसाठी स्वभावाने ती खूप वेगळी होती, क्रूर आणि दुष्ट हृदयाची. तिने तिच्या सावत्र मुलीवर कधीच प्रेम केले नाही. ती नेहमी त्या आईविना असलेल्या लहान मुलीशी निर्दयतेने वागत स्वतःशी म्हणायचीः

"हे माझं मूल नाही! हे माझं मूल नाही!"

पण हासे-हिमे तिचा निर्दयपणा सहन करायची, सावत्र आईची प्रेमाने सेवा करायची, सर्वथा तिची आज्ञा पाळायची, तिला कधीच त्रास द्यायची नाही. अगदी तिच्या स्वतःच्या आईने शिकविले होते तसे, त्यामुळे तेरूते बाईंना तिच्याविरूद्ध तक्रार करण्याचे कारणच नव्हते.

छोटीशी राजकन्या खूप व्यासंगी होती आणि तिचं सगळ्यात आवडतं अध्ययन म्हणजे संगीत आणि काव्य, दिवसातले बरेच तास त्या सरावात ती

घालवी, तिला (जपानी तंतुवाद्य) कोतो वाजविण्याची कला, पत्रलेखन आणि पद्यरचनेची कला शिकवू शकतील असे निष्णात आणि प्रवीण लोक तिच्या वडिलांच्या पदरी होते. जेव्हा ती बारा वर्षांची झाली तेव्हा ती ते वाद्य इतके सुंदर वाजवायची की सम्राटांसमोर तिचा संगीताचा कार्यक्रम राजवाड्यात सादर करण्यासाठी तिला व तिच्या सावत्र आईला पाचारण केले जाई.

तो सकुराच्या फुलांचा सण होता आणि राजप्रासादामध्ये मोठा आनंदोत्सव होता. सम्राटाने स्वतःहून जोमाने त्या ऋतूच्या मौजेत सहभाग घेतला होता आणि त्याने आज्ञा केली की राजकुमारी हासेने त्याच्यासमोर तंतुवाद्य वाजवून कार्यक्रम सादर करावा आणि तिची आई तेरूतेने बासरी वाजवून तिला साथ द्यावी.

उंच व्यासपीठावर सम्राट बसले. त्यांच्यासमोर जांभळ्या रंगाचे गोंडे लावलेला, बारीक कापून तासलेल्या बांबूचा पडदा होता. जेणेकरून राजेसाहेब सर्वकाही पाहू शकतील पण त्यांना मात्र कुणीही पाहू शकणार नाही. कारण सर्वसामान्य माणसाला त्यांचा पवित्र चेहरा पाहण्याची परवानगी नव्हती.

हासे-हिमे तरूण असूनही तिची स्मरणशक्ती इतकी तल्लख होती, इतकी प्रतिभावान होती की तिच्याबद्दल निपुण शिक्षकांनाही ती नेहमी चकित करून सोडायची. या महत्त्वाच्या प्रसंगी तिने खूप छान वाजविले पण तिची सावत्र आई राजकुमारी तेरूते अतिशय आळशी बाई होती. तिने रोजचा सराव करण्याचा कधीही त्रास घेतला नाही. त्यामुळे तिची साथ करण्यात ती यशस्वी झाली नाही आणि तिला राजदरबारातील एखाद्या स्त्रीने तिची जागा घ्यावी म्हणून तिला विनंती करावी लागली. ही मोठी लज्जास्पद गोष्ट होती. तिला भयंकर संताप येऊन मत्सर वाटू लागला कारण जेथे तिला अपयश आले तेथेच तिच्या सावत्र मुलीला यश मिळाले होते आणि त्यात अतिशय वाईट भर म्हणजे त्या सम्राटाने छोट्या राजकुमारीला राजवाड्यात छान वाजविल्यामुळे भेटवस्तू पाठविल्या होत्या.

राजकुमारी तेरूतेला तिच्या सावत्र मुलीचा द्वेष करण्याला अजून एक कारण होते ते असे की तिच्या सुदैवाने तिला एक मुलगा झाला होता आणि तिच्या अंतर्मनात ती गुप्त विचार करीत म्हणत असे,

“जर फक्त हासे-हिमे राहिली नसती, तर माझ्या मुलाला त्याच्या पित्याचे समस्त प्रेम मिळाले असते.”

हया विचाराला आळा घालायला ती कधीच शिकली नाही व तिचे हे विचार इतके विकोपाला गेले की ती तिच्या सावत्र मुलीला जीवे मारण्याची घोर इच्छा करू लागली.

एके दिवशी तिने गुप्तपणे आज्ञा करून विष मागविले आणि तिने ते थोड्या गोड दारूत मिसळले. ही विषारी दारू तिने एका बाटलीत ओतली. तशाच दिसणाऱ्या दुसऱ्या बाटलीत तिने चांगली दारू ओतली. मे महिन्याच्या पाचव्या दिवशी येणाऱ्या मुलांच्या सणाच्या दिवसाचा तो प्रसंग होता, आणि हासे-हिमे तिच्या लहान भावाबरोबर खेळत होती. त्याच्या सर्व योद्ध्यांची आणि वीरांची खेळणी बाहेर इतस्ततः पसरली होती आणि ती त्याला प्रत्येकाबाबत छान छान गोष्टी सांगत होती. ते दोघेही आपसात मजा लुटत होते आणि आनंदाने नोकरांबरोबर हसत होते. त्याच वेळी त्याच्या आईने दारूच्या दोन बाटल्या आणि स्वादिष्ट केक घेऊन प्रवेश केला.

“तुम्ही दोघेही किती मस्ती आणि आनंदात आहात,” स्मितहास्य करीत ती दुष्ट राजकुमारी तेरूते म्हणाली, “बघा बक्षिस म्हणून गोड दारू आणि माझ्या सालस मुलांसाठी काही छान केक आणले आहेत.” आणि तिने निरनिराळ्या बाटल्यांमधून दोन पेल्यांत दारू ओतली.

तिची सावत्र आई किती भयंकर कृत्य करीत आहे हे हासे-हिमेला स्वप्नातही कधी वाटले नाही. तिने आधीच भरलेला पेला उचलला आणि तिच्या सावत्र भावास दिला.

त्या दुष्ट बाईने विषाच्या बाटलीवर काळजीपूर्वक खूण करून ठेवली होती. पण खोलीत प्रवेश करताना ती अस्वस्थ झाली होती आणि त्यामुळे घाईघाईने आणि अनवधानाने तिने तो विषाचा पेला तिच्या स्वतःच्या मुलाला दिला होता. ह्या सर्व वेळेत ती त्या छोट्याशा राजकुमारीकडे मोठ्या उत्सुकतेने पाहत होती. पण त्या तरूण मुलीच्या चेहऱ्यावर काहीच बदल न झालेला पाहून तिला खूप आश्चर्य वाटले. अचानक तो लहान मुलगा वेदनेने किंचाळला आणि जमिनीवर धाडकन कोसळला. त्याची आई पटकन त्याच्याकडे धावली आणि तिने खोलीत आणलेल्या छोट्याशा दोन बाटल्या दक्षतेने पालथ्या केल्या आणि त्याला उचलले. नोकरांनी धावपळ करीत डॉक्टरांना बोलाविले पण त्याला कोणीच वाचवू शकले नाही. एका तासाभरातच त्याने आईच्या हातावरच प्राण सोडला. त्या जुन्या काळात डॉक्टरांना फारसे ज्ञान नव्हते आणि असा अंदाज केला गेला की मुलाला दारू मानवली नाही, आणि आचके आल्यामुळे तो मरण पावला.

तिच्या सावत्र मुलीला मारून टाकण्याच्या प्रयत्नात तिच्या स्वतःच्याच मुलाचा प्राण तिला गमवावा लागला. अशा रितीने तिलाच त्याची शिक्षा मिळाली; पण स्वतःला दोष देण्याऐवजी तिच्या स्वतःच्या हृदयात सावत्र मुलीविषयी अधिकाधिक द्वेष, कडवटपणा आणि तिरस्कार भरला गेला. आणि ती मोठ्या उतावीळपणे हासे-हिमेला इजा करण्याची संधी मिळण्याची वाट पाहू लागली. तथापि तिला खूप काळ वाट पहावी लागली.

जेव्हा हासे-हिमे तेरा वर्षांची झाली तेव्हा ती त्यापूर्वीच एक उल्लेखनीय गुणवत्तेची कवयित्री म्हणून उल्लेखली जाऊ लागली. अशी निपुणता व कलेची

जोपासना करणाऱ्या जुन्या जपानी स्त्रियांमध्ये आढळून येते अशी ती मानमरातब प्राप्त झालेली स्त्री होती.

नारामध्ये पावसाळा सुरू होता आणि पूर जवळच्या भूभागाला दररोज हानी पोचवीत होता अशा वार्ता येत होत्या. तात्सुता नदी सम्राटाच्या राजवाड्यामधून पाण्याने दुथडी भरून वाहत होती आणि नदीला लागून असलेल्या अरूंद रस्त्यावरून पाण्याच्या लोंढ्यांच्या गर्जनांमुळे दिवसरात्र सम्राट अस्वस्थ होत होते. परिणामी गंभीर तणाव निर्माण झाला होता. पुराच्या पाण्याचा आवाज रोखण्यासाठी स्वर्गाकडे निरंतर प्रार्थना करण्यासाठी बुद्धिष्ट मंदिरातील धर्मगुरूंना आज्ञा करण्यासाठी सम्राटाचे शासन पाठविले गेले. पण ते सर्व व्यर्थ गेले.

मग दरबारातील मंडळात कुजबुज झाली की दरबारातील द्वितीय मंत्री राजकुमार तोयोनारी फुजिवाराची कन्या सांप्रत खूप मोठी ईश्वरी देणगी मिळालेली कवयित्री आहे व श्रेष्ठ लोकांनी हे प्रमाणित केले आहे. फार पूर्वी ईश्वरी देणगी मिळालेल्या सुंदर कुमारिका कवयित्रींनी त्यांच्या काव्यातून प्रार्थना करून स्वर्गाला हलवून सोडले होते आणि दुष्काळामुळे क्षुधित झालेल्या जमिनीवर पाऊस आणून पाडला होता- असे प्राचीन काळातील कवयित्रींचे चरित्र लेखक ओनो-नो-कोमाची ह्यांनी म्हणून ठेवले आहे. जर राजकुमारी हासेने काव्य लिहून ते प्रार्थना म्हणून अर्पण केले तर जोशात वाहणाऱ्या नद्यांच्या आवाजाला आणि महाराजांना होणारे क्लेश यांना थांबवू शकणार नाही का? जे काही दरबारातील लोकांनी म्हटले ते शेवटी सम्राटाच्या कानावर पडले आणि ह्याचा परिणाम म्हणून मंत्री राजकुमार तोयोनारीला आदेश पाठविला गेला.

तेव्हा तिच्या वडिलांनी तिला बोलाविणे पाठवून राजाज्ञेबद्दल सांगितले. तेव्हा हासे-हिमेसाठी ते महद्आश्चर्य आणि भीती होती. त्या छोट्या मुलीच्या खांद्यावर खरोखर अवजड कर्तव्य लादले गेले होते- ते म्हणजे काव्यगुणांच्या जोरावर सम्राटाचे प्राण वाचविणे.

शेवटी तो दिवस आला आणि तिचे काव्य लिहून पूर्ण झाले. ते पर्णपत्रावर सोनवर्खाने कोरून लिहिले होते. तिच्या वडिलांबरोबर, सेवकांबरोबर आणि राजदरबारातील काही अधिकाऱ्यांबरोबर गर्जना करणाऱ्या पाण्याच्या लोंढ्याच्या किनाऱ्याकडे निघाली, आपल्या हृदयाला स्वर्गाकडे उन्नत करीत, स्वर्गाच्या दिशेने दोन्ही हात वर उभारून तिने रचलेले काव्य मोठ्याने पठण करण्यास सुरूवात केली.

सभोवती उभ्या असलेल्या लोकांना ते खरोखरच अद्‌भूत वाटले. पाण्याने गर्जना थांबविली आणि प्रार्थनेच्या थेट उत्तरादाखल नदी शांत झाली. त्यानंतर सम्राट व्याधीमुक्त होऊन निरोगी झाले.

महाराज खूप खूश झाले, तिला राजवाड्यात बोलविण्यात आले व चिंजो-सर्व सैन्याधिपती ही पदवी तिला प्रदान करण्यात येऊन तिला सन्मानित करण्यात आले व प्रतिष्ठेने गौरविण्यात आले. त्या वेळेपासून तिला चिंगो-हिमे किंवा राजकुमारी-सैन्याधिपती म्हणून संबोधित करण्यात आले आणि सर्वांनी तिच्याबद्दल प्रेम व आदर व्यक्त केला.

एकच व्यक्ती अशी होती की तिला हासे-हिमेच्या यशाबद्दल आनंद वाटला नाही आणि ती म्हणजे तिची सावत्र आई. तिच्या, सावत्र मुलीला जहर देऊन मारण्याच्या प्रयत्नात तिचा स्वतःचाच मुलगा तिच्या हातून मारला गेला होता ह्याबद्दल ती सतत कुढत असे. मुलीचा उत्कर्ष, सामर्थ्य आणि मानसन्मान, राजप्रासादाकडून बहाल झालेली मर्जी आणि संपूर्ण राजदरबाराकडून झालेली प्रशंसा पाहून तिला शरमल्यासारखे वाटायचे. तिच्या हृदयात असूया आणि मत्सर आगीसारखे पेटून उठले होते. हासे-हिमेबद्दल ती तिच्या नवऱ्याला बरेच काही खोटेनाटे सांगत असे. पण त्याचा काही उपयोग होत नसे. तिच्या त्या गोष्टींपैकी एकही तो ऐकत नसे. आणि कठोरपणे तिला बजावत असे की ही संपूर्णतया तिचीच चूक आहे.

शेवटी तिच्या सावत्र आईने तिच्या नवऱ्याच्या अनुपस्थितीची संधी साधून तिच्या जुन्या नोकरांपैकी एकाला हुकूम सोडून सांगितले की त्या निष्पाप मुलीला भयंकर अरण्य असलेल्या प्रदेशाच्या भागातील हिबारी पर्वतांमध्ये न्या आणि तिचा वध करा. कुटुंबावर कोसळणारी बदनामी थोपविण्यासाठी एकच मार्ग आहे- आणि तो म्हणजे तिला मारून टाकणं, अशी एक भीषण कथा लहानग्या राजकुमारीबद्दल कल्पिली होती.

कातोदा, तिचा खास नोकर त्याच्या मालकिणीची आज्ञा पाळायला बांधिल होता. असं असलं तरी त्याने पाहिले की त्या मुलीच्या पित्याच्या गैरहजेरीत आज्ञाधारकपणाचे ढोंग करणेच सयुक्तिक व शहाणपणाचे ठरेल. म्हणून त्याने हासे-हिमेला एका पालखीत बसविले आणि त्या प्रदेशातील अरण्यात सर्वात निर्जन जागा शोधत तो तिच्यासोबत गेला. आपल्याला अशा विचित्र पद्धतीने पाठविण्यात येत आहे हे कळूनही त्या गरीब बिचाऱ्या मुलीला तिच्या निर्दय सावत्र आईविरूद्ध निषेध करण्यात हित वाटले नाही. म्हणून तिला जसे सांगितले गेले त्याप्रमाणे ती गेली.

पण त्या वृद्ध सेवकाला लहानशी राजकन्या पूर्णपणे निष्पाप आहे हे ठाऊक होते. तिच्या सावत्र आईने अति अत्याचाराची आज्ञा करून त्याला तयार केले होते. आणि म्हणून त्याने तिचा जीव वाचविण्याचे ठरविले. नाहीतर त्याने तिला ठार मारले असते. तथापि तो क्रूर काम करून घेणाऱ्या मालकिणीकडे जाऊ शकला नाही. म्हणून त्याने बाहेर अरण्यातच रहायचे ठरविले. काही शेतकऱ्यांच्या मदतीने त्याने तेथे एक लहानशी झोपडी बांधली आणि त्याच्या बायकोला गुप्तपणे बोलावून घेऊन ह्या दोन पुण्यशील वृद्ध लोकांनी आपली सर्व शक्ती पणाला लावून त्या दुर्दैवी राजकुमारीची देखभाल केली. तिला सर्वथा असा विश्वास वाटायचा की जेव्हा तिचे वडील घरी परततील आणि ती कोठेच दिसत नाही हे त्यांना कळल्याबरोबर ते तिचा शोध घेतील.

राजकुमार तोयोनारी, काही आठवड्यानंतर घरी आला तेव्हा त्याच्या पत्नीकडून सांगितले गेले की त्याची मुलगी हिमेने काहीतरी अपराध केला आणि त्यामुळे होणाऱ्या शिक्षेला भिऊन ती पळून गेली. तो चिंतेने जवळ जवळ आजारीच पडला. घरातील प्रत्येकाने तीच गोष्ट सांगितली की हासे-हिमे अचानक नाहीशी झाली आणि कुणालाच ठाऊक नव्हते की का आणि कोठे. लोकापवादाला घाबरून त्याने ही गोष्ट तशीच दाबून ठेवली आणि सगळीकडे तिचा शोध घेतला पण व्यर्थ.

एके दिवशी ही असह्य चिंता विसरण्याच्या प्रयत्नात त्याने त्याच्या सर्व नोकरांना बोलाविले आणि सांगितले की आपण बऱ्याच दिवसांसाठी शिकार करण्याकरिता पर्वतांमध्ये बरोबर जाऊ. ते लवकरच तयार होऊन घोड्यांवर बसले आणि प्रवेशद्वारावर थांबून त्यांच्या मालकाची वाट पाहू लागले. संपूर्ण तयारीनिशी तो स्वार झाला आणि हिबारी पर्वतांच्या प्रदेशात जायला निघाला. मोठे दल त्याच्या मागून निघाले. तो सर्वांच्या पुढे निघाला. शेवटी त्याला आढळून आले की तो एका अरूंद व रम्य दरीत आला आहे.

सभोवती असलेल्या सुंदर दृश्यांची प्रशंसा करीत त्याला असे दिसले की त्या टेकड्यांपैकी एका टेकडीवर अगदी जवळ एक इवलेसे घर आहे. आणि नंतर स्पष्ट, स्वच्छ आणि लख्ख असा वाचन करण्याचा सुंदर मोठा आवाज त्याला ऐकू आला. इतक्या निर्जन ठिकाणी व्यासंगाने कोण अभ्यास करीत आहे ह्या जिज्ञासेने तो प्रेरित झाला, घोड्यावरून खाली उतरला आणि अश्वरक्षकाकडे घोडा ठेवून तो टेकडीच्या बाजूने वर चालत गेला आणि त्या झोपडीजवळ पोहोचला. जसा जसा तो जवळ जाऊ लागला, तसे तसे त्याचे आश्चर्य वाढत गेले. कारण वाचन करणारी एक सुंदर मुलगी होती. झोपडी संपूर्ण उघडी होती आणि ती दृश्याकडे तोंड करून बसली होती. लक्षपूर्वक ऐकल्यावर त्याला कळले की ती बौद्ध धर्मग्रंथाचे नितांत भक्तीने वाचन करीत आहे. अधिकाधिक उत्सुक होत घाईघाईने तो छोट्याशा द्वाराजवळ आला आणि लहानशा बागेत शिरला आणि पाहतो तर त्याची हरवलेली हासे-हिमे त्याची कन्या त्याच्या दृष्टोत्पत्तीस पडली. ती जे काही म्हणत होती त्यात ती इतकी

एकाग्र झाली होती की तिच्या वडिलांनी बोलेपर्यंत तिला काहीच दिसले नाही की ऐकू आले नाही.

“हासे-हिमे!” तो ओरडला, “ती तूच आहेस. माझी हासे-हिमे!”

ती इतकी विस्मयचकित झाली होती की तिला हे भानच उरले नाही की तिचे स्वतःचे प्रेमळ वडील तिला हाक मारीत आहेत. काही हालचाल करायची वा बोलायचे ती पार विसरून गेली.

“माझे पिता, माझे वडील! खरोखर तुम्हीच आहात- ओ, माझे पिता!” एवढंच ती सारं म्हणू शकली, आणि पळत जाऊन तिने त्याच्या जाड बाह्यांना घट्ट पकडले व त्यात आपले तोंड झाकले व तिला भावना अनावर होऊन तिच्या अश्रूंचा बांध फुटला.

तिच्या वडिलांनी तिच्या काळ्याभोर केसांना थोपटले आणि मृदू शब्दात विचारले की हे सारं काही का घडलं ते सांग. पण ती फक्त रडत होती, आणि त्याला मोठे आश्चर्य वाटत होते की तो खरोखर स्वप्न तर नाही ना पाहत.

नंतर त्याचा विश्वसनीय नोकर कातोदा बाहेर आला आणि स्वतः जमिनीवर नम्रपणे त्याच्या मालकापुढे वाकून अन्यायाची संपूर्ण कथा कशी घडली हे धडा धडा सांगितले, आणि त्याची मुलगी अरण्यात आणि निर्जन स्थळी सापडली ती त्या दोन वृद्धांनी तिला कशी जपून ठेवली हेही सांगितले. राजकुमाराच्या विस्मय आणि त्याच्या मुलीसह तो घाईघाईने घरी निघाला. घरातील सर्व माणसांना ही आनंदाची बातमी कळविण्यासाठी त्या मंडळींपैकी एकाने पुढे घोडा वेगात दौडविला, आणि काय घडले हे सावत्र आईने ऐकल्याबरोबर तिच्या नवऱ्याच्या भेटीत तिचा दुष्टपणा उघडकीस येईल या भीतीने आणि शरमिंदे होऊन घरातून निघून तिच्या वडिलांच्या आश्रयाखाली जाण्यास पळून गेली. नंतर तिच्याबद्दल कधीच काहीच ऐकू आले नाही.

वृद्ध सेवक कातेदाला त्याच्या मालकाच्या सेवेत उच्च श्रेणीत पदोन्नती देण्यात आली, जीवनाच्या अखेरपर्यंत तो आनंदित राहिला. लहानग्या राजकुमारीशी एकनिष्ठ राहिला, ज्याने तिचा जीव वाचविला त्या विश्वासू सेवकाला सर्व श्रेय मिळाले. तिला नंतर तिच्या निष्ठुर सावत्र आईकडून पुन्हा कधीही त्रास झाला नाही, आणि तिचे दिवस तिच्या पित्यासोबत आनंदाने आणि शांततेत गेले.

राजकुमार तोयोनारीला मुलगा नव्हता, म्हणून त्याने राजदरबारातीस एका उमरावाचा तरूण मुलगा त्याचा वारस म्हणून आणि त्याची कन्या हासे-हिमे हिचे लग्न लावण्याकरता दत्तक घेतला, थोड्या वर्षातच त्यांचे लग्न झाले. हासे-हिमेचे वृद्धापकाळातील जीवन खूप चांगले गेले आणि सर्व जणांच्या तोंडून हेच निघायचे की ती खूप प्रज्ञावान आणि धर्मनिष्ठ असून राजकुमार तोयोनारीच्या प्राचीन निवासस्थानात अधिपत्य करणारी लावण्यवती गृहस्वामिनी होती. क्रियाशील राज्यकर्त्यापासून नुकतेच सेवानिवृत्त झालेल्या आपल्या पित्यासमोर त्या कुटुंबातील भावी राज्यकर्ता म्हणून आपल्या मुलाला सादर करताना तिला खूप आनंद झाला.

आजपर्यंत किओतो येथील बुद्धमंदिरांपैकी एकात विणकामाचा एक भाग जोपासून ठेवला आहे. कमळाच्या देठापासून काढलेल्या झुळझुळीत रेशमी धाग्यांनी बुद्धाच्या आकृतीचे भरतकाम केलेले, भिंतीवर सोडलेले सुंदर तुकडे तेथे आहेत. असं म्हणतात की ही कलाकृती पुण्यशील राजकुमारी हासेच्या हातची आहे.

मृत्यू नको असलेल्या माणसाची गोष्ट

फार फार वर्षांपूर्वी सेंतारो नावाचा एक माणूस रहात होता. त्याच्या आडनावाचा अर्थ होता, “लक्षाधीश” पण जरी तो फारसा श्रीमंत नव्हता तरी

फारसा गरीबही नव्हता. त्याच्या नशिबाने त्याला वडिलोपार्जित वारसा प्राप्त संपत्ती मिळालेली होती. त्यावरच तो जगत होता, वयाचा बत्तीस वर्षांचा होईपर्यंत त्याने निष्काळजीपणे वेळ घालविला होता आणि कामाबद्दल त्याने कधीही गांभीर्याने विचार केला नव्हता.

एके दिवशी काहीही कारण नसताना, मृत्यू आणि आजारपणाबद्दलचा विचार त्याच्या मनात आला. आजारी पडणे आणि मृत्यू पावणे ह्या कल्पनेने तो खूप दुःखी आणि हैराण झाला.

“मला जिवंत राहणे आवडेल” तो स्वतःशीच म्हणाला, “अगदी कमीत कमी पाचशे किंवा सहाशे वर्षे वयाचा होईपर्यंत, सर्व प्रकारच्या व्याधींपासून

मुक्त. सर्व सामान्य माणसाच्या आयुष्याचा कालावधी खूपच कमी असतो." तो स्वतःच्या मनाला विचारू लागला, इथून पुढे मी साधेपणाने आणि काटकसरीने जगल्यास जोपर्यंत माझी इच्छा असेल तोपर्यंत माझे आयुष्य दीर्घ होईल.

त्याला सम्राटांच्या प्राचीन इतिहासातील अनेक गोष्टी ठाऊक होत्या की जे हजारो वर्षे जगले आणि यामातोची राजकन्या अशी होती म्हणतात की जी वयाच्या पाचशे वर्षेपर्यंत जगली. ही दीर्घायुष्याच्या नोंदीची अगदी अलिकडची गोष्ट होती.

शिन-नो-शिको ह्या चिनी राजाची कथा त्याने अनेकदा ऐकली होती. चिनी इतिहासातील अनेक सामर्थ्यशाली आणि बलाढ्य राज्यकर्त्यांपैकी तो एक होता. त्याने विस्तिर्ण राजप्रासाद बांधले होते आणि त्यानेच चिनची प्रसिद्ध प्रचंड भिंतही बांधली होती. त्याने इच्छा केलेल्या जगातील सर्व वस्तू त्याला प्राप्त झालेल्या होत्या. पण इतके सौख्य चैनविलास, राजदरबारातील वैभव, पदरी असलेले प्रज्ञावान मंत्री आणि साम्राज्यातील दिगंत किर्ती असूनही तो दुःखी, कष्टी होता, कारण त्याला ठाऊक होते की एक दिवस त्याला मृत्यू येणार आणि हे सर्व सोडून त्याला जावे लागणार.

शिन-नो-शिको रात्री झोपला आणि जेव्हा तो सकाळी उठला तेव्हा सकाळपासून संपूर्ण दिवसभर अविरत त्याला मृत्यूचाच विचार सतावित होता. तो त्यापासून दूर जाऊ शकत नव्हता. ओ, जर त्याला फक्त आयुष्य दीर्घ करणारे रामबाण औषध सापडले असते तर तो खूप सुखी झाला असता.

त्याने त्याच्या राजदरबारातील लोकांची बैठक बोलाविली आणि त्यांना विचारले की ज्या विषयी त्याने अनेकदा ऐकले होते ते आयुष्य दीर्घ करणारे रामबाण औषध त्याच्यासाठी कोणी शोधू शकणार नाही का?

एक म्हातारा राजदरबारी ज्याचे नाव जोफुकू होते, त्याने सांगितले की खूप लांब समुद्राच्या पलिकडे होराइझन नावाचा देश होता. तेथे खरोखर एक तपस्वी

रहात होता. त्याला “आयुष्य दीर्घ करणाऱ्या रामबाण औषधा” बद्दल गुप्त माहिती होती. ज्याने त्याचा अद्भूत घोट प्यायला होता त्याला चिरकाल आयुष्य लाभले होते.

सम्राटाने जोफुकूला होरायझनच्या भूमीकडे जाऊन त्या तपस्व्याला शोधून आयुष्य दीर्घ करणाऱ्या रामबाण औषधाची जादुई कुपी आणण्याची आज्ञा केली. त्या तपस्व्याला भेट म्हणून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खजिना, हिरे, माणिक मोती यांनी लादलेले असे एक सर्वात उत्कृष्ट जहाज जोफुकूसाठी सज्ज करून दिले.

जोफुकूने समुद्रमार्गे नौकेतून खूप जलप्रवास केला, पण प्रतिक्षा करणाऱ्या समुद्राकडे तो कधीच परतू शकला नाही. पण तेव्हापासून फुजी पर्वत हा कल्पित कथेतील होरायझन (क्षितिज), ज्याला आयुष्य दीर्घ करणाऱ्या रामबाण औषधाविषयीचे रहस्य माहित होते त्या तपस्व्याचे निवासस्थान होता असे म्हटले जात होते. आणि जोफुकूची त्यांचा आश्रयदाता परमेश्वर म्हणून पूजा केली जात होती.

आता सेंतारोने असा निर्धार केला की त्या तपस्व्याचा शोध घेण्यासाठी बाहेर पडावे आणि जर त्याला शक्य झाले तर तो शाश्वत जीवनाचे जल प्राप्त करू शकणारा एक असेल. तो लहान असताना त्याला असे सांगितले गेले होते की फक्त फुजी पर्वतावरच ते तपस्वी राहत नाहीत तर सर्व पर्वत शिखरांवर त्यांचे वास्तव्य असते.

म्हणून तो त्याचे जुने घर देखभाल करण्यासाठी नातेवाईकांच्या स्वाधीन करून त्याच्या प्रदीर्घ शोधासाठी निघाला. त्याने भूमीवरील सर्व पर्वतमय प्रदेशात प्रवास करून सर्वोच्च शिखरांच्या अग्रभागांवर चढून शोध घेतला पण त्याला कधीच तपस्वी सापडला नाही.

शेवटी खूप दिवस भटकत भटकत तो एका अज्ञात प्रदेशात आला, तेथे त्याला एक शिकारी भेटला. “तुम्ही मला सांगू शकाल का,” सेंतारोने पृच्छा केली, की “आयुष्य दीर्घ करणारे रामबाण औषध ज्याच्याकडे आहे असा तपस्वी कोठे राहतो ते?”

“नाही,” तो शिकारी म्हणाला, “अशा प्रकारचा तपस्वी कोठे राहतो हे मी तुम्हाला सांगू शकत नाही. पण या भागात एक कुविख्यात दरोडेखोर राहतो. असं म्हटलं जातं की तो दोनशे अनुयायांच्या टोळीचा सरदार आहे.”

ह्या विचित्र उत्तराने सेंतारोला खूप चीड आली आणि अशा मार्गाने तपस्व्यांचा शोध घेण्यात आणि अधिक वेळ घालवण्यात किती मूर्खपणा आहे असा त्याने विचार केला म्हणून त्याने लगेचच जपानच्या दक्षिणेकडील तपस्व्यांचा आश्रयदाता परमेश्वर म्हणून ज्याची पूजा केली जाते त्या जोफुकूच्या समाधीकडे जाण्याचे ठरविले.

सेंतारो समाधीजवळ पोहोचला आणि त्याने सात दिवस प्रार्थना करून त्याला जे काही हवे ते शोधण्याकरीता तपस्व्यांकडे जाण्याचा मार्ग दाखवावा म्हणून जोफुकूची त्याने मिनतवारी केली.

सातव्या दिवशीच्या मध्यरात्री त्या मंदिरात सेंतारोने गुडघे टेकले, समाधीच्या गाभाऱ्यातील दरवाजा धाडकन् उघडला गेला आणि जोफुकू तेजस्वी ढगांमधून प्रकट झाला. आणि सेंतारोला जवळ यायला सांगून म्हणाला, “तुझी इच्छा खूपच स्वार्थीपणाची असल्याने ती सहजासहजी मान्य करणे शक्य नाही. तुला असं वाटतं की आपण तपस्वी बनावे जेणेकरून आयुष्य दीर्घ करणारे रामबाण औषध तुला सापडेल. तपस्व्याचे जीवन किती कठीण असते हे तुला ठाऊक आहे का? तपस्व्याला फक्त फळे, कंदमुळे आणि देवदार वृक्षांची साल खाण्याची अनुमती आहे.

तपस्व्याला स्वतःला जगाशी पूर्णपणे संबंध तोडावे लागतात तेव्हाच त्याचे हृदय सोन्यासारखे शुद्ध होते आणि ऐहिक वासनांपासून तो मुक्त राहतो. हळूहळू ह्या कठोर नियमांचे पालन केल्यानंतर तपस्व्याला भूक, थंडी, उष्मा ह्यांची जाणीव होणे बंद होते आणि त्याचे शरीर इतके हलके होते की तो बगळा किंवा रोही माशावर स्वार होऊ शकतो, आणि त्याचे पाय ओले न होता तो पाण्यावर चालू शकतो."

"सेंतारो, तुला चांगलं, अतिशय सुख समाधानाचं जीवन आवडतं. तू सर्वसामान्य माणूसच नाहीस. कारण तू विलक्षण आळशी आहेस. थंड आणि उष्ण याबाबतीत तू इतर लोकांपेक्षा खूपच अधिक संवेदनशील आहेस. तू कधीच अनवाणी चालला नाहीस किंवा तू हिवाळ्यात कधीच पातळ कपडे घातले नाहीस. तुला असं वाटतं का की तपस्व्यासारखं जगायला तुझ्याजवळ सहनशक्ती आणि सोशिकपणा आहे असा?"

"तथापि तुझ्या प्रार्थनेला प्रतिसाद म्हणून मी तुला दुसऱ्या मार्गाने मदत करीन. मी तुला शाश्वत जीवनाच्या देशात पाठवीन, जेथे मृत्यू कधीही येत नाही— जेथे लोक निरंतर जिवंत राहतात!"

असे म्हणत जोफुकूने कागदापासून बनविलेला छोटासा बगळा त्याच्या हातावर ठेवला आणि त्याला सांगितले की याच्या पाठीवर बैस, तो तुला तेथे नेईल."

सेंतारोने आश्चर्य करीत आज्ञा पाळली. त्याला त्यावर आरामात स्वार होता येईल इतका पुरेसा तो बगळा मोठा झाला. नंतर त्याने त्याचे पंख पसरविले, आकाशात उंच भरारी घेतली आणि पर्वतांवरून जलद समुद्राकडे झेप घेतली. सेंतारो सुरुवातीला पुरता घाबरला होता, पण हळूहळू हवेतून शीघ्रगतीच्या

उड्डाणाची त्याला सवय झाली. न थांबता ते हजारो मैल गेले. तो पक्षी काही खाण्यासाठी किंवा विश्रांतीसाठी थांबला नाही. पण तो निःसंशय कागदाचा बनविलेला पक्षी होता. त्यामुळे त्याला अन्नाची गरजच नव्हती आणि विचित्र गोष्ट म्हणजे सेंतारोलाही कसलीच गरज पडली नाही.

बऱ्याच दिवसानंतर ते एका बेटावर पोहोचले. तो बगळा जमिनीवरून काही काळ उडत राहिला व नंतर खाली उतरला.

सेंतारो त्या पक्षाच्या पाठीवरून उतरत नाही तोच त्या पक्षाने स्वेच्छेने स्वतःची घडी केली आणि तो त्याच्या खिशात जाऊन बसला.

आता सेंतारो अचंबित होत शाश्वत जीवनाचा देश कसा असतो हे मोठ्या कुतूहलाने पाहू लागला. तो त्या देशात सुरुवातीला चक्कर मारून आला. नंतर शहरातून फिरून आला. त्याच्या देशापेक्षा खचितच सर्व गोष्टी संपूर्णपणे विचित्र आणि भिन्न होत्या. देश आणि लोक दोन्ही समृद्ध होते म्हणून त्याने ठरविले की येथे राहणेच त्याच्यासाठी उत्तम राहिल. म्हणून तो एका हॉटेलात उतरला.

मालक दयाळू होता आणि जेव्हा सेंतारोने सांगितले की तेथे त्याला रहायचे आहे, तेव्हा त्याने तेथील प्रशासकाची मदत घेऊन तेथील मुक्कामासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची तरतूद करून देण्याचे आश्वासन दिले. एवढेच नाही तर त्याच्या पाहुण्यासाठी त्याने एक घर सुद्धा त्याला शोधून दिले आणि अशा रितीने सेंतारोने त्याची इच्छापूर्ती मिळवली आणि तो निरंतर जिवंत राहणाऱ्या लोकांच्या देशाचा रहिवासी झाला.

त्या बेटावरील रहिवाशांच्या आठवणीत कुणीही कधीही मृत्यू पावलं नव्हतं की आजारी पडलं नव्हतं व ह्या गोष्टींबाबत ते अज्ञात होते. जेथे सर्वत्र आनंद, परमसुख आणि संतोष सर्व माणसांच्या हृदयात भरलेला असतो आणि जेथे फक्त मृत्यूनंतरच जाता येते असा सुंदर देश म्हणजे स्वर्ग, ह्याबद्दल भारत आणि चीनमधून आलेल्या धर्मगुरूंनी तेथे येऊन त्या बेटावरील रहिवाशांना सांगितलेले होते, अशी

समजूत पिढ्यान् पिढ्या चालत आलेली होती. पण स्वर्गाकडे घेऊन जाणारा हा मृत्यू म्हणजे काय हे नेमकं कोणालाच ठाऊक नव्हतं.

सेंतारो आणि इतर सर्वसामान्य माणसांपेक्षा अतिशय भिन्न असलेल्या ह्या लोकांना मृत्यूची भीतीच ठाऊक नव्हती. त्याऐवजी ते सर्व श्रीमंत आणि गरीब लोक काहीतरी छान आणि प्रशस्त अशा गोष्टींची वांछा करीत होते. ते त्यांच्या दीर्घ, दीर्घ आयुष्याला कंटाळून गेले होते. आणि शतकापूर्वी ज्या स्वर्गाविषयी धर्मगुरूंनी त्यांना सांगितलेले होते तेथे जाण्यासाठी ते आसुसलेले होते.

बेटावरील रहिवाशांच्या बोलण्यातून हे सर्व काही सेंतारोला लवकरच कळून आले. ह्या विपरीत देशात त्याला त्याच्या कल्पनेनुसार आढळून आले की प्रत्येक गोष्ट अस्ताव्यस्त होती. मृत्यूला चुकविण्याची त्याची इच्छा होती. कधीच मृत्यू येणार नाही ह्याची निश्चितता ज्या रहिवाशांना होती त्या दुःख परिहार आणि आनंदाच्या शाश्वत जीवनाच्या देशात तो आला होता तेच मृत्यूच्या शोधात धन्यता मानत होते. तोच विचार करीत होते.

अद्यापपावेतो त्याचे असे मत झाले होते की विषाला ते चांगलं अन्न म्हणून सेवन करतात आणि ज्या गोष्टी अन्न म्हणून नेहमीच्या सवयीप्रमाणे खायच्या असतात त्याच गोष्टी ते नेहमीप्रमाणे नापसंत करीत होते. जेव्हा जेव्हा दुसऱ्या देशातून काही व्यापारी तेथे पोहोचत तेव्हा श्रीमंत माणसे त्यांच्याकडून विष घेण्यासाठी उत्सुकतेने झुंबड उडवित. ते विष ते उताविळपणे गिळंकृत करीत, ह्या आशेने की मृत्यू येईल आणि ते स्वर्गात जातील.

इतर देशातील प्राणघातक विषाचा ह्या अद्‌भूत स्थानात काहीच परिणाम होत नसे. आणि जे लोक मृत्यू यावा म्हणून ते सेवन करीत त्याचा खूप वाईट परिणाम होण्याऐवजी थोड्याच वेळात त्यांना अतिशय छान वाटायला लागून ते अधिक निरोगी होत.

मृत्यू कशासारखा असू शकतो ह्याची ते व्यर्थ कल्पना करीत असत. धनाढ्य लोक, त्यांचे आयुष्य दोनशे ते तीनशे वर्षांनी कुणी कमी केले असते तर ते त्यांची सर्व संपत्ती आणि मालमत्ता सुद्धा त्यांनी देऊ केली असती. कुठल्याही बदलाशिवाय सतत तेच तेच आयुष्य जगताना ते लोक कंटाळलेले आणि दुःखी दिसत.

औषध विक्रेत्याच्या दुकानात एक औषध असायचे, त्याला सतत मागणी असायची कारण त्याचा वापर केल्याने त्यांचे केस थोडेतरी भुरकट व्हावे व त्यांना पोटाचे विकार व्हावेत अशी त्यांची अपेक्षा असायची.

सर्वात जास्त रूचिर भोजन म्हणून विषारी चक्रीमासा उपहारगृहामध्ये वाढला जायचा आणि फेरीवाले रस्तोरस्ती उडत्या स्पॅनिश किड्यांचे कालवण विकायचे हे पाहून तर तो थक्कच झाला. इतक्या भयानक गोष्टी खाऊन पिऊनही त्यांना कधी आजारी पडलेले पाहिले नाही की कधी हिवताप आलेले पाहिले नाही.

सेंतारो आनंदीत झाला होता. तो स्वतःशी म्हणाला की तो अशा जीवनाला कधीही कंटाळणार नाही. पूर्ण विचाराअंती त्याचे असे मत झाले की मृत्यूची इच्छा करणे अधार्मिक आहे. त्या बेटावर तोच फक्त आनंदीत होता. त्याच्या मताने त्याला हजारो वर्षे जगायची इच्छा असून जीवनाचा आनंद लुटायचा होता. त्याने स्वतःला उद्योगधंद्यात उतरविले, सध्यातरी मातृभूमीकडे परत जायचे स्वप्न तो कधीच बघत नव्हता.

वर्षानुवर्षे गेली, तथापि सुरुवातीसारख्या सर्व गोष्टी मउसूत गेल्या नाहीत. त्याला व्यापारात खूप मोठा तोटा आला आणि काही चुकांमुळे शेजाऱ्यांशी भानगडी झाल्या. त्यामुळे तो खूप त्रस्त झाला होता.

बाणाच्या वेगाने वेळ निघून गेला कारण तो सकाळपासून सायंकाळपर्यंत कामात व्यग्र होता. तीनशे वर्षे अशा कंटाळवाण्या स्थितीत निघून गेली आणि नंतर ह्या देशात राहून त्याला कंटाळा आला आणि त्याला त्याच्या स्वतःच्या देशात त्याच्या जुन्या घरी जायची आस लागली. तथापि फार काळ तो तेथे राहिला,

जीवन म्हणजे नेहमीच त्याला एक खेळ वाटला, म्हणून येथे कायमचे राहणे हे किती मूर्खपणाचे आणि कंटाळवाणे नव्हते का?

सेंतारोला त्या शाश्वत जीवनाच्या देशातून सुटका करून घेण्याची इच्छा झाली. मृत्यूपासून सुटका करून घेण्याच्या बाबतीत पूर्वी ज्याने त्याला मदत केली होती त्या जोफुकूचे त्याला स्मरण झाले आणि त्याला त्याच्या स्वतःच्या देशात परत आणण्यासाठी त्याने त्या साधूची आराधना केली.

तो आराधना करीत नाही तोच तो कागदाचा बगळा फट्दिशी त्याच्या खिशातून बाहेर पडला. सेंतारो विस्मयचकित होऊन पाहू लागला की एवढ्या वर्षांपासून आजपर्यंत तो खराब कसा झाला नाही. पुन्हा एकदा तो पक्षी त्यावर आरूढ होता येईल एवढा मोठा झाला. त्याच्यावर आरूढ झाल्याबरोबर त्या पक्षाने पंख पसरविले आणि तो उडाला. अतिशय वेगाने तो समुद्र ओलांडत जपानच्या दिशेने उडाला.

माणसाचा स्वभाव किती हेकेखोर असतो, त्याने मागे पाहिले आणि आपण मागे काय सोडून जात आहोत ह्याचे त्याला खूप दुःख झाले. त्याने त्या पक्ष्याला थांबवायचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ, त्या बगळ्याने त्याचा मार्ग सोडला नाही. समुद्र ओलांडत तो हजारो मैल उडतच होता.

नंतर वादळ आले, आणि तो कागदाचा अद्भूत पक्षी ओला होऊन त्याचा चोळामोळा झाला आणि तो समुद्रात पडला. सेंतारोही त्याच्याबरोबर पडला. आता आपण बुडून जाणार ह्या भीतीने त्याने मोठ्याने किंचाळत वाचविण्यासाठी जोफुकूचा धावा केला. त्याने सभोवार पाहिले पण त्याच्या दृष्टीक्षेपात एकही जहाज पडले नाही. त्याच्या नाकातोंडात समुद्राचे खूप पाणी गेले आणि त्याची अवस्था अधिकच केविलवाणी झाली. स्वतःला तरंगते ठेवण्यासाठी त्याची धडपड चालू होती तेवढ्यात एक भलामोठा भीमकाय शार्कमासा त्याच्याकडे पोहत येताना त्याला दिसला. जसा तो जवळ आला तसा त्याला गिळून घेण्याच्या तयारीत त्याचा

प्रचंड जबडा उघडला. त्या भीतीने तो बधीर झाला आणि त्याचा मृत्यू आता जवळ आला आहे ह्याची त्याला जाणीव झाली. जितक्या मोठ्याने ओरडता येईल तितक्या मोठ्याने ओरडून तो स्वतःला वाचविण्यासाठी जोफुकूला हाका मारू लागला.

ओहो, त्याच्या स्वतःच्या ओरडण्यानेच सेंतारो जागा झाला. त्याला असे ज्ञात झाले की त्याच्या प्रार्थने दरम्यान त्याला समाधीसमोर गाढ झोप लागली होती. आणि त्याचे सारे अलौकीक आणि भयानक साहस हे केवळ बेफाम स्वप्न होते. त्याला भीतीने थंड घाम येऊन तो पूर्णपणे गोंधळात पडला होता.

अकस्मात एक तेजस्वी प्रकाश त्याच्याकडे आला आणि त्या प्रकाशात एक दूत उभा राहिला. त्या दुताने एक पुस्तक हातात धरले होते. आणि तो सेंतारोशी बोलू लागला,

“मला जोफुकूकडून तुझ्याकडे तुझ्या प्रर्थनेच्या उत्तरादाखल पाठविण्यात आले आहे. तुला स्वप्नात शाश्वत देश पाहण्याची अनुमती दिली गेली होती. पण तुला तेथे राहण्याचा कंटाळा आला होता आणि तू याचना केली म्हणून तुला स्वदेशी परतण्याची परवानगी देण्यात आली, जेणेकरून तुला खचितच मृत्यू यावा. जोफुकूने म्हणूनच तुला समुद्रात पाडण्याचा आणि नंतर तुला गिळून टाकण्यासाठी शार्क पाठविण्याचा प्रयत्न केला असावा. तुझी मरणाची इच्छा खरी नव्हती तरी सुद्धा त्या क्षणाला तू मदतीसाठी किंचाळलास आणि जोरात ओरडलास.”

एक तपस्वी बनणे किंवा आयुष्य दीर्घ करणारे रामबाण औषध शोधणे हे सुद्धा तुझ्यासाठी व्यर्थ होते. हे सुद्धा तुझ्यासारख्याला योग्य नव्हे. तुझे जीवन तितकेसे खडतर नाही. तू तुझ्या वडिलोपार्जित घरी जाणे आणि चांगलं, कष्टाळू जीवन जगणे हेच तुझ्यासाठी उत्तम ठरेल. तुझ्या पूर्वजांच्या पुण्यतिथीकडे दुर्लक्ष करू नकोस आणि तुझ्या मुलाबाळांच्या भवितव्यासाठी तजवीज करण्याचे कर्तव्य पार पाड. अशा रितीने तू उत्तम प्रकारचे आणि सुखी जीवन जग. पण मृत्यूपासून सुटका करून घेण्याचे निरर्थक मनोरथ सोडून दे, कारण कोणताच मनुष्यप्राणी तसं करू शकत

नाही. आणि ह्यातून तुला निश्चितच कळून चुकले असेल की आपमतलबी लालसेतून कधीही सौख्य निर्माण होऊ शकत नाही."

"ह्या पुस्तकात अनेक आज्ञा आणि नियम आहेत, ते तुला समजले तर तुझ्यासाठी ते फार हितकर होईल. जर तू त्याचं अध्ययन केलंस तर मी निर्देश केल्याप्रमाणे तुला उत्तम मार्गदर्शन लाभेल."

त्या दुताचे बोलणे संपल्याबरोबर तो अदृश्य झाला आणि सेंतारोने ती शिकवण आपल्या हृदयात जपून ठेवली. हातात पुस्तक घेऊन तो त्याच्या जुन्या घरी परतला आणि निरर्थक मनोरथ करणे सोडून देऊन तो उत्तम आणि सफल जीवन जगण्याचा प्रयत्न करू लागला. आणि पुस्तकात दिलेल्या शिकवणीचे त्याने अध्ययन केले आणि इतःपर त्याचा आणि त्याच्या घराचा उत्कर्ष झाला.

*****

ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.